पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक -४

सभावृत्तांत

दिनांक :- १९.५.२०१२ वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दि.१९.५.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा उर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.पवार संगीता शाम
२१. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२६. मा.भारती फरांदे
२७. मा.आर.एस.कुमार
२८. मा.जावेद रमजान शेख

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३१. मा.नंदा विकास ताकवणे
३२. मा.नेटके सुमन राजेंद्र
३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३७. मा.लोंढे गणेश नारायण
३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३९. मा.अनंत सुभाष को-हाळे
४०. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४१. मा.जयश्री वसंत गावडे
४२. मा.प्रसाद शेट्टी
४३. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४६. मा.शेख अस्लम शैकत
४७. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४८. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४९. मा.वाबळे संजय मल्हारराव
५०. मा.मडिगेरी वर्षा विलास
५१. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
५५. मा.अजित दामोदर गव्हाणे
५६. मा.गोफणे अनुराधा देविदास
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८. मा.महेशदादा किसन लांडगे
५९. मा.फुगे सीमा दत्तात्रय
६०. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६१. मा.लोंढे शुभांगी संतोष
६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६३. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६४. मा.सावळे सिमा रविंद्र
६५. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६६. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६७. मा.पालांडे सुजाता सुनिल
६८. मा.बहल योगेश मंगलसेन

६९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७०. मा.कदम सदगुरु महादेव
७१. मा.गिता सुशील मंचरकर
७२. मा.कैलास महादेव कदम
७३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७४. मा.आसवाणी सविता धनराज
७५. मा.वाघेरे सुनिता राजेश
७६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७९. मा.काळे विमल रमेश
८०. मा.पाडाळे निता विलास
८१. मा.विनोद जयवंत नढे
८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८५. मा.बारणे निलेश हिरामण
८६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८७. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८८. मा.बारणे माया संतोष
८९. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९०. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९२. मा.कलाटे स्वाती मयुर
९३. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९४. मा.चौंधे आरती सुरेश
९५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९६. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९७. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९८. मा.जवळकर वैशाली राहुल
९९. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१००. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०१. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०२. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०५. मा.जम सोनाली पोपट
१०६. मा.प्रशांत शितोळे
१०७. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०८. मा.काटे रोहित अप्पा सुदाम

१०९. मा.गायकवाड संध्या सुरदास
११०. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१११. मा.शेंडगे आशा सुखदेव
११२. मा.मोटे किरण बाळासाहेब
११३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११४. मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.आर.एन.जोशी-प्र.आयुक्त, मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त, मा.सावंत-सह.आयुक्त, मा.मुंढे, मा.टेकाळे, मा.पवार, मा.गायकवाड, मा.दुरगूडे-सहा. आयुक्त, मा.चाकणकर -प्र.नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.काची-उपशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.अय्यर-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.जाधव, मा.कपिले, मा.साळवी, मा.लडकत, मा.चौधरी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.कुलकर्णी, मा.पठाण-कार्य. अभियंता, मा.ओव्हाळ-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी, मा.डॉ.साळवी-वैद्यकीय अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.प्रशांत पाटील-उपअभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरवात करणेत येत आहे.

मा.सीमा फुगे :- मा.महापौर साहेब, माजी केंद्रीय ऊर्जामंत्री, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष-एन.के.पी.साळवे, माजी नगरसेवक-हनुमंत तथा अण्णासाहेब वाखारे, पुण्याचे माजी महापौर-भारत सावंत, प्रसिद्ध निवेदक- सतीश दिवाण, खराळवाडी येथील युवतीचा पाचगणी येथे अपघाती मृत्यू- तन्वी प्रकाश काकडे, एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या मोहिमेवरील पिंपरी चिंचवड येथील गिर्यारोहक व सागरमाथा या गिर्यारोहण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष-रमेश गुळवे, प्रसिद्ध उद्योजक आणि चिंचवड रोटरी क्लबचे सचिव-अनंतराव कुलकर्णी, पुण्याचे माजी नगरसदस्य-हिरालाल किराड, अध्यक्ष महले सुन्नत बलजामाल-बशीर मेहताब शेख (लाला) यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल -११२ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सागरमाथा गिर्यारोहण संस्थेच्या चार गिर्यारोहकांनी आज सकाळी माऊंट एव्हरेस्ट या जगातील सर्वोच्च शिखरावर पाऊल ठेवलं आणि पीसीएमसीच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला. या मोहिमेत श्रीहरी तापकीर (मोहिमेचा नेता), सागर पालकर (उपनेता), बालाजी माने व आनंद बनसोडे या गिर्यारोहकांचा समावेश होता. तसेच कुशल देशमुख याने बेसकॅम्पहून मोहिमेचे नियंत्रण केले. ज्येष्ठ गिर्यारोहक शेखर बाबु, मिंग्मा शेर्पा तसेच पीसीएमअे चे सुरेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम आयोजित करण्यात आली होती. हि यशस्वी मोहिम सागरमाथाने कै.रमेश गुळवे यांना अर्पण केली आहे. रमेश गुळवे यांचा मोहिमे दरम्यान अर्धांगवायुचा झटका आल्यामुळे मृत्यू झाला होता. याच रमेश गुळवे यांचे माऊंट एव्हरेस्ट सर करण्याचे स्वप्न आज या संस्थेच्या गिर्यारोहकांकडून पुर्ण झाले आहे. यंदाच्या मोसमातली हि पहिली यशस्वी भारतीय मोहिम असून हि आजवरची सर्वात कमी खर्चाची मोहिम होती. तरी यांचा मी अभिनंदनाचा ठराव करतो व येत्या महापालिका सभेत यांचा सत्कार करावा अशी सूचना मांडतो.

मा.नितीन लांडगे :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

(सागरमाथा गिर्यारोहण संस्थेच्या चार गिर्यारोहकांनी जगातील सर्वोत्तम माऊंट एव्हरेस्ट या शिखरावर जावून केलेल्या पराक्रमाबद्दल सर्वांचे अभिनंदन करणेत येत असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.)

मा.महापालिका सभा क्र. ३ दि.२०/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.महापौर :- प्रश्नोत्तरे- शमीम पठाण यांना विचारावयाचे प्रश्न. प्रश्नोत्तरासाठी एक तास देण्यात येत आहे.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, मी जकात विभागाशी निगडीत असलेले तीन प्रश्न विचारलेले होते. त्याला दिलेले उत्तर मला समाधानकारक वाटत नाही. प्रश्न विचारल्यानंतर लगेच त्या महिन्यामध्ये या विभागाने आपल्या कामाचे स्पष्टीकरण संपुर्ण पेपरद्वारे जाहिर केलेले आहे. जास्तच गाडया पकडलेल्या दिसतात. दर महिन्याला असे प्रश्न विचारावेत म्हणजे जास्तीत जास्त जकातीचे उत्पन्न वाढेल. सेलटॅक्स विभागामध्ये विक्रीकर घेतला जातो त्याबद्यल जे डिक्लरेशन असते ते आपण आपल्या जकातीशी

काही कम्पेअर करतो का. दारुचे गोडावून फुरसूंगी येथे आहे. त्याठिकाणी एक्साईज व महापालिकेचे गोडावून आहे त्याठिकाणी एका बॉक्ससाठी टिपी असतो. एका गाडीमध्ये ५०० बॉक्स मावतात. त्याठिकाणी ५० बॉक्सवर टिपीची नोंद केली जाते आणि गाडी पुढे जाते आणि त्याचठिकाणी आपली जकात मार खाते. असे कितीतरी प्रकरण आहेत. वाळूची ट्रक असते त्याच्याखाली स्टील असेल किंवा इतर काही असेलतर ते आपण चेक केले पाहिजे. एखादया ट्रकमध्ये वेगवेगळया प्रकारचा माल असतो ते काही बघितले जात नाही. फक्त एखादया प्रकारच्या मालाची बिल्टी दाखवून बाकी मालावर जकात आकारतो व इतर माल विना जकातीचा जातो, मी नाव सांगणार नाही. याठिकाणी मोठे रॅकेट आहे त्याच्यावर आमची नजर आहे. कंपन्यांचे खाते असते त्यांचा माल जकात नाक्यावर येतो त्याठिकाणी डेबीट नोट दाखविला जातो आणि पुढे गाडी जाते. ती गाडी सोडल्यानंतर त्यामध्ये काय आहे हे पाहिले जात नाही. त्या कंपनीचे खाते आहे एवढेच पाहिले जाते. तो माल कंपनीमध्ये येतो महिनाभर तेथेच पडला जातो असे काही नाही. प्रत्येक कंपनीमध्ये चैन सिस्टीम आहे. माल आल्यावर लगेचच तो यंत्रावर चढविला जातो त्याचे प्रॉडक्शन होते आणि मार्केटमध्ये माल जातो एवढी चैन आहे. लगेच प्रॉडक्शन होते ही प्रगती आहे. परंतु पुढचे प्रोसेस आपल्याकडे होते त्याना डेबीट नोट दिलेली आहे अशा कितीतरी डेबीट नोट त्यांच्याकडे असतात ते तपासण्यासाठी आपले लोक त्यांच्याकडे जातात. हे सगळे झाल्यानंतर आपले लोक त्याठिकाणी जातात. त्याठिकाणी तपासणी केल्यानंतर जकातीमध्ये ५० लाखाचा फरक पडतो. जकात विभागामध्ये दहा-पंधरा वर्षे एकाच ठिकाणी असलेले काही महाशय आहेत तेच कंपनीला सांगत असतात ५० लाखाचा फरक पडला. व तेच सांगतात की तुम्ही आम्हांला एक पत्र द्या व आम्हांला हे मान्य नाही असे लिहा. नंतर आपले तीन चार लोक बसलेले आहेत ते त्यांच्या ठरलेल्या लोकांना कंपनीमध्ये पाठवितात व त्याठिकाणी ५० लाखाचे ५ लाख होतात आणि ५ लाखच महापालिकेला जकातीपोटी मिळतात. अशा ब-याचशा कंपन्या आहेत. थरमॅक्सचे असेच झालेले आहे त्यांच्याबद्यल पेपरमध्ये बातमी आलेली होती. मुंबईला जकात विभागाचे कसे पोस्टमार्टेम चालले आहे त्याप्रमाणे आपणही सावध व्हायला पाहिजे. अशाप्रकारचे सेटलमेंट हे लोक करत असतात. आपल्याकडे एस्कॉर्ट हा एक प्रकार आहे. त्याठिकाणी अंधेरी नगरी चौपट राजा अशी परिस्थिती आहे. एस्कॉर्टच्या नावाखाली जे वाहतूक व्यावसायीक आहेत त्यांच्याकडे दोनशे पासेस अगोदरच जातात. आपल्याकडून गेल्यानंतर देहूरोडवर चेक नाका आहे त्याठिकाणी या गाडयांची नोंद होते. त्यांची नोंद आणि आपल्याकडून एस्कॉर्ट दिलेला आहे त्याची नोंद बरोबर आहे का हे पाहिले पाहिजे, तुलना केली पाहिजे. मुंढे साहेब चांगले काम करतात असे आम्ही ऐकतो. एस्कॉर्टची आणि देहू रोडची नोंद टॅली करुन बघावे. जे जकातीमध्ये शिपाई होते त्यांच्या बदल्या आरोग्य विभागात किंवा इतर ठिकाणी झालेल्या आहेत त्यांचा आता जकातीशी काहीही संबंध नाही परंतु त्यांचा देह ईकडे आणि मन जकातीमध्ये असते. मी तुम्हांला त्यांचे नाव सुध्दा सांगेल परंतु मला कोणाच्याही नौकरीवर गदा आणायची नाही. त्यांचे पुर्ण जकातीकडेच लक्ष असते. मुंढे साहेब आपल्याला सुध्दा माहिती असेल, याला आळा घातला पाहिजे एवढेच सांगते. तुमच्या विभागाचे चांगले काम असेलतर १३०० कोटीची जकात अंदाजपत्रकात धरलीतरी यामध्ये आणखीन एक हजार कोटी वाढू शकतात. म्हणजे जवळ जवळ २३०० ते २५०० कोटीची जकात वसूल व्हायला पाहिजे, इतके चांगले काम आपण करावे असे वाटते.

चामूण्डा स्टोन यांचे पेपरमध्ये आलेले होते असे एकच नाही तर सगळया व्यावसायीकांच्या गाडया बघाव्यात. तुम्हांला माहिती नसेलतर आम्ही सांगतो. आमचे लोक आता काम करु लागलेले आहेत, तुम्ही सुध्दा त्या कामावर लोक सोडलेले आहेत. जेणेकरुन महापालिकेचे किती नुकसान होते हे समजेल. जकात विभागामध्ये खुप मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो, त्यावर लक्ष ठेवलेतर नक्कीच जकातीचे उत्पन्न वाढेल.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, आपल्या सभागृहातील ज्येष्ठ नगरसेविका शमीमताई पठाण यांनी चांगल्या विषयाकडे लक्ष वेधलेले आहे त्याबद्यल मी धन्यवाद देते. दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली आपल्या जकात विभागाच्या एका कर्मचा-याला कुठल्यातरी गुंडाने फोनवरुन दम देवून गाडी सोडण्यासाठी सांगीतले, त्या कर्मचा-यांनी भीतीपोटी वरिष्ठ अधिका-यांना फोन केला असता वरिष्ठ अधिका-यांनी त्यास दंड भरुन घ्यायला सांगीतले. गाडी सोडायची नाही असे सांगीतले. त्याचे पुढे काय झाले, फौजदारी गुन्हा दाखल केला का, फोन कोठून आला याचा शोध घेतला का. आता पठाणताई यांनी जकात वाढली पाहिजे असे सांगीतले आहे. आपल्या महापालिकेची श्रीमंती ही जकातीमुळे आहे. तेथील कर्मचा-यांना भिती व दहशत आहे त्यांच्या जीवाला धोका असेलतर त्या विभागात कोणीही काम करणार नाही. केबीनच्या आतमधील लोक सुरक्षीत आहेत पण बाहेरच्या लोकांना कुठलीही सुरक्षा आहे का. यामागेही असे प्रकरण झालेले होते अजून फौजदारी दाखल झालेली नाही. मोशी भागात सुध्दा जकातचोर फार मोठया प्रमाणात आहेत तेथील नागरीकांच्या कायम तक्रारी असतात. तेथून गाडी पास होते व पुढे मागे मोटारसायकली असतात व त्या कंपनीपर्यंत जातात. कर्मचा-यांसाठी काहीतरी करणार का नाही. कोण गुंड होते एवढे डेअरींग करुन तेथील कर्मचा-यांना धमकी दिलेली आहे. संपुर्ण कर्मचा-यांच्या जीवाचे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी आहे. मुंढे साहेब आपण चांगले काम करतात. चामूण्डा स्टोन यांचे नाव पेपरला आले, सेल्स टॅक्समधून चौकशी केल्यानंतर आपल्याला हे समजते. हेच लोक नंतर कोर्टात जाणार व त्याची आपण वाट बघत बसतो. त्यांच्यावर सुध्दा काय कारवाई करणार हे सांगावे.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, पठाणताई व सुलभाताई यांचे मी अभिनंदन करतो. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. जकात विभाग हा महापालिकेची मुख्य धामणी आहे. महापालिकेच्या उत्पन्नामध्ये जकातीचा फार मोठा वाटा आहे. जकात विभागाबद्यल यापुर्वी अनेकवेळा बोलले गेले. जकातीच्या चो-या होतात त्यामुळे महापालिकेची बदनामी झालेली आहे. मुंबई महापालिकेनी जकातीचे पोस्टमार्टेम केलेले आहे त्या धरतीवर जकातचोरी थांबविण्यासाठी आपल्या महापालिकेनी काय पाऊल उचलली पाहिजेत हे पाहिले पाहिजे. आपण प्रथम सिस्टीम बदली पाहिजे. मुंढे साहेब यांचा कारभार, त्यांची चिकाटी, जिद्द वाखण्यासारखी आहे. त्यांनी कितीजरी प्रयत्न केलेतरी ही सिस्टीम बदलली पाहिजे. मुंबईच्या धरतीवर ज्या गाडया येतात त्या एकाच क्यू मधुन आल्या पाहिजेत. मोशी मध्ये परिस्थिती पाहिलीतर त्याठिकाणी वजनकाटे बंद अवस्थेमध्ये आहेत. मालाचे अंदाजे वजन केले जाते ही गंभीर गोष्ट आहे. जकातचोरी होते त्याचा सुध्दा अभ्यास करण्यासारखे आहे. काही माल नदीच्या पलीकडे गोडावून मध्ये ठेवला जातो. मोशी नदीवर बंधारा आहे त्याठिकाणी रात्री गाडया येतात आणि महापालिकेच्या

हद्दीमध्ये गोडावून मधील माल आणला जातो. तेथील सिस्टीम बदलली पाहिजे. तेथे ट्रक आल्यानंतर ट्रकचा पाठिमागचा भाग खोलला जातो, आतमध्ये काय आहे हे समजत नाही. त्यासाठी मुंबईच्या धरतीवर त्याठिकाणी स्कॅनींग मशीन्स लावल्या पाहिजेत आणि क्यू मधुनच ती गाडी आतमध्ये आली पाहिजे. त्याठिकाणची सिस्टीम बदलण्याची गरज आहे. या विषयावर अनेकवेळा याठिकाणी चर्चा झालेली आहे, सभागृह गंभीर नाही. तरी यासाठी आपण तातडीने पाऊल उचलावीत व जकातचोरी थांबवावी. तसेच विक्रीकर विभागाने माहिती दिलेली आहे त्याचे क्रॉस चेकिंग झाले पाहिजे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, शमीमताईनी चांगल्या विषयाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मला याठिकाणी आपल्याला विनंती करायची आहे की, नेहमी आपण मुंढे साहेबांचे अभिनंदन करतो. आता खरे पाहता त्यांची असलेली मागणी पुर्ण करण्याची वेळ आलेली आहे. मागच्या आठवडयामध्ये गुंडा कडून धमकी दिलेली आहे त्याअनुषंगाने प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याचा पाठपुरावा करण्याची गरज आहे. कारण जकात हा आपल्या महापालिकेचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. सर्व पिंपरी चिंचवड शहर जे डेव्हलप होते ते त्याच्यावर अवलंबून आहे. काहीही केलेतरी त्याठिकाणी चो-या होत राहणार त्यासाठी हायटेक योजना राबविण्याची आवश्यकता आहे. आताच सांगीतले स्कॅनींगच्या माध्यमातून काही चो-या रोखू शकतो. कितीही चो-या पकडल्यातर गुन्हेगार त्याच्या पुढे जाऊन चो-या करत असतात. मुंढे साहेबांनी मागच्या वेळी याठिकाणी सुचना केलेली होती. सर्व जकात नाक्यावर सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्यात यावे. परंतु त्याची व्यवस्था अजून केलेली नाही. शहरामध्ये लाखो, करोडो रुपये खर्च करत असताना शुल्लक अमौंटसाठी सीसी टिव्ही कॅमेरे बसवू शकत नाहीत ते बसविणे आवश्यक आहे. कारण त्याठिकाणी येणा-या गाडया कोण हाताळते, कोण पाहणी करते हे सेंट्रलाईज पध्दतीने सीसी टिव्ही कॅमेरेच्या माध्यमातून लक्ष दिलेतर मदत होण्यासाठी उपयोग होईल. मुंढे साहेबं नेहमीच त्यांना असलेल्या कर्मचा-याची कमतरता सांगत असतात, कर्मचारी कमी आहेत म्हणतात. असे वेगवेगळे प्रश्न त्यांनी उपस्थित केलेले आहेत. आपण त्यांची एकिकडे स्तुती करतो आणि दुसरीकडे त्यांना पाहिजे असेलेले कर्मचारी देत नाहीत. जकात ही महापालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे ते डेव्हलप करण्यासाठी नेहमी सुचना देतो. आयुक्त साहेबांनी त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले, मागणी केली ते देणे आवश्यक आहे. मागच्या आठवडयामध्ये समानीकरणाचा विषय होता. हा जो गॅप ६० ते ७० कोटीचा आहे तो कुठून भरुन काढणार आहेत. हे टेक्निकली योग्य असलेतरी त्याठिकाणी स्टील वगैरे असते त्यामुळे तुम्हांला अडचण होत असेलतर याला कुठले रेट लावता यासाठी वाद होऊ शकतो. ६० ते ७० कोटीची जास्त तुट आहे ही आपण कुठून भरुन काढू शकतो. आपण जकातीच्या कर्मचा-यांना इन्सेन्टीव्ह म्हणून २० टक्के देतो ही चांगली गोष्ट आहे. त्या कर्मचा-याची असलेली रिस्क, त्यासाठी त्यास कोर्ट कचे-यामध्ये चक्रा माराव्या लागतात त्यामुळे त्यांना हे देणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपुरवठा, टॅक्स, आरोग्य याठिकाणी सुध्दा कर्मचारी काम करत असतात. त्यांना इन्सेन्टीव्ह द्यायचा नाही का. पाणीपुरवठयामध्ये रात्रंदिवस काम करणारे बरेचसे कर्मचारी आहेत त्यांच्या भावना अशा आहेत की जकातीमध्येच इन्सेन्टीव्ह का. पाणीपुरवठयामध्ये किंवा इतर महत्वाच्या विभागामध्ये सुध्दा हा इन्सेन्टीव्ह द्यायला पाहिजे. चांगल्या पध्दतीने काम करणारे इतर

विभागामध्ये सुध्दा कर्मचारी आहेत. त्याठिकाणी इन्सेन्टीव्ह देवू शकत नाहीत का. अशा पध्दतीने केलेतर कर्मचारी चांगले काम करतील आणि पिंपरी चिंचवड शहर डेव्हलप होण्यासाठी मदत होईल. उबाळेताई, धनंजय आल्हाट व शमीमताई यांनी चांगला विषय मांडलेला आहे. त्यांनी सूचना केलेल्या आहेत त्याचा मुंढे साहेबांनी खुलासा करावा व पिंपरी चिंचवड शहरात मेन ठिकाणी सीसी टिव्ही कॅमेरे बसवावेत त्यामुळे जकात गळतीला रोख लावू शकू.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पठाणताई दहा वर्षाच्या गॅप मधुन आल्यानंतर पहिल्यांदाच सोन्याला हात घातला. मुंढे साहेबांचे मी अभिनंदन करतो कारण मुंढे साहेबांनी ज्यावेळेस जकातीचा कारभार हातामध्ये घेतला त्यावेळेला ७१७ कोटी उत्पन्न जकातीचे होते. या वर्षाचे अंदाजपत्रक पाहिलेतर जवळपास १८७६ कोटीचे अंदाजपत्रक आहे त्याच्यामध्ये जकातीचे उत्पन्न १३०० कोटीचे आहे म्हणजे जवळपास ५७६ कोटी इतर विभागाकडून येणार आहेत. १३०० कोटीचे उत्पन्न जकातीपासून मिळणार आहे. आणि म्हणून या महापालिकेचा कारभार जकातीवर चालतो हे पुन्हा एकदा सिध्द झ ालेले आहे. या महापालिकेची जकात नियमावली नव्हती, ती शोधण्याचे काम सुध्दा १९९९ मध्ये केलेले आहे. जकातीमध्ये ज्या मोठया प्रमाणात चो-या चालल्या होत्या त्याला लगाम घालण्याचे काम मुंढे साहेबांनी केलेले आहे. जकातीमधील कर्मचा-यांना मुशाहिरा दिला जातो. तेथील कर्मचारी जकातनाक्यावरुन गाडी दुर गेल्यानंतर पुढे पकडतात आणि त्याचा मुशाहिरा त्याना दिला जातो. आजपर्यंत ४१ कोटीचा मुशाहिरा कर्मचा-यांना दिलेला आहे. महापालिकेचे कर्मचारी जकातनाक्यावरुन पुढे गाडी जाऊ देतात गाडी पुढे गेल्यानंतर पकडतात अशी मनामध्ये शंका आहे. या शहरामध्ये मोठयाप्रमाणावर बांधकाम चालले आहे, जकातचोरी सुध्दा मोठया प्रमाणावर होते. भविष्यामध्ये जकातचोरी थांबविली गेली पाहिजे. मुंढे साहेब शासनाकडे जातील त्यांना तीन वर्षे झालेले आहेत. मध्यंतरी त्यांनी सांगीतलेले होते या महापालिकेमध्ये ब-याच वर्षे सेवा केलेली आहे त्यांना राज्यशासनाकडे जायचे आहे. भविष्यामध्ये अशाप्रकारचे अधिकारी मिळतील किंवा नाही हे सांगता येत नाही. जकात विभागासाठी रिझर्व्हेशन असलेल्या जागा आज सुध्दा ताब्यात आलेल्या नाहीत. दुर्दैवाने महापालिकेचे आर्थिक उत्पन्न ज्या जकातीमधुन मिळते तेथील कर्मचारी आज सुध्दा टप-या टाकून बसतात, त्याठिकाणी उन्हात गाडया उभ्या असतात. तरी जकात नाके अद्यावत करावेत, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. हे केलेतर ७५ टक्के उत्पन्न एकाच विभागाकडून येते त्यांना चांगल्याप्रकारच्या सुविधा दिल्यातर त्यामध्ये वाईट होणार नाही. जकातचोरी बाबत सक्षमतेने वागले पाहिजे. जकात नाक्यावरुन गाडया जातात व त्या पुढे आडविल्या जातात. मुंढे साहेबांना विनंती राहिल आपण जोपर्यंत महापालिकेत आहात तोपर्यंत महापालिकेच्या कर्मचा-यांनी अशाप्रकारच्या गाडया नाक्यावरुन सोडून पुढे तीच गाडी आडविली आणि जकात वसुल केली असेल व त्याचा त्याला मुशाहिरा मिळत असेलतर तो सुध्दा तपासला पाहिजे. मी पुन्हा एकदा मुंढे साहेबांचे अभिनंदन करतो. महापालिकेच्या तिजोरीमध्ये मोठया प्रमाणात वाढ करण्यासाठी आपण कष्ट केले. या महापालिकेच्या जकात विभागामध्ये काम करणारे थोडेच अधिकारी आलेले आहेत. त्यामध्ये मुंढे साहेब यांचे नाव घेतले जाईल. महसुल विभागाचे निंबाळकर, तानाजी शिंदे

असे चांगले अधिकारी महापालिकेला मिळाल्यानंतर जकातीचे उत्पन्न वाढलेले आहे. पुन्हा एकदा पठाणताईचे आणि मुंढे साहेबांचे मी अभिनंदन करतो.

मा.नारायण बहिरवाडे :- मा.महापौर साहेब, पठाणताईनी शाळेतील विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावे त्या पध्दतीने मुंढे साहेबांना लेखी प्रश्न विचारलेले आहेत व त्यांनी सुध्दा चांगल्या पध्दतीने उत्तर दिलेले आहेत. जकात विभाग हा महत्वाचा विभाग आहे. अनेक मान्यवरांनी सांगीतले जकातीचे उत्पन्न हे दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. मागच्या बजेटमध्ये ११५० कोटीचे उत्पन्न जकाती पासून मिळालेले आहे आणि चालू बजेटमध्ये जवळ जवळ १३०० कोटी जकातीपासून उत्पन्न मिळणार आहे. जकात उत्पन्नाच्या दृष्टिने प्रमुख स्त्रोत ठरलेले आहे. यासाठी ख-या अर्थाने मुंढे साहेबांचे अभिनंदन केले पाहिजे. अतिशय कार्यक्षमतेने त्यांनी महापालिकेच्या जकातीचे उत्पन्न वाढविलेले आहे. महापालिकेची जकातचोर शंभरटक्के थांबवू शकलो नाहीत, आपण खुप कार्यक्षमतेने काम करतात परंतु जकातचोर सुध्दा तेवढयाच कार्यक्षमतेनी चो-या करत असतात. याला फ्लाईंगवाले जबाबदार आहेत असा मी आरोप करतो. वाहन नाक्यावर येतात ड्रायव्हर असेल किंवा एजंट असेल ते ज्यावेळेला बील घेवून जातील त्यावेळेला आतमधील कर्मचारी बील करतात. परंतु त्या ठिकाणी इनगेट आऊट गेट असते त्या गेटवर कर्मचारी नसतात. नाक्यावर येणा-या प्रत्येक गाडीने इनगेटमधुन प्रवेश केला पाहिजे व त्यांनी जकात फाडली का नाही हे आऊटगेटला जो कोणी बसतो त्यांनी पाहिले पाहिजे. मुंबई मध्ये जकात भरल्यानंतर आऊट गेटला गाडी जाते त्यानी भरलेली जकात योग्य आहे का नाही हे पाहिले जाते. तेथे चेकींग होत असते. आपल्या कुठल्याही नाक्यावर चेकपोस्ट नाही. आऊटगेटला, इनगेटला चार-पाच शिपाई उभे केले पाहिजे. आपल्याकडे एक फ्लाईंगची गाडी उभी असते ते त्यांच्याशी कॉन्टॅक्ट करत असतात व हे लोक राजरोषपणे गाडया सोडतात. मुंढे साहेब कार्यालयातून बाहेर पडल्यानंतर फ्लाईंगवाल्यांना लगेच कॉल जातो, मुंढे साहेब या या ठिकाणी येणार आहेत किंवा जाणार आहेत हे समजते. परवा चामुण्डा स्टोनची गाडी पकडली यापुर्वी यांना चार वर्षे गाडी पकडता आली नाही. म्हणजे चार वर्षापासून हा माणूस जकातीची चोरी करत होता. चार वर्षापासून फ्लाईंगवाले झोपले होते का. मुंबईवरुन रेल्वेनी येथे माल येतो, रेल्वेस्टेशनवर कोणाचेही लक्ष नसते. फ्लाईंगला बारा ते तेरा गाडया आहेत आणि पन्नास ते साठ कर्मचारी आहेत ते गाडी पकडणे एवढेच काम करतात व त्यांच्याच अशिर्वादाने या चो-यांचे प्रमाण वाढत चाललेले आहे. हे थांबविलेतर आणखी २०० कोटी पर्यंत जकात वाढू शकते. काही ट्रान्सपोर्टवाले वर्षानुवर्षे जकात चोरी करतात. गाडी पकडलीतर त्यांचा फोन येतो गाडी सोडता का नाही नसता खलास करुन टाकू असे वर्तन असते. अनेक प्रकारचे मटेरिअल सर्रासपणे येते. याला सराईत जकातचोर म्हणलेतर वावगे होणार नाही हे सर्व थांबले पाहिजे. माझ्याकडे ट्रान्सपोर्टवाल्यांची लिष्ट आहे व फ्लाईंगवाल्यांनाही हे माहिती आहे ते त्यांना हाप्ते देत असतात. फ्लाईंगवाल्यांना नाक्याच्या आतमध्ये बसविले पाहिजे. असे केलेतरच याला आळा बसेल असे वाटते. अशा पध्दतीने चो-या करणा-या ट्रान्सपोर्टवाल्यांची यादी माझ्याकडे आहे. काही नगरसेवक सुध्दा या गाडया पकडण्यासाठी प्रयत्न करतात.

मा.आशा शेंडगे :- मा.महापौर साहेब, आज पठाणताईनी महत्वाच्या विषयाला हात घातलेला आहे परंतु त्याचा शेवट काय. गाडी पकडली, रॅकेट आहे परंतु याचा शेवट काय. मुंढे साहेबांकडे जकात विभागाचे काम आहे त्याठिकाणी स्कॅनिंग मशीन, सीसीटीव्ही कॅमेरे बसवायला पाहिजे असे सांगीतलेले आहे हे तुम्ही का बसवू शकत नाहीत. जकात वाढवायची असेलतर हे करायला पाहिजे ज्या सूचना आम्ही मांडतो त्या सूचना आपल्याला यापुर्वी का सूचलेल्या नाहीत. स्कॅनिंग मशीन लावायला पाहिजे कारण वाळूच्या गाडीत खाली काही ठेवले असेलतर त्यामुळे तुम्हांला समजेल. या जकातचोरावर निर्बंध घातले पाहिजेत. या केलेल्या मागण्या कुठपर्यंत पुर्ण करणार आहात त्याची डेट मुंढे साहेबांनी सांगावी त्यामुळे कुठेतरी फुलस्टॉप लागेल.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, पठाणताईंचे अभिनंदन. मुंढे साहेब चांगले काम करतात का नाहीत, चांगले काम करतात, पण असे असे आहे. ७०० कोटीचे ९०० कोटीवर इन्कम नेले ते चांगले काम करतात. ॲडमिनिस्ट्रेशन ताईट करायला पाहिजे. सीसी टिव्ही कॅमे-या बद्यल किती वर्षापासून चर्चा करतो, आपण ते का बसवू शकत नाहीत. प्रत्येक ठिकाणी सीसी टिव्ही कॅमेरे बसवायला पाहिजे. नाक्यावर बसवायला पाहिजे. नाक्याच्या आत, बाहेर बसवायला पाहिजे. प्रत्येक नाक्यावर ते बसवायला पाहिजे. कनेक्टिव्हीटी आणि मॉनेटरींग हे दोन्हीही व्हायला पाहिजे. अनेक गाडया एस्कॉर्ट भरतात आणि आत मध्ये येतात. सीसी टिव्ही कॅमेरे बसविलेतर हे सर्व माहिती पडणार आहे. सीसी टिव्ही कॅमेरे सर्व जकात नाक्यावर आत आणि बाहेर ताबडतोब बसवावे. किती गाडया आपण पकडतो, ९० टक्के गाडया आपण पकडत नाहीत. टाईमबॉण्डमध्ये सीसी टिव्ही कॅमेरे बसवावे. तसेच सर्वच पिंपरी चिंचवड मनपाच्या ऑफिसेसमध्ये हे कॅमेरे बसवावेत. काही अधिकारी येथे येवून थमइम्प्रेशन करुन निघून जातात. यामुळे सर्व माहिती पडणार आहे. तसेच यामुळे करप्शन कमी होण्याची शक्यता आहे. नाक्यावर कमी प्राईझचे बिल येतात ते आपण चेक करत नाहीत. पुर्वी असे व्हायचे एक कोटीची मशनरी असेलतर आपले कर्मचारी सांगत कशाला एवढे जकात भरता. ५० लाखाचे बील दाखवा व ५० लाखावरच जकात भरा. तरी प्राईझ बरोबर आहे का नाही हे सीसी टिव्ही कॅमेरे बसविल्यानंतर माहिती पडणार आहे. अधिका-यांना लागणा-या सुविधा, मॅनपॉवर द्यायला पाहिजे. तरी हा विषय लवकरात लवकर करुन घ्यावा. दिलेल्या सूचनांचे फालोअप केलेतर येथील रेव्हेन्यू वाढणार आहे.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आज याठिकाणी पठाणताईनी जकातीसंदर्भात प्रश्न विचारलेले आहेत त्या अनुषंगाने जकातीवर सविस्तर चर्चा सर्वच सभासदानी केलेली आहे. प्रामुख्याने जकात विभागामध्ये मुंढे साहेब आले तेंव्हा ७०० कोटीचे जकातीचे उत्पन्न होते. यावर्षी १३०० कोटी पर्यंत जाणार आहे त्यामुळे मुंढे साहेबांनी चांगले काम केलेले आहे, त्यांनी चांगले प्रयत्न केलेले आहेत. सभागृहामधील चर्चेतून जे मुद्ये आले, की नाक्यावरील चो-या थांबविण्यासाठी सीसी टिव्ही कॅमेरे लावावेत, जकातीमधील काही स्टाफ बदलावा काही स्टाफ द्यावा. अशा मागण्या आहेत त्या पुर्ण होत नाहीत. महापौर साहेब तुम्ही आयुक्त साहेबांना सांगून ताबडतोब हा स्टाफ द्यावा. यामुळे जकातीच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकते. या त्रुटिंचा विचार केलातर हे उत्पन्न वाढेल. तीन वर्षाच्या काळात नाक्यावरील उत्पन्न सुध्दा वाढलेले आहे. हे मुंढे साहेबांनी

चांगले काम केलेले आहे. त्यांनी अजून या महापालिकेच्या जकात विभागामध्ये काम करावेत. शासकीय सेवेत आपण जाणार असलातरी आपल्या पुढे नवीन चांगले अधिकारी नेमण्याचे आवाहन आहे ते आपल्याला शोधावे लागेल. अशा पध्दतीने उत्पन्न टिकविण्यासाठी सक्षम अधिकारी त्याठिकाणी नेमावे लागतील. बजेटला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विषय आलेला आहे त्यामुळे तेथे चर्चा करता येणार नाही. जकातीच्या बरोबर बाकीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने भविष्य काळात प्रयत्न करावे लागतील. भविष्यात कधीतरी जकातीचे उत्पन्न बंद होणार आहे त्यामुळे टॅक्सच्या उत्पन्नामध्ये जास्त लक्ष घालण्यचा भविष्य काळात प्रयत्न करावा लागेल. मागच्या दहा-पंधरा वर्षात काम करतो तसे काम करावयाचे असेलतर हे उत्पन्न वाढवावे लागेल. याठिकाणी मुंढे साहेबांनी जे काम केलेले आहे त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, जकातीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला. ब-याचशा सभासदांनी मत प्रकट केले. मुंढे साहेबांचे याठिकाणी कौतूक केले. पिंपरी चिंचवड मधील पहिली लोक संख्या आणि आताची लोकसंख्या याचा विचार करता आता नवीन बांधकाम झालेले आहेत त्यामुळे जकात वाढली, महसुल वाढलेला आहे. आतापर्यंत त्यांनी किती जणांवर फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत हे सांगावे, व काय काय उपाययोजना केलेल्या आहेत हे आपण आयुक्तांना, सभागृहाला सांगीतले पाहिजे. ही औदयोगिक नगरी वाढलेली आहे त्यामुळे जकातीमधील महसूल वाढलेला आहे. वाढलेली लोकसंख्या व बांधकामाच्या माध्यमातून स्टिल, सिमेंट शहरामध्ये आलेले आहे त्यामुळे महसुलात वाढ झालेली आहे. याठिकाणी उपाययोजना काय केल्या हे सांगीतले पाहिजे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, जकातीच्या संदर्भात बोलत असताना सभागृहाच्या वतीने मुंढे साहेबांचे मनापासून कौतूक करतो, आभार व्यक्त करतो. चांगल्या प्रकारचे सक्षम अधिकारी याठिकाणी काम करत आहेत, जकातीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने त्यांनी चांगले काम केलेले आहे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी सभागृहाच्या वतीने मुंढे साहेबांचे आभार मानते आणि कौतूक करते. जकात विभागामध्ये काम करणे सोपी गोष्ट नाही. आतापर्यंत सांगीतल्याप्रमाणे ते एवढी मोठी कार्यवाही करण्याची दखल घेतात. एखादया कर्मचा-याच्या हातून काही गोष्ट घडलीतर त्या गोष्टीचे दुःख सुध्दा त्या अधिका-यांना होत असते. मी रिक्वेष्ट केलेली आहे हे नवीन सभागृह आहे, महापालिकेमध्ये तुम्ही एक दोन वर्षे असणे आवश्यक आहे. त्यांनी सांगीतले की कितीही काम केलेतरी हा विभाग असा आहे की त्याठिकाणी काहीतरी एखादी गोष्ट घडते आणि त्याची वाईट सुध्दा चर्चा होऊ शकते. त्यांनी या महापालिकेचे बजेट डबल नेऊन ठेवलेले आहे. नागरीक सुध्दा म्हणतात जकातीच्या उत्पन्ना पासून या शहरामध्ये सुविधा निर्माण केलेल्या आहेत त्यासाठी मी मनापासून कौतूक करते. पुर्वी कारकर साहेब होते, आता मुंढे साहेब आहेत. तीन वर्षे पुर्ण झाल्यानंतर तुम्ही जाणार असालतर मी विनंती करेल की या सर्व सुचनांचा विचार करुन व त्यात दुरुस्त्या करुन त्या अंमलात कशा येतील हे पाहिले पाहिजे. सोने, चांदीवरील जकाती बद्यल आपण चांगले काम केलेले आहे. कंपन्यांच्या

बाबतीत ऑडीट चेक करण्याच्या कामास सुरवात झाली. दारुच्या दुकानावरील रजिष्टर चेक केल्यानंतर इतका इतका माल आला हे समजलेले आहे. स्टीलच्या बाबतीतील २८१ प्रकरण हाताळली आहेत. आपल्या शहरातील बिल्डींगा वाढलेल्या आहेत बिल्डर्सचे रजिष्टर चेक करावे त्यांच्याकडे पोहचलेले स्टीलवर किती जकात चुकविली हे समजेल. एवढया एवढया मजली इमारतीला एवढे एवढे स्टिल याठिकाणी आलेले आहे हे समजेल. याप्रमाणे हि तपासणी केलीतर चांगल्याप्रकारे स्टीलच्या बाबतीत जकातीची चोरी झालेली उघड होईल. पठाणताईंचे मी आभार मानते कारण त्यांनी चांगल्या विषयाला हात घातलेला आहे. पुढच्या विषयाला सुरवात करावी.

मा.शेखर ओव्हाळ :- मा.महापौर साहेब, महापालिकेचे उत्पन्न वाढलेले आहे त्याचबरोबर तरुण मुलांना यांच्या मार्फत काही रोजगार देता आलेतर ते द्यावेत. दहा-दहा मुलांच्या संस्था करुन जकात नाक्यावर थांबवून चेकिंग केलीतर त्यातुन आपल्याला समजेल की ज्या मालावर जकात आकारतो तोच खरा माल आहे का. असे केलेतर बरे होईल. तरुण मुलांसाठी असे काही करता आलेतर करावे.

मा.वसंत लोंढे :- मा.महापौर साहेब, जकातचोरी बद्यल ब-याचशा वेळा चर्चा करतो. ज्यांनी धमकीचे फोन केले त्यांचे ख-या अर्थाने नाव समजले पाहिजे. कारण अधिकारी, कर्मचा-यांना संरक्षण दिल्याशिवाय ते चांगले काम करणार नाहीत. जकात नाके सांभाळणारे क्लार्क असल्यामुळे त्यांना अनेक फोन येतात त्यांची नाव समजली पाहिजेत. यापेक्षा जास्त जकात वाढली पाहिजे व मुंढे साहेबांना ज्या ज्या अडचणी आहेत त्या सोडविल्या पाहिजेत. अधिका-यांचे मनोधैर्य वाढविण्याचे काम आपण केले पाहिजे.

मा.अशोक मुंढे (सहा.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दोन-तीन दिवसापुर्वी घटना घडली, वर्तमानपत्रामध्ये बातमी आली. गाडी पकडल्यानंतर जो फोन आला तो फ्लाईंग स्कॉड मधील इन्स्पेक्टरला आलेला होता. आपण पकडलेली गाडी सोडा अन्यथा आपल्याला खलास करु असा फोन आला, म्हणून त्या इन्स्पेक्टरने मला सांगीतले. मी त्यास सांगीतले गाडी सोडायची नाही आणि दंड वसुल करावा, नावा बाबतीत इन्स्पेक्टरनी काही उल्लेख केलेला नाही. ब-याचशा सदस्यांनी जकातीच्या कामा संदर्भात उल्लेख केला काही सूचना केल्या त्या स्वागतार्ह आहेत व त्यामध्ये वाव सुध्दा आहे. उत्पन्न कसे वाढविता येईल याच्या बाबतीत सीसी टिव्ही कॅमे-याची आयडीया मी ठेवलेली होती. त्याच्यावर अभ्यास सुध्दा झाला, सुरवातीला पाच नाक्यावर बसवावे असे सूचविले त्याप्रमाणे डेमोस्ट्रेशन झालेले आहे. कॅमेरे बसविलेतर त्याचा नक्कीच फायदा होईल. जे कॅमेरे बसविणार त्याचे सेंटर कनेक्टिव्हीटी ही जकात विभाग, मा.महापौर कार्यालय यांच्या केबीनमध्ये आणि मा.आयुक्त साहेब यांच्याकडे राहणार आहे. बटन चालू केलेतर सर्व लाईव्ह दिसणार आहे. बिलावर असलेली अमौंट सुध्दा वाचता येणार आहे. यामुळे सर्वांवर वॉच ठेवता येणार आहे. काही कर्मचारी जकात चो-यामध्ये इन्व्हाल्व्ह आहेत का हे सुध्दा समजेल व त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होईल. स्कॅनिंग मशीनचे सुध्दा चांगले आहे, मुंबईमध्ये ही सिस्टीम आहे. त्याठिकाणी आलेला माल स्कॅनिंगवर चेक केला जातो. स्कॅनिंग मशीन्स बसविली पाहिजे त्यासाठी प्रयत्न करता येतील. स्टाफच्या बाबतीत सांगायचे झालेतर शहराचे स्वरुप

विचारात घेता स्टाफची संख्या वाढविणे आवश्यक आहे. नाक्यावर एस्कॉर्ट देण्याचे काम शिपाई कर्मचारी करतात. त्यांना बील कोणते आहे हे समजत नाही. याठिकाणी शिपाई कर्मचा-यांऐवजी क्लार्क नेमता येतील व हेच काम संगणकावर करता येईल. फ्लांईंगच्या एकूण दहा गाडया आहेत त्यापैकी पाच गाडया मोठया नाक्यावर असतात व उरलेल्या पाचचे मी पॉकिट तयार केले आहे या फ्लाईंगच्या गाडया दुसरीकडे जाणार नाहीत याची व्यवस्था केली आहे. तरी हे पाच ऐवजी दहा पॉकिट करणे आवश्यक आहे त्यामुळे चोरीच्या गाडया पकडता येईल. आपली महापालिका इतर महापालिकेच्या दृष्टिने वेगळी आहे, आपल्याकडे फार मोठी इंन्डस्ट्री आहे. एक महिन्यात २०० गाडया पकडल्यातरी या कंपन्याची जकातचोरी ही शंभर टक्के सापडत नाही. यासाठी स्पेशल स्कॉड तयार केला पाहिजे. आणखीन दहा ते वीस इन्स्पेक्टर दिलेतर त्यांचे ग्रूप पाडून कंपनीने जकात चोरी केली असेलतर त्या कंपनीकडे जाऊन त्यांचे रजिष्टर तपासल्यानंतर फार मोठा जकात उत्पन्नावर परिणाम होणार आहे. रेल्वे स्टेशनवर प्रत्येकवेळेत गाडी येते, माल उतरतो. त्याठिकाणी एक दोन लोक ठेवलेतर तेथून माल घेवून चाललेल्या लोकांना आडविता येईल. स्टील, सिमेंट, वाळू, खडी असे त्यात सूचविलेले आहे. आपल्या बांधकाम विभागाला त्याचे गणीत येते. एक स्क्वे.फुट बांधकाम करायचे असेलतर किती मटेरिअल लागेल याची माहिती आपल्याला मिळालीतर त्यानुसार बिल्डरला कळविणार. एक स्किम तयार केली त्यावर किती मटेरिअल वापरले त्याची तपासणी करुन विसंगती आढळून आलीतर त्यांना कळविता येईल. हे झालेतर निश्चितपणे उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. फौजदारी केलेली नाही त्याबाबतीत मी माहिती घेतो, फोन मला आलेला नाही.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, मुंढे साहेबांनी या माध्यमातून त्यांच्या सूचना अडचणी सभागृहापुढे मांडलेल्या आहेत. १०० टक्के जकातीचे उत्पन्न वाढविण्यासाठी सूचना केलेल्या आहेत त्या स्वागतार्ह आहेत. त्यामधील जे मुद्दे आहेत त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदेश द्यावेत. आम्ही जी मागणी करतो, या गोष्टी अडविण्यासाठी प्रयत्न करतो, ते सांगत नाहीत हे संशयास्पद आहे. याचा अर्थ गुंड सभागृहाबाहेरील असेल किंवा आमच्या मधील असेल. फोन आला तर तो टॅप करु शकतो, तो नंबर मिळू शकत नाही हे योग्य वाटत नाही. हे कुठेतरी लपविता. या गोष्टी वारंवार घडतील तुमच्या आदेशाप्रमाणे त्यानी दंड आकारला त्या कर्मचा-याचे काय. तुमची बदली झालीतर त्या कर्मचा-यांचे काय. तुम्ही जबाबदार अधिकारी म्हणून फौजदारी त्या फोन नंबरवर दाखल करावी. सभागृहात सांगायचे नसेलतर महापौरांना, आयुक्तांना नंबर सांगून फौजदारी दाखल करावी असे सांगते.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, याठिकाणी स्पष्टीकरण दिलेले आहे. एस्कॉर्टचे २०० पासेस एक दिवसात जातात त्याची नोंद आपल्याकडे झाली म्हणतो, तेथे सेटलमेंट होते ते तपासण्यासाठी पाठवितो यावर काही कारवाई केली का. देहूरोडवरुन गाडया जातात तेथील नोंद आणि आपली नोंद टॅली केली का.

मा.अशोक मुंढे (सहा.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, देहूरोडच्या विषया बाबत टॅली करता येईल परंतु सेटलमेंटचा विषय समजलेला नाही.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, जुने जाणते अनुभवी लोक, दहा-पंधरा वर्षाचे ज्येष्ठ कर्मचारी एकाच ऑफिसमध्ये काम करणारे लोक आहेत. ते एखादयाला ५० लाखाची जकात बसविली आणि ती जास्त आहे, अमान्य आहे असे त्यांचे पत्र आलेतर हे लोक आपल्या मर्जीतील कर्मचा-यांना तेथे पाठवून ५० लाखाचे ५ लाख करतात व ते कंपनीलाही मान्य होते त्याबाबत आपल्या नजरेस काही गोष्टी आलेल्या आहेत का. का आम्ही निदर्शनास आणून देवू, माझ्याकडे डिटेलमध्ये आहे. याबाबतीत आता आपण सांगु शकत नसालतर त्याबाबतीत योग्य ती काळजी घ्यावी. मी तुम्हांला भेटेल त्यावेळेस मला याचे स्पष्टीकरण द्यावे. माहिती घेवून नंतर सांगावे.

मा.महापौर :- मुंढे साहेब आपण आयुक्तांना आणि मला भेटून याबाबत सविस्तर माहिती द्यावी. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे, पुढील विषय घ्यावा.

मा.सीमा फुगे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- १
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.विनया तापकीर, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२९२ दि.१७/४/२०१२

स्वाधार या सामाजिक संस्थेचे काम विचारात घेता कुंदननगर, फुगेवाडी शाळा येथिल २ खोल्या व पिंपळे गुरव परिसरातील भैरवनाथ मंदिराजवळील तळमजल्यावरील २ खोल्या मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडेदराने ५ वर्षे कालावधीकरीता भाड्याने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.शुभांगी लोंढे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
कुंदननगर, फुगेवाडी शाळा येथील २ खोल्या वगळून भाडयाने देण्यात यावे.

मा.नारायण बहिरवाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.सीमा फुगे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ३९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.विनया तापकीर, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२९२ दि.१७/४/२०१२

स्वाधार या सामाजिक संस्थेचे काम विचारात घेता पिंपळे गुरव परिसरातील भैरवनाथ मंदिराजवळील तळमजल्यावरील २ खोल्या मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडेदराने ५ वर्षे कालावधीकरीता भाड्याने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-९९ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २

दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.चंद्रकांत वाळके, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३९८ दि. २४/४/२०१२

संत तुकाराम भाजी मंडई येथील गाळा क्र. १७ अफरोजबानू सलीम खान यांस मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सविता साळूंके :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-
बर्ड व्हॅली संभाजीनगर येथील गाळे धनंजय कुलकर्णी (मतिमंद), सुमीत साळुंके (अपंग), चंदा भस्मे (विधवा), वर्षा भालेराव, अनिल बढे, युवराज नेवगे व प्रविण यादव यांना मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यासाठी व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत यावी.

मा.मंदाकिनी ठाकरे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
संत तुकाराम भाजी मंडई येथिल उर्वरित रिकामे गाळे मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन, मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यासाठी व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत यावी.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.योगेश बहल, मा.अजित गव्हाणे यांची व मा.सविता साळूंके, मा.मंदाकिनी ठाकरे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमाक :- ४० विषय क्रमांक :- २
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.चंद्रकांत वाळके, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३९८ दि. २४/४/२०१२

संत तुकाराम भाजी मंडई येथील गाळा क्र. १७ अफरोजबानू सलीम खान यांस मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. संत तुकाराम भाजी मंडई येथिल उर्वरित रिकामे गाळे मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन, मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यासाठी व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. बर्ड व्हॅली संभाजीनगर येथील गाळे धनंजय कुलकर्णी (मतिमंद), सुमीत साळुंके (अपंग), चंदा भस्मे (विधवा), वर्षा भालेराव, अनिल बढे, युवराज नेवगे व प्रविण यादव यांना मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या लीज दराने व योग्य त्या अटी शर्तीवर २५ वर्षे कालावधीसाठी लीजने देण्यासाठी व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनूकूल-९९ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.नंदा ताकवणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.सावा/२/कावि/१०४/२०१२दि.२५/४/१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.४४० दि. २/५/२०१२

वाचक व अभ्यासकांची मागणी पाहता पिंपरी-चिंचवड मनपाच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन, यमुनानगर येथील स्पर्धा परीक्षा केंद्र व वाचनालयातील कामकाज तात्पुरत्या उपविधीतील नियमांच्या आधारे सुरू करावयाचे असल्याने त्यास व तसेच स्पर्धा परिक्षा केंद्र व वाचनालयामध्ये सभासदत्व देणेकरिता

प्रवेश फी र.रू.५०/- [र.रू.पन्नास] अनामत र.रू.१,०००/- [र.रू.एक हजार] व मासिक वर्गणी र.रू.१००/- [र.रू.शंभर] असे शुल्क निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.शुभांगी बो-हाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या विषयाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये खुलासा पाहिजे. या महापालिका क्षेत्रामध्ये किती वाचनालय आहेत आणि त्या वाचनालयामध्ये असलेल्या कर्मचा-यांची संख्या किती आहे आणि वाचनालयामध्ये येणा-या वाचकांची संख्या किती हे सभागृहामध्ये सांगावे व चालू स्थितीमध्ये किती वाचनालय आहेत याची संख्या सांगीतल्यानंतर बोलण्यास संधी द्यावी.

मा.गायकवाड (जनतासंपर्क अधिकारी) :- मा.महापौर साहेब, सन्मा.सदस्यांनी जी माहिती मागीतली त्यामध्ये जे वाचनालय आहेत त्यात भैरवनाथ वाचनालय भोसरी येथे दोन कर्मचारी आहेत ८७ सभासद संख्या आहे व ६९८६ पुस्तके आहेत. हुतात्मा चाफेकर चौक चिंचवड येथील वाचनालयामध्ये १२० सभासद संख्या आहे व ७ हजार पुस्तके आहेत. पिंपरीवाघेरे येथे १२८ सभासद आहेत व १०३२० पुस्तके आहेत. संततुकारामनगर मध्ये १२० सभासद संख्या आहे, सांस्कृतीक भवन, संततुकारामनगर येथे ५७ सभासद संख्या आहे. आकुर्डी-निगडी येथे ११० सभासद संख्या, यमुनानगर मध्ये ११५ सभासद संख्या आहे. संभाजीनगर येथे १३० सभासद संख्या आहे. प्रेमलोकपार्क चिंचवड येथे ४९ सभासद संख्या आहे. थेरगाव येथे ३२ सभासद संख्या आहे, पिंपळेनिलख येथे १५ सभासद संख्या आहे, पिंपळेगुरव येथे ५७ सभासद संख्या आहे, सांगवी येथे ८३ सभासद संख्या आहे. महात्मा फुले वाचनालय खाजगी संस्थेला चालविण्यासाठी दिलेले आहे. कर्मचारी वाचनालय कामगार भवन याठिकाणी ८६ सभासद संख्या आहे. ग्रंथपाल, लिपिक, शिपाई असे एकूण अस्थापनेवरील कर्मचारी ३२ आहेत व १६ वाचनालय आहेत.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या वाचनालयाची माहिती एवढयासाठी मागीतली की वाचकांची संख्या जवळपास १६ वाचनालयापैकी संभाजीनगर वाचनालयामध्ये १३० आहे. वाचनालयामध्ये जाणारा नागरीक या शहरातील करदाता आहे. परंतु वाचनालयाची अवस्था बघितलीतर त्याठिकाणी बसण्यासाठी बाकडे नाहीत, वाचण्यासाठी व्यवस्था नाही, जे पुस्तके आहेत ते सुध्दा बरीचशी जुनी आहेत, फाटलेली आहेत. आपण नव्याने पुस्तके घेतो ते घेत असताना ते चांगल्या स्थितीमध्ये परत येतात का नाहीत हे सुध्दा पाहिले पाहिजे. ३२ कर्मचारी १६ वाचनालयामध्ये काम करतात. माझा अनुभव असा आहे की हे कर्मचारी दोन ते तीन तास येतात अन्यथा वाचनालयामध्ये कर्मचारी नसतात अशी अवस्था आहे. याचा विचार केलातर महापालिका यावर लाखो रुपये खर्च करते. महापालिकेच्या वाचनालयाची परिस्थिती पाहता नागरीक वाचण्यासाठी जात नाहीत असे या संख्येवरुन दिसते. याठिकाणी अनेकवेळा हा विषय आला, सुधारणा करण्यासाठी सांगीतले होते परंतु हि दुर्दैवाची बाब आहे या शहरातील नागरीकांना वाचण्यासाठी वाचनालय केलेली आहेत त्यासाठी महापालिका सुविधा पुरवत नाही हि दुर्दैवाची बाब आहे. ब-याचशा ठिकाणी रंगरंगोटी नाही, लाईट नाही अशी

अवस्था आहे आणि म्हणून जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांच्या हे लक्षात यायला पाहिजे व तशाप्रकारच्या आपण सूचना द्याव्यात. चार-दोन वाचनालयामध्ये जाऊन पाहणी केलीतर समजेल. या शहरात राहणा-या वाचकांची संख्या मोठया प्रमाणावर आहे परंतु तो महापालिकेच्या वाचनालयामध्ये जात नाही, त्याने महापालिकेच्या वाचनालयामध्ये जावे यासाठी तेथे लागणा-या सुविधा दिल्या पाहिजेत. ज्येष्ठ नागरीक तक्रारी करतात, त्याठिकाणी चांगल्याप्रकारची पुस्तके नसतात, वाचनालय दुस-या तीस-या मजल्यावर आहे ते तळमजल्यावर खाली पाहिजेत.

मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, आता सांगीतलेले खरे आहे. कारण पिंपरी चिंचवड मध्ये वाचकांची संख्या खुप आहे परंतु वाचनालयाची दुरावस्था असल्यामुळे त्याठिकाणी नागरीक जात नाहीत. प्रायव्हेट वाचनालयामध्ये नोंदणी करतात. आपले १६ वाचनालय आहेत व ३२ कर्मचारी आहेत. चिंचवड गावातील वाचनालय आहे त्याठिकाणी एक आठवडयापुर्वी मर्डर झाला तेथे कर्मचारी आहेत का नाहीत. कर्मचारी कुठे असतात हे वाचनालयामध्ये घडते याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्याठिकाणी मर्डर होतो. लाईट नाही, बसण्यासाठी बाकडे नाहीत त्यामुळे वाचकांची संख्या कमी आहे याचा विचार व्हावा.

मा.सुजाता पालांडे :- मा.महापौर साहेब, वाचन हा विषय महत्वाचा आहे. वाचनाची आवड जोपासणे, निर्माण करणे हे वेगवेगळया प्रकारचे तीन विषय आहेत. १६ वाचनालय आणि ३२ कर्मचारी आहेत. वाचण करणारे लोक वाढविणे महत्वाचे आहे. संततुकारामनगर मध्ये दोन वाचनालय आहेत व १२० सभासद आहेत. तेथील पुस्तकांची अवस्था पाहिलीतर जुन्या पध्दतीचे पुस्तके आहेत. आताची पिढी आहे त्यांना वाचण्याची आवड आहे परंतु त्यांना पाहिजे ते पुस्तक त्याठिकाणी उपलब्ध करुन दिलेले नाहीत. शैक्षणिक पुस्तक असो किंवा कुठल्या टेक्नॉलॉजीचे पुस्तके असो ते त्याठिकाणी पाहिजेत. गरीब मुलांना पुस्तके मिळत नाहीत अशा पध्दतीचे पुस्तक त्याठिकाणी उपलब्ध करुन दिलेतर बरे होईल. वाचनालय संपल्यानंतर त्याठिकाणचा अभ्यासीका म्हणून उपयोग केलातर चांगले होईल.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, वाचनालय किती व कर्मचारी किती आहेत हे सांगीतले आहे. नागरीक सांगत असतात की त्याठिकाणी कर्मचारी नाहीत. नको ते माणस त्याठिकाणी आहेत. त्याठिकाणी सफाई होत नाही. सगळयात चांगले वाचनालय संभाजीनगरमध्ये आहे. ते चांगले करुन घेण्यासाठी आमचे नागरीक कार्यक्षम आहेत त्यामुळे ते वाचनालय खुप चांगले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सीईटीचे पुस्तक मागीतले होते त्याचा ठराव सुध्दा झालेला होता ते उपलब्ध केले नाहीत. गोरगरीब विद्यार्थ्यांना ते घेणे शक्य नसते. जे टेंडर काढलेले आहे त्यात ते नाहीत. पुस्तकवाल्यांचे पेमेंट वर्षानुवर्ष होत नाही ते कसे काय सप्लाय करतील. वर्षानुवर्ष बील दिली जात नाहीत. सगळा सावळा गोंधळ आहे. जे जे ज्येष्ठ नागरीक संघ आहे व ज्येष्ठ नागरीक म्हणत असतील आम्ही हे वाचनालय चालविण्यासाठी घेतोतर ते दिल्यास तेथील कर्मचा-यांच्या पगाराएवढे तेथे पुस्तक विकत घेता येतील. प्रत्येक वॉर्डामध्ये विरंगूळा केंद्र आहे. ज्येष्ठ नागरीक संघाला ते चालविण्यसाठी मिळावे. एक क्लार्क, सफाई

कर्मचारी, शिपाई यांचा पगार बघता ज्येष्ठ नागरीकांना वाचनालय चालविण्यासाठी द्यावे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- जेष्ठ नागरिक संघास मागणीनुसार वाचनालये दरमहा र.रु.७,०००/- मानधन देवून चालविणेस देणेस मान्यता देणेत यावी.

मा.सविता साळूंके :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

मा.नंदा ताकवणे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ४१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.सावा/२/कावि/१०४/२०१२दि.२५/४/१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.४४० दि. २/५/२०१२

वाचक व अभ्यासकांची मागणी पाहता पिंपरी-चिंचवड मनपाच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन, यमुनानगर येथील स्पर्धा परीक्षा केंद्र व वाचनालयातील कामकाज तात्पुरत्या उपविधीतील नियमांच्या आधारे सुरू करावयाचे असल्याने त्यास व तसेच स्पर्धा परिक्षा केंद्र व वाचनालयामध्ये सभासदत्व देणेकरिता प्रवेश फी र.रू.५०/- [र.रू.पन्नास] अनामत र.रू.१,०००/- [र.रू.एक हजार] व मासिक वर्गणी र.रू.१००/- [र.रू.शंभर] असे शुल्क निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे. जेष्ठ नागरिक संघास मागणीनुसार वाचनालये दरमहा र.रु.७,०००/- मानधन देवून चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.अनुराधा गोफणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ४
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/१०४२/२०११ दि.२१/१२/२०११
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४ दि.७/५/२०१२

महाराष्ट्र नागरी सेवेमधील तरतूदीचा विचार करता डॉ.श्री. रोकडे पी.डी. यांची मनपामध्ये दिनांक १२/११/२०११ रोजी ४ वर्षाची प्रतिनियुक्तीवरील सेवा पूर्ण होत असल्याने डॉ.रोकडे यांचे शासन सेवेमध्ये प्रत्यावर्तन करणे आवश्यक आहे तथापि शासनाकडून पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत डॉ.रोकडे यांना मनपा सेवेमधून कार्यमुक्त न करता शासन मनपासाठी पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देईल त्या कालावधीपर्यंत डॉ.रोकडे यांना मान्यता व उर्वरित वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनवणे व डॉ.मदने यांना दिनांक २५/०८/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.स्वाती साने :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शहर अभियंता व सह शहर अभियंता या पदनामाची पदे एकाच संवर्गातील व एकच वेतनश्रेणी रक्कम रु.१५६००-३९१०० मध्ये मंजुर असून त्यांस शासन मान्यता आहे. सदरपैकी शहर अभियंता हे पद सध्या रिक्त असून शहर अभियंता या पदावर व रक्कम रु.१५६००-३९१०० या वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या श्री.एम.टी.कांबळे यांची शहर अभियंता या पदावर नेमणुकीस मान्यता देणेत यावी. तसेच याकामी आवश्यक शासनमान्यतेबाबतची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १,२ व ३ चे अधिकारी व कर्मचारी यांचे निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करणेबाबत प्रस्ताव शासनाला सादर केला आहे. परंतु श्री.सुभाष काळे-नगरसचिव, श्री.डॉ.राजशेखर अय्यर-वैद्यकिय संचालक व श्री.विलास भोसले - मुख्यलेखापाल हे ३१ मे.२०१२ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग महापालिकेस व्हावा म्हणून त्यांना १ वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देणेत यावी.

मा.शत्रुघ्न काटे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, शहर अभियंत्याचा विषय उपसूचनेद्वारे अतीशय चुकिचा मांडलेला आहे. या शहरात शांताराम गराडे, शहर अभियंता होते. त्यांचा विषय अशाच पध्दतीने सभागृहामध्ये झाला, त्यामुळे जे शहर भोगतयं ते पुन्हा भोगायला लागू नये. या शहरात उगीले साहेबांनी चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे. सभागृहाला विनंती राहिल आपली ही चुक या संपुर्ण शहराला भोगावी लागते. या सभागृहात आम्ही कोणी असू किंवा नसू परंतु याठिकाणी काम करणारे हे सक्षम असावे लागतात. सिटि इंजिनिअर हे पद या शहराच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे पद आहे. चुकिच्या पध्दतीने विषय मांडले जावुन चुकिच्या पध्दतीने काम करुन घ्यायचे असे चाललेले आहे. माझा या विषयाला विरोध आहे.या शहराच्या भवितव्याचा विचार करुन काम केले पाहिजे. आपले पाशवी बहुमत आहे, आपण पाशवी बहुमताच्या जोरावर हा विषय करुन घेताल परंतु या शहरात चुकिच्या पध्दतीने काम होते हे पाहिले पाहिजे. मागचे सिटि इंजिनिअर गराडे यांना प्रमोशन दिले होते. त्यांच्या काळात नियोजनशुन्य काम या महापालिका क्षेत्रात झालेले आहे. भविष्यामध्ये अशाप्रकारचे काम होऊ नये याचा विचार करुन

पुढच्या महापालिका सभेमध्ये हा विषय आणावा. उल्हास शेट्टी यांना माझी विनंती राहिल की आपण मांडलेली उपसूचना मागे घ्यावी व शासनाचा सक्षम अधिकारी मिळालातर बघावे. एम.टी. कांबळे यांना माझा विरोध नाही परंतू चुकिच्या पध्दतीने सिटि इंजिनीअरची जबाबदारी त्यांच्यावर सोपवितो. ही जबाबदारी ते पेलू शकणार नाहीत, असा माझा गेली पंधरा वर्षाचा अनुभव आहे. व्यक्तिगत वाद नाही परंतु चुकिच्या पध्दतीने विषय होतो त्याला विरोध आहे. चुकिच्या पध्दतीने या महापालिकेचा कारभार करु नये. याला माझा व्यक्तिशः विरोध राहील. हा पुढच्या महिन्यात विषय घ्यावा. याची दादांना सविस्तर माहिती सांगावी, या शहराचा कारभार चांगल्या पध्दतीने होण्यासाठी सक्षम माणूस याठिकाणी बसला पाहिजे अशी इच्छा आहे. आणि जो विषय उपसूचनेद्वारे मांडलेला आहे तो माघारी घ्यावा.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, आताच माझे सहकारी उल्हास शेट्टी यांनी दोन उपसूचना दिलेल्या आहेत. पहिली उपसूचना माघारी घेणार असालतर दुसरी सुध्दा उपसूचना माघारी घेतली पाहिजे. रिटायरमेंटचे वय झालेले आहे त्यांना परत घेणार असे आपण कायद्याने करु शकतो का आणि असे असेलतर हे शासनास विचारणार का नाहीत. यांच्या रिटायरनंतर दुस-या क्रमांकाचे लोक आहेत त्यांनी वाट बघायची का. यांना रिटायर होऊन जाऊ द्यावे व परत सल्लागार म्हणून घ्यावे. तुमच चांगभल म्हणणारे लोक याठिकाणी घेता. माझा या विषयाला विरोध आहे. जे रिटायर होणार आहेत त्यांना पहिले रिटायर होऊ द्यावे व नंतर सल्लागार म्हणून विषय सभागृहापुढे यावा.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, आप्पांनी विचार करुन बोलावे, बहुमत आहेच. यापुढे यावर चर्चा होणार नाही हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा. पाशवी हा शब्द चुकिचा आहे. आम्ही मांडलेले मत स्पष्ट आहे. एखादया विषयावर मत व्यक्त करण्यासाठी सांगीतले, स्पष्टीकरण द्या म्हणलेतर काळे साहेब लगेच नाही म्हणत नाहीत. आम्हांला काळे साहेबांची आवश्यकता आहे. त्यांच्यासारखे काम दुसरे सुध्दा करतील. त्यांच्या बरोबर दुसरेही रिटायर होतात त्यांच्यासाठीही विषय करतो. शासनाचा निर्णय आपण बदलू शकत नाहीत हे मलाही माहित आहे. तुमच्या समोर विषय ठेवलेला आहे, आम्ही बहुमताने विषय मंजूर करतो त्यास विरोध असेलतर तो नोंदवावा व सर्वांनी हा विषय मंजूर करावा.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, आप्पांनी या विषयाला स्पर्श केला. उपसूचना मांडण्याची पध्दत आहे ती विकास कामाच्या संदर्भात योग्य आहे परंतु पदोन्नती, रिटायरमेंट यासंदर्भात उपसूचना मांडणे म्हणजे कायद्याची फार मोठी थट्टा केल्यासारखे आहे. कायद्यान्वयेच सेवानिवृत्ती आहे त्या रिटायरमेंटला आपण चॅलेंज करतो. शासनामधील व्यक्ति रिटायर होतात, त्यांची रिटायरमेंट का केली जाते कारण त्यांची काम करण्याची शारीरीक क्षमता राहत नसते म्हणून कायद्याने रिटायर केले जाते. अशा पध्दतीने कायद्याला बाजूला ठेवून अवैद्य पध्दतीने पदोन्नती देतो हे करणे योग्य नाही. शहराच्या विकासाच्या प्रश्ना बाबत आप्पानी सूचना केलेल्या आहेत. ही स्पर्धा शहराच्या विकासामध्ये दाखविलीतर १७ लाख नागरीकांच्या आशा आहेत, त्यांना या

स्पर्धेमध्ये नुकसान होईल असे वाटते. ज्या पध्दतीने उपसूचनेद्वारे नियुक्ति करतो त्याला आमच्या सर्वांचा, व्यक्तिशः माझा विरोध आहे. ही पदे भरावीत असे सांगतो. या विषयी आम्ही न्यायालयामध्ये सुध्दा जाऊ. आपण कायद्याची हेळसांड करु नका.

मा.अमीना पानसरे :- मा.महापौर साहेब, आताचा जो विषय आहे त्याबाबत आप्पांना सांगू इच्छिते की, एम.टी.कांबळे यांनी चांगले काम केल्यामुळे त्यांचे कौतूक केले आहे अशा लोकांना आपण तेथे बसवू शकत नाहीत आणि शासनाच्या लोकांना बसवितो. आपल्याकडेही चांगले लोक आहेत. शासनाचे का बोलवायचे, आपल्या लोकांकडून चांगले काम होऊ शकते. डॉ.अय्यर यांनी सांगीतले होते मी कंटाळलो आहे, आम्हीच त्यांना सांगीतले तुम्ही थांबावे म्हणून. त्यांचे काम चांगले आहे. आम्ही सदस्य लोकच त्यांना परत याठिकाणी मागतो. आपले लोक चांगले काम करत असताना शासनाचे लोक का मागवायचे. एम.टी.कांबळे यांचे चांगले काम आहे त्यांना हे पद द्यावे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, पठाणताई आता बोलल्या त्यामध्ये आपले बहुमत आहे. परंतु यापुढे चर्चा होणार नाही हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली यालाच पाशवी बहुमत म्हणतात. तुम्ही केलेल्या चुकिच्या कामासाठी कमी संख्येने का होईना आम्हांला नागरीकांनी पाठविलेले आहे. आप्पांचे बोलणे यापुर्वी सभागृहाने ऐकलेले आहे. त्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात. एम.टी.कांबळे साहेब, काळे साहेब, डॉ.आय्यर साहेब, व्ही.टी.भोसले साहेब असतील या सगळयांनी एवढे वर्षे आपल्या महापालिकेत काम केलेले आहे त्यांचे चांगले नांव आहे. याठिकाणी त्यांचा अशाप्रकारचा विषय आणून त्यावर चर्चा करायची म्हणजे हा त्यांचा अपमान आहे असे वाटते. या विषयी जो निर्णय घ्यायचा आहे तो आयुक्तांनी, महापौरांनी आणि सभागृहाने घ्यावा आणि ही चर्चा याठिकाणी थांबवावी. ज्यांनी विषय मांडला त्यांनी त्यांना विचारुन हा विषय आणला का, नाही. डॉ. आय्यर साहेब रिटायरमेंटची वाट पाहतात. याबाबत त्यांच्या बरोबर चर्चा केली आहे का नाही. एम.टी.कांबळे साहेब पाणीपुरवठयामध्ये आल्यानंतर शहरामधील पाणीपुरवठा सुरळीत झालेला आहे. त्यांच्यासाठी शहर अभियंताचा ठराव करायचा होतातर ज्येष्ठ नगरसेवकांबरोबर चर्चा करायला पाहिजे होती. राष्ट्रवादी सदस्यांच्या पाशवी बहुमताने उपसूचनेद्वारे ठराव करायचा यालाच पाशवी बहुमत म्हणतात. आमच्या बरोबर चर्चा न करता असे विषय केलेतर आमचा विरोध राहिल. अधिकारी सन्मानाने चालले आहेत त्यांना सन्मानाने जाऊ द्यावे व परत हा विषय सन्मानाने आणावा अशी मी विनंती करते.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, माझी सर्व नगरसेवकांना मनापासून विनंती आहे की, अधिका-यांच्या विषयावर बोलत असताना आपण नेहमीच आजपर्यंत चांगली भूमिका घेतलेली आहे. कोणतेही अधिकारी असो, शासनाच्या अधिका-यांना चार-चार वर्षे झालेले असताना येथे ठेवलेले आहे. त्यांच्या चांगल्या कामाचा आदर केलेला आहे. आप्पांनी सांगीतले एम.टी.कांबळे यांच्या विषयी रोष नाही, त्यांचे त्यांच्या विषयीचे मत वाईट नाही, चुकिचे बोलायचे नाही असे त्यांचे मत आहे व दुस-या बाजुला त्यांच्या मनात खंत अशी असणार शहर अभियंता सारख्या पदावर उच्च शिक्षीत किंवा चांगल्या अनुभवाचा माणूस असावा असा त्यांचा हेतू असेल. आपल्या महापालिकेत असे अनेक अधिकारी

झालेले आहेत की ज्या लोकांनी क्लार्क पासून कामाची सुरवात केली आहे. अमृत सावंत आज चांगल्या पदावर काम करतात असे अनेक अधिकारी आहेत असे असताना आपण आपल्यामध्ये मतभेद निर्माण करु नये. काही जरी ठराव केला तरी शासन निर्णय घेणार आहे. याचा विचार शासन करेल. दादा सुध्दा या गोष्टीची पडताळणी करुन निर्णय घेतील. आमचे बहुमत आहे म्हणून आम्ही काहीही निर्णय घेणार नाहीत. डॉ. नागकुमार यांचा ठराव केला तो शासनास पाठविला तो शासनाने मान्य केला का, नाही केला. राज्यशासनाने त्यास मान्यता दिलेली नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेनी अशा पध्दतीने पाठविलेल्या निर्णयाची अंमलबजावणी राज्यशासनाने केलीतर संबंधीत राज्यामध्ये तशाप्रकारचे निर्णय घेणे शासनाला भाग पडेल. आपल्या निर्णयाचे स्वागत केलेतर संपुर्ण राज्यामध्ये त्याचे स्वागत होणार आहे. चांगल्या अधिका-यांना न्याय मिळेल. याठिकाणी कार्यक्षम अधिकारी असल्यामुळे त्यामध्ये आपल्याला वाईट वाटण्याचे कारण नाही. आपण कायदा सोडलेला नाही. कायद्याच्या चौकटीमध्ये बसून केलेले आहे, हा रितसर मांडलेला विषय आहे. उपसूचनेद्वारे असे अनेक विषय केलेले आहेत. उपसूचनेद्वारे मुदतवाढीचा आणि एम.टी.कांबळे यांच्या नावानिशी ठराव केलातर त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार राज्यशासनास आहेत. राज्यशासन जोपर्यंत मान्यता देत नाही तोपर्यंत आपण आपसात चर्चा करुन दुफळी निर्माण न करता आहे तसा उपसूचनेसह विषय मंजूर करावा.

मा.आशा शेंडगे :- मा.महापौर साहेब, सेवानिवृत्तींच्या मुदतवाढी बद्यल बोलतो. प्रत्येकास सेवानिवृत्त व्हायला पाहिजे आणि पुन्हा सल्लागार म्हणून मानाने यावे. शासनाकडून या सगळया गोष्टी रितसर याव्यात. काळे साहेब गेल्यानंतर त्याठिकाणी जी पोकळी निर्माण होणार आहे, त्यासाठी पुर्वीपासूनच कार्यक्षम अधिकारी तयार केला असतातर असा विषय पुन्हा आला नसता. येथून पुढे ज्या ज्या विभागाची अशी पोकळी निर्माण होईल त्या त्या विभागाच्या अधिका-यांना कार्यक्षम केले पाहिजे. ही पोकळी निर्माण होऊ नये, व चुकिचे अधिकारी त्याठिकाणी बसू नयेत याची दखल घ्यावी. असा विषय येणे म्हणजे आपल्या सभागृहाचा आपण नकळत अपमान केल्यासारखे आहे असे सांगते.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, मगाशी बोलताना पठाणताईनी उल्लेख केलेला आहे. पाशवी हा शब्द कायद्याच्या चौकटीमध्ये बसत नाही असे नगरसचिवांनी सांगावे. मी याठिकाणी भान ठेवून बोलतो. कोणाला कसे शब्द वापरायचे हे मला माहित आहे. मी योगेश बहल यांच्या मताशी सहमत आहे. एम.टी.कांबळे यांच्या विषयी राग नाही, द्वेष नाही. परंतु, एकदा निर्णय घेतलातर तो चिरकाल राहतो. शासनाच्या अधिका-यानी चुकिचे काम केलेतर त्यांना शासनास परत पाठवितो परंतु चुकिच्या माणसास प्रमोशन दिलेतर त्यांना त्या पदावरुन काढता येत नाही. अशी घटना याठिकाणी झालेली आहे. गराडे यांचाही व्यक्तिशः राग नाही. परंतु या महापालिकेच्या इमारतीचे तरी त्यांनी परमिशन घेतले आहे का. किती इमारती बांधलेल्या आहेत, महापालिका क्षेत्रामध्ये किती चुकिचे काम केलेली आहेत हे सुध्दा तपासून पाहिले पाहिजे. शेवटी निर्णय घेत असताना आपण शहराच्या दृष्टिने निर्णय घेत असतो. महापालिकेचा निर्णय भविष्यात या शहराला घातक ठरु नये. या शहरात घेतलेले निर्णय निश्चितपणे भविष्यात घातक होणार आहेत याची मला चाहूल लागते म्हणून मी सांगतो. कोणीतरी कोणाच्या घरी

जाऊन हजेरी लावतात म्हणून त्यांना प्रमोशन मिळते व ते या सभागृहात होते ते होऊ नये, चांगल्या माणसावर अन्याय होऊ नये. तुमचे बहुमत आहे, बहुमताच्या जोरावर विषय मारुन नेताल परंतु माझे परखड म्हणणे मी मांडतो. सिटी इंजिनिअर म्हणून एम.टी.कांबळे यांच्या उपसूचनेला मी विरोध केलेला आहे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, याला व्यक्तिगत असा विरोध नाही परंतु ज्या पध्दतीने आपल्या महापालिकेमध्ये मनपाचे जे काही अधिकारी आहेत त्यांना त्या पदावर बाहेरचे अधिकारी येत नाहीत तोपर्यंत पुढचा विषय ठेवलेला असतो. हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

मा.अनुराधा गोफणे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ४२ | विषय क्रमांक :- ४ |
| दिनांक :- १९.५.२०१२ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/१०४२/२०११ दि.२१/१२/२०११
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४ दि.७/५/२०१२

महाराष्ट्र नागरी सेवेमधील तरतूदीचा विचार करता डॉ.श्री. रोकडे पी.डी. यांची मनपामध्ये दिनांक १२/११/२०११ रोजी ४ वर्षाची प्रतिनियुक्तीवरील सेवा पूर्ण होत असल्याने डॉ.रोकडे यांचे शासन सेवेमध्ये प्रत्यावर्तन करणे आवश्यक आहे तथापि शासनाकडून पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत डॉ.रोकडे यांना मनपा सेवेमधून कार्यमुक्त न करता शासन मनपासाठी पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देईल त्या कालावधीपर्यंत डॉ.रोकडे यांना मान्यता व उर्वरित वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनवणे व डॉ.मदने यांना दिनांक २५/०८/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शहर अभियंता व सह शहर अभियंता या पदनामाची पदे एकाच संवर्गातील व एकच वेतनश्रेणी रक्कम रु.१५६००-३९१०० मध्ये मंजुर असून त्यांस शासन मान्यता आहे. सदरपैकी शहर अभियंता हे पद सध्या रिक्त असून शहर अभियंता या पदावर व रक्कम रु.१५६००-३९१०० या वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या श्री.एम.टी.कांबळे यांची शहर अभियंता या पदावर नेमणुकीस मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी आवश्यक शासनमान्यतेबाबतची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १, २ व ३ चे अधिकारी व कर्मचारी यांचे निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करणेबाबत प्रस्ताव शासनाला सादर केला आहे. परंतु श्री.सुभाष काळे-नगरसचिव, श्री.डॉ.राजशेखर अय्यर-वैद्यकिय संचालक व श्री.विलास भोसले - मुख्यलेखापाल हे ३१ मे २०१२ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा व

ज्ञानाचा उपयोग महापालिकेस व्हावा म्हणून त्यांना १ वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सीमा फुगे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ४३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/१६८/२०१२ दि.०३/०३/२०१२
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५ दि.७/५/२०१२

प्रस्तावा सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे निवडणूक प्रभागांप्रमाणे सलगता विचारात घेवून अ, ब, क, ड प्रभागांमध्ये समाविष्ठ करावयाचे निवडणूक प्रभागाचे निश्चिती करण करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शुभांगी लोंढे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आता जो आपल्या समोर विषय आलेला आहे अ,ब,क,ड प्रभागामध्ये फेरबदल करण्याचा विषय आहे. या अनुषंगाने माझी आपल्याला विनंती राहिल की पुणे महापालिकेमध्ये जसे प्रभाग आहेत त्याप्रमाणे काम करणे सोईचे जाते. प्रशासनाची, दादाशी चर्चा झालेली आहे. पुणे महानगरपालिकेत अ,ब,क,ड अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय केलेले आहेत. आमची अशी विनंती राहिल की कामकाज चांगले रहावे. लोकसंख्या जास्त वाढल्यामुळे पुणे महापालिकेच्या धरतीवर क्षेत्रीय कार्यालय केलेतर अधिक चांगले काम होऊ शकते. या विषयावर प्रशासनाने खुलासा करावा आणि पुणे महापालिकेत कशाप्रकारची प्रभागरचना आहे हे सांगावे.

मा.अे.अेस.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, सार्वत्रिक निवडणूका-२०१२ च्या होण्यापुर्वी या महापालिकेत सभासद संख्या १०५ होती. यावेळेला लोकसंख्या वाढीमुळे सभासद संख्या १२८ झाली. आयुक्तांशी चर्चा झाली त्यावेळेला ताबडतोब प्रभाग समित्या सुरु व्हाव्यात असे सांगीतले. आपले प्रभाग जसे आहे तेच ठेवलेले आहेत. यामध्ये ६४ प्रभागामध्ये चार प्रभाग कार्यालय आहेत याबाबत मा.आयुक्तांशी चर्चा केल्यानंतर दोन प्रभाग वाढविण्याची सूचना केलेली आहे. आता आपल्याला सहा प्रभाग कारायचे आहेत. सहा प्रभाग करण्यासाठी जकात विभागाची चर्चा चालू होती त्यावेळेला लक्षात आले की महापालिकेचा जो स्टाफ आहे तो भरपूर कमी आहे त्याचे कारण असे आहे की गेल्या पाच जून २०१० ला शासनाने सहावा वेतन आयोग लागू केला व तो

महापालिकेच्याही कर्मचा-यांना लागू केल्यामुळे एक वर्षासाठी शासनाने वर्ग ३ व ४ कर्मचा-यांची नौकरभरती करण्यास बंदी घातली होती. ५ जून २०११ ला एक वर्षापर्यंत ही मर्यादा वाढविली आहे. दोन तीन वर्षाचा आढावा घेतलातर २०० पद रिक्त झालेली आहेत ती भरण्याची कारवाई चालू आहे. जूनला क व ड श्रेणीतील कर्मचा-यांची बंदी उठल्यामुळे लिपीकाची ६६ पदे आहेत. सगळया खात्यांकडून मागणी आहे. मुंढे साहेबांनी सांगीतले एस्कॉर्ट फाडण्यासाठी वर्ग-४ चे कर्मचारी असतात. पुणे महापालिकेचा आणि आपल्या पॅटर्नमध्ये फरक आहे. पुणे महापालिकेत करसंकलन कार्यालय आहे त्याठिकाणी कार्यालय प्रमुख हे डेप्युटी इंजिनिअर लेव्हलचे कर्मचारी आहेत. ज्याला क्षेत्रीय अधिकारी म्हणतात ते वॉर्ड ऑफिसर आहेत. सहा.आयुक्त हे प्रमुख आहेत. सुपर क्लास-१ चार अधिकारी आहेत. कार्यकारी अभियंता तीन आहेत. डे.इंजिनिअर सात ते आठ आहेत. आपल्याकडे काम करुन घेण्यासाठी आपली यंत्रणा सक्षम आहे. तुटवडा का पडतो. सर्वजण पत्र लिहितात पाच लिपीक द्या, ३ शिपाई द्या. यासाठी प्रत्येक विभागाने स्टापींग पॅटर्न बनविला पाहिजे. त्यानंतर आम्ही तो जीबी पुढे आणु शकतो. दोन प्रभाग वाढविण्याचा विषय विधी समिती समोर मंजूर झालेला आहे ते स्थायी समितीमध्ये आलेले त्यासाठी जवळ जवळ ३०० पद लागणार आहेत त्यावर जवळ जवळ २५ ते ३० कोटीच्या वर महसूल आणि अस्थापनेवर खर्च होणार आहे. पुणे मनपा प्रमाणे याठिकाणी डेप्युटी इंजिनिअरला बसविलेतर सर्व अधिकारी त्यांच्या हाताखाली असतील. आपल्याकडे मेन ऑफिसर प्रशासन अधिकारी आहे. पाच ते सहा डे.इंजिनिअर, चार कार्यकारी अभियंता, वॉर्ड ऑफिसर, सहा.आयुक्त असे आहे. ख-या अर्थाने चांगले काम व्हायचे असेलतर मला वाटते आपली यंत्रणा खुप चांगली आहे. आणखीन दोन प्रभाग नवीन निर्माण करायचे आहेत. पुण्याप्रमाणे केलेतर मला वाटते आहे तेच कार्यालय व्यवस्थीत चालत नाही आणखीन दोन प्रभाग केल्यानंतर त्यांच्याप्रमाणे केलेतर ३०० स्टाफ द्यावा लागेल. स्टापींग पॅटर्न वाढविलातर त्यासाठी शासनाची मान्यता घेता येईल.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, याची व्यवस्थीत माहिती मिळेपर्यंत हा विषय तहकूब करावा.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आपल्याला लवकरात लवकर दोन प्रभाग वाढवायचे आहेत. पुणे महापालिकेत कशाप्रकारची पध्दत आहे हे आपल्याला सुध्दा माहिती व्हावे म्हणून मी विचारले होते त्याचा सावंत साहेबांनी खुलासा केलेला आहे. पुणे महापालिकेपेक्षा दोन प्रभाग वाढविलेतर आपल्याकडे निश्चित चांगले काम होईल. दोन प्रभाग वाढविणार आहोत यासाठीच्या नौकरभरतीची मंजूरी शासनाकडून घ्यायची आहे. प्रभाग वाढविण्यासाठी परत शासनाकडे जावे लागेल का.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, प्रभाग किती करावे हा सभागृहाचा अधिकार आहे त्यामुळे प्रभाग वाढविण्यसाठी शासनाकडे जायची आवश्यकता नाही. पदनिर्मितीसाठी शासनाकडे जावे लागते. मा.आयुक्तांच्या बोलण्यावरुन पदनिर्मिती लवकर होईल असे वाटते. स्थायी समितीने मंजूर करुन लवकरात लवकर हे केलेतर

लगेच पुढच्या जी.बी.ला हा विषय येईल व जीबीने मान्यता दिल्यानंतर शासनाकडून तो प्रस्ताव आल्यानंतर सहा महिने भरतीला लागते.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, हा प्रभाग वाढविण्याचा विषय आहे. विधानसभा मतदारसंघवाईज अशी चर्चा चालू आहे तसे न करता भौगोलीकदृष्टया काम करण्यासाठी सोईचे पडेल अशा पध्दतीने प्रभाग करावेत. भौगोलीक रचनेप्रमाणे करावेत. सावंत साहेबांनी चांगली माहिती दिलेली आहे. आपल्याकडे सक्षम अधिकारी आहेत तसे पुणे महापालिकेत नाहीत. तोपर्यंत चारही प्रभागाचे कामकाज चालू रहावे एवढीच अपेक्षा आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, सावंत साहेबांनी माहिती दिली आहे. आपल्याला क्षेत्रिय कार्यालय वाढविता येतात का, जेणेकरुन कामाचा व्याप डिव्हाईड व्हायला मदत होईल. पुणे महापालिकेत क्षेत्रिय कार्यालय आहेत तसे करता येईल का. प्रभाग कार्यालयाची सहा संख्या केलीतर त्याच्या अंडर जास्तीत जास्त किती क्षेत्रिय कार्यालय करु शकतो. शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसेलतर तशी उपसूचना आम्ही देवू शकतो. शासनाच्या उमेदमान्यतेवर उपसूचना द्यावी. हे करायचेच असेलतर आठ-दहा महिने कशाला लावायचे.

मा.अे.अेस.सावंत (सह आयुक्त ) :- मा.महापौर साहेब, मुळामध्ये हे वॉर्ड कायद्यातील तरतूदीप्रमाणे आहेत, त्याच्या अंडर क्षेत्रिय कार्यालय निर्माण करण्याचा प्रश्नच येत नाही. हेच क्षेत्रिय कार्यालय आहेत. जेवढे पाहिजे तेवढे ठेवलेतर अस्थापनेवरील खर्च कमी राहिल आणि विकास कामावर खर्च करता येईल. हा अस्थापनेचा खर्च कायमस्वरुपी राहील. तरी सुध्दा दोन क्षेत्रिय कार्यालय वाढविण्याची सूचना आहे. ते वाढवायचे असेलतर तसे आयडेन्टीफिकेशन करावे लागेल. हे करत असताना कोणता भाग कोणत्या कार्यालयामध्ये येणार असा सुध्दा प्रस्ताव येणार, लोकेशन काय आहे, स्टाफ व्यवस्था काय आहे, बिल्डींग आहे का नाही हे बघुन करावे लागेल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.भारती फरांदे :-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ६

दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.लेखा/६/कावि/१२९३/२०१२ दि.२६/०४/२०१२

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.९(ब) दि.७/५/२०१२

सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकात नमुद केलेल्या र.रु.५० लाखावरील प्रस्तावा सोबतच्या यादीतील (प्रपत्र - ब) कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.अमिना पानसरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.सीमा फुगे :- मा.महापौर साहेब, आम्ही नवीन आहोत याबाबत माहिती नाही. प्रपत्र ब म्हणजे काय आहे. महापालिकेचे बजेट आमच्या समोर आलेले नाही. अंदाजपत्रक कुठे आहे.

मा.व्ही.टी.भोसले (मुख्यलेखापाल):- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन १२-१३ चे मुळ अंदाजपत्रक दरवर्षी फेब्रूवारी महिन्यात स्थायी समितीला सादर केले जाते. यावर्षी नव्याने निवडणूका झाल्यामुळे आमचे बजेट फेब्रूवारीमध्ये तयार होते परंतु २९ तारखेला शासनाचे पत्र आले, पुर्वबॉडी समोर धोरणात्मक निर्णयासाठी विषय पाठवू नका त्यामुळे त्याठिकाणी अस्तित्वात असलेल्या स्थायी समिती समोर बजेट ठेवता आलेले नाही. त्यानंतर स्थायी समिती अस्तित्वात येण्यासाठी वेळ झाला. शासनाने ॲमेन्डमेंट दिलेले आहे १०० अ प्रमाणे स्थायी समिती महापालिकेला बजेट सादर करु शकते असे प्रोव्हीजन आहे. (१००अ प्रोव्हीजन वाचन केले) त्याप्रमाणे मा.आयुक्त यांनी परिपत्रक काढून खातेप्रमुखाना कळविले. त्यानंतर काही लोकांनी विनंती केली त्याप्रमाणे आम्ही प्रधान सचिवाना असे पत्र लिहिले. १००अ नुसार स्थायी समितीसमोर बजेट सादर करण्याची आवश्यकता आहे का नाही याबद्यल मार्गदर्शन मागविलेले आहे त्याबद्यल खुलासा आमच्याकडे आलेला नाही. याबाबत अंदाजपत्रक नवनिर्वाचीत लोकनियुक्त बॉडी समोर ठेवायचे का नाही याबाबत आयुक्त यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

मा.नारायण बहिरवाडे :- मा.महापौर साहेब, पुणे महापालिकेच्या आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणूका एकाच वेळेस झालेल्या आहेत त्यांनी जीबी समोर बजेट ठेवले, ते ठेवू शकतात आणि आपण का ठेवू शकत नाहीत याचा खुलासा करावा.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, बीपीएमसी ॲक्ट कलम ९५ प्रमाणे आयुक्तांनी दरवर्षी बजेट तयार करायचे असते. कलम ९६ प्रमाणे ते स्थायी समिती समोर मांडायचे असते. स्थायी समितीने त्याच्यावर सूचना, उपसूचना, चर्चा करायची त्याच्यानंतर स्थायी समिती चेअरमन ते बजेट महापालिके समोर मांडत असतात. तुम्ही सांगीतल्याप्रमाणे बीपीएमसी ॲक्ट कलम १०० अ वाचले. माझ्या माहितीप्रमाणे १०० अ मध्ये सदस्यांनी अंदाजपत्रक तयार केलेले नसेलतर आयुक्तानी तयार केलेले अंदाजपत्रक त्यावर्षाचे समजले जाईल आणि त्याची अंमलबजावणी होईल असे आहे. महापालिका स्विकृत करेपर्यंत १०० अ नुसार असा अर्थ आहे. बजेट हे महापालिका सभे समोर आलेच पाहिजे. त्यानी हे बजेट आपल्या समोर आणलेच पाहिजे. एवढेच नाहीतर बजेटच्या प्रती सन्मा.सदस्यांना ज्याठिकाणी ते राहतात किंवा ज्या ठिकाणी ते उपलब्ध होतात

त्याठिकाणी नेवून द्यायच्या आहेत. त्या उपलब्ध करुन न देता, त्यांच्या घरी न जाता त्यांच्यापर्यंत या अंदाजपत्रकाच्या प्रती पोहचल्या नसतील असे वाटते. नवीन सभासदांना अंदाजपत्रक काय आहे हे माहित नाही. असे असताना अंदाजपत्रकातील प्रपत्र ब स्थायी समिती अस्तित्वात नव्हती. ३१ मार्चपुर्वी महापालिका सभा अस्तित्वात होती. महापालिका सभा अस्तित्वात असताना महापालिका सभेला हे का आणलेले नाही. याचा अर्थ महापालिका सभे समोर हे तुम्ही ठेवले नाही हा महापालिका सभेचा अवमान आहे. याठिकाणी कुठलीही किमंत महापालिका सभासदांना दिलेली नाही. अधिका-यांनी इस्टीमेट तयार केलेले आहे, फक्त आपण हो म्हणायचे. दोन दिवसानी या कामाच्या जाहिराती निघतील त्याबद्यल ऑब्जेक्शन नाही. परंतु हे बजेट लोकांच्या घरी जायला हवे त्याच्यावर चर्चा करायला पाहिजे. आता तुम्ही तुकडे तुकडे करुन आणलेले आहे हे चुकिचे आहे. विषय मंजूर करणारच आहोत. या गोष्टीचा मी निषेध करते. महापालिका सभा ३१ मार्च पुर्वी अस्तित्वात असून सुध्दा महापालिका सभे समोर बजेट का आणलेले नाही. याचा मी निषेध करते.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, या परिपत्रकाचा मी पुर्णपणे रिस्पेक्ट करतो. आयुक्तांनी फेब्रूवारी मध्ये बजेट ॲप्रूव्ह केलेले आहे मग दोन ते अडीच महिने झाले कामाचे टेंडर का काढलेले नाही. शासनाने आयुक्तांना आदेश दिलेले आहे, ॲप्रूव्ह केलेले आहे आतापर्यंत टेंडर का काढले नाही. आयुक्त साहेबांनी मंजूर केले असे पत्र तुम्ही आम्हांला द्यायला पाहिजे. नवीन सभासद त्यांच्या प्रोजेक्ट बद्यल सुचना देवू शकत नाहीत. आम्ही मतदारांना सांगीतले आहे आम्ही हे करणार ते करणार म्हणून. आता आम्ही मतदाराना काय उत्तर देणार, यावर्षी काही होऊ शकणार नाही म्हणून. आयुक्तांना शासनाने पॉवर दिलेल्या असतील,तुम्ही ॲप्रूव्ह केलेले आहे मग आतापर्यंत त्याचे टेंडर का पुर्ण केलेले नाही. आपल्याकडे संपुर्ण प्रोसीजरला एक वर्षे जातात नंतर म्हणणार पैसे संपले. बजेट ॲप्रूव्ह आहेतर मग टेंडर प्रोसेस का पुर्ण केले नाही.

मा.व्ही.टी.भोसले (मुख्यलेखापाल):- मा.महापौर साहेब, बहिरवाडे साहेबांनी प्रश्न विचारलेला आहे. पुणे महापालिकेनी केले आपण का केले नाही. याबाबतीत पुणे महापालिकेची तारीख ठरलेली आहे आपल्याकडे आयुक्तांनी किती तारखेपर्यंत बजेट स्थायी समितीला द्यायचे हि तारीख ठरलेली नाही. पुणे मनपाचे तशी पुर्वी तारीख ठरलेली आहे आणि त्यांनी स्थायी समितीला बजेट सादर केलेले आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, दोन ते आडीच महिने टेंडर का काढलेले नाही, आपण का टाईम वेस्ट केलेला आहे.

मा.व्ही.टी.भोसले (मुख्यलेखापाल) :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्तांनी १०० अ नुसार अंदाजपत्रक तयार केलेले आहे परंतु नगरसचिवांनी सांगीतल्याप्रमाणे त्या कामातील प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यतेची गरज असते त्यामुळे विधी समितीला ५० लाखाच्या पॉवर आहेत त्याच्यावर महापालिकेला पॉवर आहेत आणि म्हणून विभागणी करण्यासाठी प्रपत्र अ,ब केलेले आहे. ५० लाखाच्या खालचे काम प्रपत्र अ आणि वरचे काम प्रपत्र ब

असे केलेले आहे. गेल्या वर्षी निवडणूका असल्यामुळे बजेटच्या बाबतीत हा ठराव केलेला होता सर्वच कामाना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे म्हणून.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, चुकिची माहिती देवू नका. दोन ते अडीच महिने तुम्ही वेस्ट घालविलेले आहेत हे कबुल करा. एका साईडला सांगता आयुक्तांना पॅावर आहेत म्हणून आणि दुस-या साईडला सांगतात पॅावर नाहीत स्थायी समितीला यावे लागेल. आयुक्त साहेबांना बजेट पास करण्याची पॅावर असेलतर टेंडर काढण्याची सुध्दा पॅावर आहे. आयुक्तं साहेबांनी किंवा अति.आयुक्त साहेबांनी याचे उत्तर द्यावे.

मा.आर.एन.जोशी (प्र.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, या विषयावर आता चर्चा झालेली आहे. माझ्या अल्प कालावधीमध्ये मी चार्ज घेतला आहे. माझ्याकडे संचिका आल्या त्यावेळेला मी विचारले बजेट फायनल झाले का त्यावेळेला सांगीतले आयुक्तांनी असे असे बजेट केलेले आहे. आता कलम वाचले त्यानुसार फायनल झालेले नव्हते, मग मी म्हणालो पुढे काय तर त्यांनी सांगीतले शासनाकडे आपण असा असा संदर्भ केलेला आहे. मला अल्प कालावधीमध्ये निर्णय घेणे शक्य नव्हते. तरी सुध्दा प्रधान सचिव यांना विचारले, तत्कालीन आयुक्त यांनी हे जे केले त्याचा खुलासा लवकरात लवकर करावा. मार्च ३१ नंतर आतापर्यंत जे काही ॲप्रूव्ह बजेट आयुक्तांचे होते त्याप्रमाणे प्रत्यक्ष टेंडर का निघाले नाही असे विचारले आहे त्याचा अति.आयुक्तांनी खुलासा करावा. त्यावेळेला मी नव्हतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी बजेट ॲप्रूव्ह केल्यानंतर टेंडर का निघाले नाही. त्यांच्या नावावर तुम्ही चार्जशीट करणार का.

मा.नारायण बहिरवाडे :- मा.महापौर साहेब, पुणे महापालिकेनी बजेट सादर करण्यासाठी तारीख निश्चित केलेली होती असे सांगीतले, मग आपण तशी तारीख का निश्चित केलेली नाही हे सांगावे.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, ३१ मार्च पुर्वी महापालिका सभे समोर बजेट का ठेवलेले नाही. पुणे मनपा प्रमाणे आमची कमिटी झालेली नव्हती परंतु माझा एकच प्रश्न आहे त्यांच्या सुध्दा निवडणूका झाल्या व आपल्या सुध्दा झाल्या आहेत. निवडणूका आहेत हे पाच वर्षापुर्वीच माहित होते. मग डिसेंबरमध्ये किंवा तत्पुर्वी तुमचे बजेट पुर्ण करायला पाहिजे. ते तुम्ही पुर्ण केलेले नाही हे कबुल करावे. ३१ मार्च पुर्वी बजेट ठेवण्यासाठी तुमच्याकडे ते तयार नव्हते हे तुम्ही कबुल करावे. तसेजर असतेतर स्थायी समितीला वगळून सुध्दा महापालिका सभेसमोर आले असते. धरलंतर चावतय आणि सोडलतर पळतयं असे झालेले आहे. हे आम्हांला मंजूर करावेच लागेल कारण आता पावसाळा सुरु होणार आहे. तुम्ही हे मार्चपुर्वीच का आणलेले नाही हे सांगावे, ती तुमची चुक आहे का नाही. ३१ मार्चपुर्वी बजेट महापालिका सभे समोर का आणले नाही. निवडणूकीचे कारण तुम्ही सांगू नका. याचे नियोजन तुमचे पुर्वीच व्हायला पाहिजे होते. ते तुम्ही केलेले नाही. ३१ मार्च पुर्वी आयुक्तांकडून बजेट याठिकाणी मांडायला पाहिजे होते ते तुम्ही केलेले नाही. आम्ही सर्व तरतूदी मान्य केल्यातरी महापालिके समोर बजेट

यावे लागते तरी सुध्दा तुम्ही तुकडे तुकडे आणलेले आहेत. ते आम्हांला नामंजूर करता येत नाहीत, किती हुशार तुम्ही आहेत. बजेटच्या बाबतीत जी चुक झालेली आहे ती तुम्ही मान्य करावी.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, आम्ही जुने नगरसेवक आहोत तरी सुध्दा अजून सभागृहामध्ये काय चालले हे समजत नाही. आयुक्तांनी खुलासा केलेला आहे त्यांची जबाबदारी नव्हती असे सांगून अति.आयुक्तांकडे बोट दाखविले आणि खाली बसले व हे ज्यांनी केले ते इकडून गेले. मानापमानाने नाटकाचा याठिकाणी डाव रंगलेला आहे तो तुम्ही कबुल करा. परंतु हे काम त्वरीत झाले पाहिजे. कोणी काय काय केले याचा निश्चितपणे खुलासा करावा पण तुमची चुक झालेली आहे हे निश्चितपणे सांगावे. याठिकाणी ३१ मार्च पुर्वी जे पदाधिकारी होते त्यांनी लक्ष द्यायला पाहिजे होते. तेंव्हाच पॉईंटआऊट का केलेले नाही. रेडी टू टेंडर आता ते लगेच मंजूर करा. काम लगेच चालू झाले पाहिजेत. आम्ही पक्षनेत्यांकडे उपसूचना दिलेल्या आहेत त्याच्यासहीत हे बजेट मंजूर करावे, आता पावसाळा चालू होईल म्हणून काम त्वरीत सुरु व्हावेत अशी आमची विनंती आहे.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी मुद्या मांडलेला आहे, मार्च पुर्वी हे बजेट यायला पाहिजे होते. प्रशासनाची तशी कारवाई व्हायला पाहिजे होती, भोसले साहेबांनी ती चूक मान्य केली पाहिजे. आम्ही निवडणूका समोर जात असताना लोकांना वॉर्डातील असे असे काम करु म्हणून सांगीतले आहे त्या सगळया कामाचा यात अंतर्भाव झालेला आहे का हा प्रश्न आहे. बजेट वाचण्यासाठी नगरसेवकांना पहिजे होते, ते केलेले नाही. अधिकारी लेव्हलला ज्या मिटिंगा झाल्या त्यात सांगीतले बजेटवर चर्चा करता येणार नाही, उपसूचना देता येणार नाहीत. हा सभागृहातील नगरसेवकांवर अन्याय आहे आमच्या ज्या उपसूचना आहेत त्या घेवून वॉर्डातील काम पुर्ण व्हावीत. मुळात पाच वर्षाचा इतिहास पाहिलातर पाच वर्षात आपण कुठल्याही प्रकारची उपसूचना न घेता स्थायी समिती, जी.बी.ने बजेट मंजूर करुन काम मार्गी लावलेले आहेत तसे तुम्ही या वर्षी करणार असालतर आमची काही अपेक्षा नाही. आमचे काम व्हावेत अशीच अपेक्षा आहे त्याचा खुलासा करावा. उपसूचना घेणार आहेत का, घेणार नसालतर आमचे जे काम आहेत ते पुर्ण करणार का याचा खुलासा प्रशासनाने करावा नंतरच हा विषय मंजूर करावा.

मा.व्ही.टी.भोसले (मुख्यलेखापाल) :- मा.महापौर साहेब, पठाणताईनी जे विचारले आहे त्याबाबत सांगतो की पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १६ फेब्रूवारी १२ ला पार पडलेली आहे. आचारसंहिता १७ ला संपुष्टात आली. २८.२.१२ ला स्थायी समितीस बजेटसाठी पत्र पाठविलेले आहे परंतु २९.२.१२ ला शासनाचे पत्र आले होते ते पत्र मी वाचून दाखवितो. ( शासनाकडून आलेल्या पत्राचे वाचन केले ) त्यामुळे हे बजेट स्थायी समितीला मार्चपुर्वी गेलेले नाही. ६ मार्चला आयुक्त साहेबांच्या सहीने सर्व खातेप्रमुखाना परिपत्रक पाठविलेले आहे या बजेटप्रमाणे अंमलबजावणी करावी म्हणून.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, याचे टेंडर का काढलेले नाही हे सांगावे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, भोसले साहेबांनी शासनाचे परिपत्रक वाचलेले आहे. १०० अ जो आहे त्याच्यामध्ये नव्याने येणा-या सभेपुढे हे बजेट मांडायला पाहिजे होते ही आपली चुक झालेली आहे. आता तीन महिने निघून गेलेले आहेत. उदया नवीन आयुक्त येणार आहेत. ते सहा महिने हात लावणार नाहीत म्हणजे नऊ महिने गेले. म्हणजे महापालिकेत सुरवातीचे नऊ महिने असेच जातात. निवडणूक पुर्वीचा कालावधी सहा महिन्याचा गेला. म्हणजे पाच वर्षाच्या कालावधीमधील चार वर्षे तुमच्या हातात राहिलेले आहेत. अंदाजपत्रका बाबत सभागृहात बरीचशी चर्चा झालेली आहे. तुम्ही शासनाचीच मंजूरी घ्यायची सभागृहापुढे कशाला आणायचे. राज्यशासनाला अधिकार आहेत. त्यांच्या अधिकारात त्यांनी मंजूर करुन पाठविले. आपण चुक करतो ती आम्हांला भोगावी लागते. हे विषयपत्र ठेवले त्या अनुषंगाने सांगतो की ८१४ कोटीचे हे विषयपत्र आहे. हे मंजूर करत असताना ढोबळ खर्चाला मंजूरी देतो. प्रत्यक्षपणे हा सगळा विषय ठेवला पाहिजे होता व या सगळया विषयाला मंजूरी घ्यायला पाहिजे होती. ८१४ कोटीला मंजूरी घेतो. विधी समितीमध्ये नवीन सभासद आहेत त्यांची सुध्दा आपण फसवणूक केली आहे. त्याठिकाणी ३३१ कोटीला मंजूरी घेतली, म्हणजे या ११४५ कोटीला मंजूरी घेतो ते पैसे कशाप्रकारे खर्च करणार हे सदस्यांना सांगत नाहीत. अंदाजपत्रकाची एक-एक प्रत संबंधीत सभासदाला पाठवायला पाहिजे होती. या ८१४ कोटीला मंजूरी घेत असताना विषयपत्र वाचलेतर आपण ढोबळ खर्चाला मंजूरी देतो. या ढोबळ खर्चाला मंजूरी देत असताना प्रामुख्याने पर्यावरणाच्या ३९७ कोटीला यात मंजूरी देतो. पर्यावरणाचे काय काम करणार आहोत हे या विषयपत्रामध्ये ठेवले पाहिजे. ढोबळ खर्चाला तुम्ही मंजूरी घेता. पुन्हा वर्षेभर हा विषय येणार नाही, उदया टेंडर काढून मोकळे होणार. हे करत असताना पुढे मंजूरीसाठी हे विषय येणार नाहीत. ८१४ कोटीला आपण मंजूरी घेतो. आम्ही १०० ते १५० कोटीच्या उपसूचना तयार केलेल्या आहेत म्हणजे या एक हजार कोटीला मंजूरी घेतल्यानंतर येथून पुढे एक सुध्दा विषय येणार नाही. चर्चेला विषय सुध्दा राहणार नाही. म्हणून हे काम करत असताना, विषय ठेवत असताना अति.आयुक्तांनी त्या विषयाचे संपुर्ण डॉकेट ठेवायला पाहिजे होते. त्यांनी प्रपत्र ब लिहिलेले आहे. जे कार्यकारी अभियंता असतील त्यांच्याकडून माहिती घेतली तसाच विषय ठेवलेला आहे. ८५ सदस्य या सभागृहात नव्याने आहेत या सभासदाना अस्थापनेवर किती खर्च होतो हे माहिती सुध्दा नाही, महापालिकेच्या क्षेत्रामध्ये काम करणा-या कर्मचा-यांवर किती खर्च होतो. यामध्ये ३६४ कोटीचा खर्च ठेवलेला आहे. सगळा खर्च पाहता विषयाला मंजूरी घेत असताना सभागृहामध्ये काही विषय असे ठेवलेले आहेत की त्या विषयाची सभासदाला कल्पना सुध्दा नाही. भक्ति-शक्ति उदयानाच्या ठिकाणी लेजरशोसाठी साडेतीन कोटीला मंजूरी देतो परत हा विषय सभागृहापुढे येणार नाही. काय लेजरशो करणार आहेत याची आम्हांला माहिती पाहिजे. पवना सुधार योजनेसाठी ३९७ कोटीला मंजूरी देतो काय करणार तुम्ही हे नव्याने आलेल्या सभासदांना समजले पाहिजे. तुम्ही असे विषय मांडतात कि सन्मा.सदस्यांना काही समजले नाही पाहिजे. या सभागृहात प्रत्येक सभासदाना माहिती मिळाली पाहिजे. मनपा क्षेत्रात रात्रनिवारे करण्यासाठी ६० लाखाला मंजूरी देतो. कोणासाठी रात्रनिवारे करणार आहोत. रात्रनिवारे काय आहेत हे सांगावे. ८१४ कोटीचे विषय ठेवलेले आहेत, उदया याच्या निवीदा निघणार आहेत. त्याठिकाणी कोण झोपणार आहे. पाणीपुरवठयावर ८० कोटीस मंजूरी घेतो आणि २ कोटीच्या नलीका

बदलणार आहोत. एवढया मोठया खर्चाला मंजूरी घेत असताना भविष्यामध्ये या निवीदा कशाप्रकारे काढणार आहोत. हे सगळे काम करत असताना, खर्चाला मंजूरी देत असताना सभासदाला सुध्दा याची माहिती झाली पाहिजे. सविस्तर डॉकेट मांडा असे म्हणलेतर पुढच्या महिन्यात मांडतो नंतर निवीदा काढू असे म्हणणार आहेत. शासनाने अधिकार दिलेले होतेतर निवीदा का काढल्या नाहीत. आज स्टॅार्मवॉटरचे पाणी नागरीकांच्या घरात जाते, उदया पावसाळा सुरु होईल. एक ते दिड महिन्याचा कालावधी आता जाईल. याला जुलै, ऑागष्ट उजडणार आहे. अंदाजपत्रक मंजूरीचे अधिकार होतेतर हे तुम्ही का केले नाही याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. या विषयावर बोलत असताना विषयपत्रिकेमध्ये ब-याचशा प्रमाणात त्रुटी आहेत. विषयपत्रिकेत आकडे टाकले, काय करणार, कशाप्रकारे करणार हे यात दिलेले नाही. ही सभागृहाची फसवणूक आहे. सभागृहाला अंधारात ठेवून मंजूरी घेतली जाते. आम्ही फक्त या सभागृहात चर्चा करण्यासाठी राहणार आहोत, एवढेच काम राहणार आहे. सदस्यांनी उपसूचना तयार केलेली आहे परंतू आपण काम करत असताना अधिका-यांना मात्र याचा जाब विचारला पाहिजे. चुकिच्या पध्दतीने या महापालिकेचे काम होते. हे काम चुकिच्या पध्दतीने होऊ नये याची जबाबदारी प्रत्येक सभासदाची आहे. प्रत्येक सभासदानी हे लक्षात घेतले पाहिजे की या विषयाला मंजूरी देत असताना हे पाहिले पाहिजे. हा चुकिच्या पध्दतीने विषय मांडलेला आहे. विधी समितीमध्ये ३३१ कोटीचे विषय मांडले आणि सांगीतले १ के खाली हा विषय येईल. एका सक्षम समितीसमोर विषय असल्यानंतर तो विषय पुढे येत नाही, हे रितसर तुम्ही सांगीतले पाहिजे. सदस्यांना अंधारामध्ये ठेवून काम होता कामा नये. आपण ११४५ कोटीला मंजूरी देतो. ११४५ कोटीला मंजूरी देत असताना सर्व सभासदांनी, नव्याने निवडून आलेल्या सभासदांना कोणत्याहीप्रकारची माहिती न देता अंधारात ठेवून हा विषय मारुन नेता, याच्या सर्व प्रती सभासदांना द्यायला पाहिजे होत्या. त्यांच्या प्रभागामध्ये केलेल्या तरतूदी किती आहेत याची माहिती पाहिजे होती. त्यासाठी अंदाजपत्रकाच्या प्रती पाठवायला पाहिजेत. आपण आपली चुक झाकण्यासाठी शासनाचे पत्र दाखवितो. यापुढे अशी चुक सहन केली जाणार नाही. महापौर साहेब, नव्याने येणा-या आयुक्तांना आपण सूचना कराव्यात. नवीन सभासदांना अंदाजपत्रक माहित नाही, संपुर्ण अंदाजपत्रक सभागृहामध्ये मांडावे, हा अधिकार तुम्हांला आहे. तशाप्रकारच्या आयुक्तांना सूचना देवून हे करु शकता. संपुर्ण अंदाजपत्रक सभागृहामध्ये फेर सादर करावे अशी सूचना करतो. या विषयाला मंजूरी देत असताना तुम्ही सूचना करा की ज्या ज्या सदस्यांच्या प्रभागामध्ये निवीदा काढतो त्यांना माहिती मिळाली पाहिजे. मग ती डांबरीकरणाची असेल, जलनिस्सारणची असेल त्याची माहिती सदस्यांना मिळाली पाहिजे त्यादृष्टिने संबंधीत विभागाला तशाप्रकारच्या सूचना कराव्यात असे सांगून येथे थांबतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, वास्तविक पाहता आर.एस.कुमार यांनी प्रश्न विचारला, पठाणताईनी प्रश्न विचारले परंतु सर्व प्रश्नाचे प्रशासन उत्तर देवू शकले नाही. शासनाचे पत्र वाचून दाखविले. वास्तविक पाहता आयुक्तांनी बजेट तयार करावे आणि त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी असे म्हणलेले नाही. नवीन सभासदांना माझ्या वॉर्डामध्ये काय आहे, कोणत्या कामाला प्राधान्य दिले पाहिजे, वर्गीकरण कसे करतो या गोष्टी त्यांना माहिती व्हायला पाहिजे. हे करण्यासाठी वेळ राहिलेला नाही.

विषयपत्रिकेच्या अनुषंगाने बजेटला ढोबळ मान्यता घेतो आणि म्हणून तुम्ही टेंडर फ्लोट करु शकलेला नाहीत. उपसूचना घेत असताना प्रत्येकांना वाटते आपल्या वॉर्डात हे काम व्हावे. या विषयाला प्रशासकीय मान्यता देत असताना वर्गीकरणाचे अधिकारी स्थायी समितीला देत आहोत. जे जे सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत त्यांना सांगावे की हे बजेट याठिकाणी वापरावे व त्याप्रमाणे करावे. परत बजेट आणायचे म्हणलेतर तीन महिने जातील. ॲडमिनिस्ट्रेशन ॲप्रूव्ह आम्ही देतो त्याच्या वर्गीकरणाचे अधिकार स्थायी समितीला द्यावेत जेणेकरुन ती कामे तुम्हांला यात अंतर्भूत करता येतील. कोणते काम वगळायचे कोणते घ्यायचे हे करता येईल.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, याच्यावर चर्चा होणारच नाही. याठिकाणी जे विषय पर्यावरण विभागाचे आहे त्यात असे म्हणलेले आहे पिंपरी चिंचवड शहरातील नदयासाठी नदी प्रकल्प राबविणे, नदी प्रदूषण राखणेकामी ३४५ कोटी, २० कि.मी.ची नदी पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये आहे. २० कि.मी.साठी ३४५ कोटी म्हणजे १ कि.मी.ला १७ कोटी २५ लाख खर्च येणार आहे. त्याला सोन्याचे पाणी देणार आहेत का, किनाऱ्याला भर टाकणार आहेत ती गोल्डची टाकणार का. याची माहिती घ्यावी. नदीमधील जलपर्णी अजून काढलेली नाही. से.नं. २३ निगडी जलशुध्दीकरण केंद्राअंतर्गत टप्पा-२ खासगीकरणाने चालविणे ६२ कोटी. हे कोणालातरी डोळयासमोर ठेवून केलेले आहे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, याच्यावर चर्चा करायची नाही असाच हा विषय आहे. असे असताना चर्चा करायची असेलतर तीन दिवस जीबी चालेल आणि चर्चा करुन काहीच होणार नाही. तुम्ही जे पान वाचता ते आम्हांला सर्वांना वाचता येतात.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, याठिकाणी कोणालातरी डोळयासमोर ठेवून हे करतो यावर परत बोलता येणार का.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आपल्याला यात बदल करण्याचे अधिकार नाही. जीबी सक्षम आहे आपण हे अधिकार स्थायी समितीला देतो, तेथे आपण हे करु शकतो.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, १/४ भाग हा ठेकेदारासाठी आहे त्यांना समोर ठेवून बजेट सादर केलेले आहे.

मा.शेखर ओव्हाळ :- मा.महापौर साहेब, पुनावळे, ताथवडे हा भाग पहावा व नंतर ठरवावे काय करायचे ते.

मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, ८० नगरसेवक नवीन आहेत. या विषयी काहीच माहिती नाही. ब-याचवेळा विषयावर चर्चा होती परंतु उत्तर मिळत नाही. स्थायी समितीमध्ये हा विषय घेऊ असे सांगीतले परंतु त्याठिकाणी आमचा एकही सभासद नाही, आम्ही विषय कसे करणार. आम्ही सुध्दा नागरीकांना आश्वासन दिलेले आहेत. आम्हांला बजेटमध्ये काही नसेलतर आणि स्थायी समितीमध्येही आमचा सभासद नाही, आम्ही काय करायचे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या एकूण शंभर कामाच्या उपसूचना खालीलप्रमाणे मांडतो त्यांस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नांव (प्रभाग क्र.) | र.रू. |
|---|---|---|
| १. | साफसफाई साहीत्य खरेदी | २,००,००,०००/- |
| २. | चऱ्होली येथे मैलाशुध्दीकरण बांधणे | ५,००,००,०००/- |
| ३. | शाहूउद्यानाला पाणीपुरवठा करणे | ५०,००,०००/- |
| ४. | मोहननगर चिंचवड येथील शंकर शेट्टी उद्यानाचे नुतनीकरण | १५,००,०००/- |
| ५. | प्र.क्र.४ कृष्णानगर कै.गजानन म्हेत्रे उद्यानाच्या विकास करणे. | ५०,००,०००/- |
| ६. | प्र.क्र.१ तळवडे पावसाळी गटर लाईन टाकणे | ५०,००,०००/- |
| ७. | प्र.क्र.  मधील मनपा मधील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणे. | ५०,००,०००/- |
| ८. | प्र.क्र.५३ वाकड येथील १८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १२,३७,००,०००/- |
| ९. | प्र.क्र.५३ वाकड येथील २४/१८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १०,५२,००,०००/- |
| १०. | प्र.क्र.५३ वाकड येथील २४/१८ मी.डी.पी.रस्त्याचे खडीकरण करणे. | १८,८९,००,०००/- |
| ११. | प्र.क्र.५३ वाकड अंडरपास पासून हिंजवडी फेज-२ कडे जाणारा डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १२,०४,००,०००/- |
| १२. | वाकड हिंजवडी पासून विनोदे वस्ती जाणारा २४ डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १६,७३,००,०००/- |
| १३. | प्र.क्र.२, ताम्हाणेवस्ती म्हेत्रे वस्ती व इतर ठिकाणचे रस्ते विकसित करणे. | ५०,००,०००/- |
| १४. | प्र.क्र.२, म्हेत्रे वस्ती, संतकृपा शिवशंकर, अचिंक्य तारा इ.हौ.सोसोयटी या ठिकाणे रस्ते विकसित करणे. | ५०,००,०००/- |
| १५. | प्र.क्र.४७ काळेवाडी पिंपरीगांवकडे जाणारा १८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ३,००,००,०००/- |
| १६. | प्र.क्र.४७ अयाप्पा मंदीरा जवळा पवना नदीलगत घाट बांधणे. | ५०,००,०००/- |
| १७. | प्र.क्र.      काळेवाडी स्मशानभूमी नुतनीकरण करणे. | १,५०,००,०००/- |
| १८. | प्र.क्र.४७ मधील स.नं.७२ व ७३ पैकी आरक्षण क्र.४६५ मध्ये दवाखाना बांधणे | ५०,००,०००/- |
| १९. | आ.क्र.६४७, ६४८ स.नं.१२३ पैकी ०.४० आर.व स.नं.१२४ पै.०.९ आर उद्यान विकसीत करणे. | ५०,००,०००/- |
| २०. | पिंपरी प्र.क्र.४३ बी ब्लॉक येथे सुलभ शौचालय बांधणे | ५०,००,०००/- |
| २१. | पिंपरी प्र.क्र.४३ येथे ड वॉर्ड उद्यान विकसीत करणे. | २०,००,०००/- |
| २२ | प्र.क्र.६३ येथे शाळेच्या इमारतीचे वाढीव बांधकाम करणेसाठी | ५०,००,०००/- |
| २३ | प्र.क्र.६३ येथील साई शारदा महिला आय.टी.आय.इमारतीचे वाढीव बांधकाम करणे | १,००,००,०००/- |
| २४ | प्र.क्र.६३ येथे संपुर्ण प्रभागात पावसाळी गटर करणे | ३,००,००,०००/- |
| २५ | प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर रस्त्याचे परिसरातील डांबरीकरण करणे | ५०,००,०००/- |
| २६ | प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर मध्ये भाजीमंडई इमारत बांधणे | ५०,००,०००/- |
| २७ | प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर ग्रंथांलय बांधणे | ५०,००,०००/- |
| २८. | प्र.क्र.२८ येथील उद्यानाचे नुतनीकरण करणे | ९०,००,०००/- |
| २९ | प्र.क्र.१७ येथील संजय काळे मैदानाच्या विविध कामाबाबत | ५०,००,०००/- |
| ३० | प्र.क्र.२ मध्ये पावसाळी गटर करणे | ५०,००,०००/- |
| ३१ | प्र.क्र.५४, उद्यान दुरुस्ती करणे | २०,००,०००/- |
| ३२ | प्र.क्र.५५, विद्युत केबल भूमिगत करणे | १,००,००,०००/- |
| ३३ | प्र.क्र.४८ विद्युत केबल भूमिगत करणे. | १,००,००,०००/- |
| ३४ | प्र.क्र.६३ विद्युत केबल भूमिगत करणे. | १,००,००,०००/- |
| ३५ | प्र.क्र.     पिंपरी मोरवाडी कापसे उद्यान येथे व्यायामशाळा बांधणे | २५,००,०००/- |
| ३६ | प्र.क्र.     , स.नं.१४४ (पी), १४९ (पी.) उद्यान विकसीत करणे. | ५०,००,०००/- |
| ३७ | प्र.क्र.     पिंपळेगुरव येथे पाणी पुरवठा संदर्भात विविध कामे करणे | ४०,००,०००/- |
| ३८ | प्र.क्र.५६ येथे पाणीपुरवठा विषयक कामांसाठी | ४०,००,०००/- |
| ३९ | दापोडी येथे पाणी पुरवठा विषयक विविध कामे करणे | ६०,००,०००/- |
| ४० | ड प्रभाग पाण्याच्या टाकीवर ठेकेदार पध्दतीने वितरण व्यवस्था करणे | १,५७,००,०००/- |
| ४१ | प्र.क्र.५२ ताथवडे, पुनावळे नवीन रस्ते डांबरीकरण व दुरुस्ती करणे | २,००,००,०००/- |
| ४२ | प्र.क्र.१८ किवळे नवीन रस्ते व दुरुस्ती करणे. | २,००,००,०००/- |
| ४३ | पुणे मुंबई रस्त्यावरील दिव्यांच्या नियत्रणासाठी सिस्टीम बसविणे | १,५०,००,०००/- |
| ४४ | प्र.क्र.५६, ५७, ५८ येथील रस्ते विकसीत करणे | १५,००,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४५ | आकुर्डी खंडोबामाळ येथील आरक्षित जागेवर उद्यान विकसीत करणे. | ५०,००,०००/- |
| ४६ | प्र.क्र.६३ दापोडी येथील रस्ते विकसीत करणे. | २,००,००,०००/- |
| ४७ | भोसरी येथील आ.क्र.४२५ बिर्ला मंदीर उद्यान व भोसरी सहल केंद्र येथे उद्यान विकास कामे करणे | ५०,००,०००/- |
| ४८ | प्र.क्र.३ चिखली येथे छत्रपती शिवाजी महाराजाचे शिल्प उभारणे | १७,५०,०००/- |
| ४९ | प्र.क्र.३, चिखली कमान उभारणे. | ३०,००,०००/- |
| ५० | प्र.क्र.३ चिखली येथे विद्युत दाहीनी उभारणे | २५,००,०००/- |
| ५१ | प्र.क्र.४६ येथे स्मशानभूमीचे नुतनीकरण करणे | २,००,००,०००/- |
| ५२ | प्र.क्र.४६ मधील स्थापत्य विषयक विविध कामे करणे | २०,००,०००/- |
| ५३ | प्र.क्र.४६, ज्योतिबा उद्यानामध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे | १,००,००,०००/- |
| ५४ | प्र.क्र.     पवनानगर येथे ४५ मी.रस्तावर पादचारी उड्डाणपुल उभारणे | ६०,००,०००/- |
| ५५ | प्र.क्र.२८, येथे उद्यामनगर नाला विकसित करणे. | ५०,००,०००/- |
| ५६ | प्र.क्र.२८ मासुळकर कॉलनी टेल्को चौक येथे शिल्प समुह उभारणे | १,००,००,०००/- |
| ५७ | प्र.क्र.२८ येथे आ.मगर स्टेडीयम मध्ये निवासस्थान उभारणे | ५०,००,०००/- |
| ५८ | प्र.क्र.२३ केशवनगर क्रिडासंकुलाची दुरुस्ती करणे | २५,००,०००/- |
| ५९ | प्र.क्र.२३ पावसाळी गटर करणे | ५०,००,०००/- |
| ६० | स.नं.७२ येथे पाण्याची टाकी बांधणे (२ द.ल.लि.) | १,१०,००,०००/- |
| ६१ | प्र.क्र.५५ स्थापत्य विषयक कामांकरिता | २०,००,००,०००/- |
| ६२ | प्र.क्र.६, मोशी विद्युत विषयक कामांसाठी | ५५,००,०००/- |
| ६३ | प्र.क्र.११ झो.नि.पू.अंतर्गत विकास कामांसाठी | २०,००,०००/- |
| ६४ | प्र.क्र.११ स्थापत्य विषयक दुरुस्तीसाठी | ५०,००,०००/- |
| ६५ | प्र.क्र.८ मध्ये रस्ते विकासासाठी (वाढीव निधी) | १,०५,००,०००/- |
| ६६. | प्र.क्र.१९ मध्ये रस्ते विकासासाठी (वाढीव निधी) | १,००,००,०००/- |
| ६७ | प्र.क्र.२० शाहू उद्यान येथे शाहू महाराजांचे शिल्प उभारणे | ५०,००,०००/- |
| ६८ | प्र.क्र.२० रघु माऊली उद्यान येथे अभ्यासिका बांधणे | ५०,००,०००/- |
| ६९ | प्र.क्र.२० भूमिगत विद्युत केबल टाकणे (वाढीव निधी) | १,७०,००,०००/- |
| ७० | प्र.क्र.३७ पाणीपुरवठा संदर्भात | ५०,००,०००/- |
| ७१ | प्र.क्र.३७ येथे शौचालय उभारणे | ६०,००,०००/- |
| ७२ | प्र.क्र.३७ म.फुले येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ८०,००,०००/- |
| ७३ | प्र.क्र.५४ पिंपळेनिलख येथे स्थापत्य विषयक कामे करणे | ५,००,००,०००/- |
| ७४ | प्र.क्र.५४ पिंपळेनिलख येथे बसस्टॉप बांधणे | १,००,००,०००/- |
| ७५ | भूमिगत केबल टाकणे | १,००,००,०००/- |
| ७६ | प्र.क्र.५४ उद्यान विकसित करणे | १,५०,००,०००/- |
| ७७ | प्र.क्र.५४ स्थापत्य विषयक कामे करणे | २,००,००,०००/- |
| ७८ | प्र.क्र.   आ.अत्रे प्रेक्षागृहाचे नुतनीकरण करणे. | ५०,००,०००/- |
| ७९ | प्र.क्र.३१ मैदानाची दुरुस्ती करणे. | ४८,००,०००/- |
| ८० | प्र.क्र.३१ जिजाऊ सांस्कृतिक केंद्रामध्ये महिला शेड उभारणे | ४,२०,०००/- |
| ८१ | प्र.क्र.३१ वाय.सी.एम.येथे वाढीव इमारत बांधणे | ४,५०,००,०००/- |
| ८२ | प्र.क्र.३१ बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुलमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे | ८,००,००,०००/- |
| ८३ | प्रभाग ब मध्ये पाणीपुरवठा करिता ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणे (वाढीव निधी)<br>ज.क्र.बी-९, बी-१०, बी.-११ | ३५,००,०००/- |
| ८४ | प्र.क्र.१ विविध विकास कामांसाठी | ५०,००,०००/- |
| ८५ | प्र.क्र.   एस.के.एफ.येथे नाला ट्रेमिंग करणे | २,००,००,०००/- |
| ८६ | दळवीनगर येथे आ.क्र.१९१ गार्डन विकसित करणे. | ६०,००,०००/- |
| ८७ | आ.क्र.२७५ दळवीनगर विकसित करणे. | १,००,००,०००/- |
| ८८ | दळवीनगर प्रभागात विविध स्थापत्य विषयक कामासाठी | २,००,००,०००/- |
| ८९ | प्र.क्र.१७ ज्ञानेश्वर उद्यानांच्या  ासिमाभिंतीचे नुतनीकरण करणे. | ९०,००,०००/- |
| ९० | प्र.क्र.५ जाधव कुदळवाडी जाधववाडी अग्नशामक इमारत बांधकाम करणे | २,००,००,०००/- |
| ९१ | प्र.क्र.५ मध्ये टी.डी.आर. अंतर्गत डी.पी.रस्ते विकसीत करणे. | २,००,००,०००/- |
| ९२ | प्र.क्र.१६ आकुर्डी गांवठाण येथे कापाऊंड वॉल करणे | ५०,००,०००/- |
| ९३ | ट्रान्स्पोर्ट नगर, से.२३ येथे रस्ते कॉंक्रीटींग करणे | २,५०,००,०००/- |
| ९४ | स्पाईंग रोड  येथे रस्ते कॉंक्रीटींग करणे | २०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ९५ | प्रभाग क्र.६२ बहुउद्देशिय इमारत बांधणे | ८०,००,०००/- |
| ९६ | प्रभाग क्र.६२ विकसीत करणे ( खेळाचे मैदान) | २०,००,०००/- |
| ९७ | भोसरी MIDC वस्ताद कुमारी हॉल (मारुती लांडगे) | ५०,००,००००/- |
| ९८ | प्रभाग क्र.६४ खेळाचे मैदान विकसीत करणे व बोपखेल गणेशनगर मध्ये केबल टाकणे | १,५०,००,०००/- |
| ९९ | हिन्दुस्थान अँटीबायोटीक्स कॉलनी प्रभाग क्र.४० मध्ये स्थापत्य, जलनिःस्सारण, रस्ते व इतर कामे | १०,००,०००/- |
| १०० | प्र.क्र.९ संभाजीनगर स्थापत्यविषयक कामे करणे. | २,००,००,०००/- |

सन १२-१३ चे अंदाजपत्रकातील प्रभाग स्तरावरील र.रु.१० लाख व त्याचे आतील रकमेच्या नवीन प्रस्तावित सर्व कामांना प्रशासकीय मान्यता देणेत यावी. वरील सर्व विषयांना प्रशासकीय मान्यता देण्यात यावी हे सर्व विषय मा.स्थायी समिती समोर ठेवून पैसे वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. नविन हेड खोलण्याचे अधिकार मा.स्थायी समितीला देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

ड प्रभाग अंतर्गत, थेरगाव-वाकड रस्ता रुंदीकरणातील डांगे चौक कॉर्नर ते म्हातोबानगर पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणातील म.रा.वि.वि.कंपनीचे लघु/उच्चदाब खांब,फिडर हलविणेचे काम निविदा काढून करणेत येत आहे. सदर कामास यापूर्वी मा.महापालिका सभेने र.रु.९८,४१,०००/- खर्चास मान्यता दिलेली आहे. पण सदर रस्त्याचे अनुषंगिक रस्त्यांवरील रस्तारुंदीकरणात येणारे पोल, तारा व फिडर्स हलविणे आवश्यक असल्याने सदर कामावरील मूळ खर्चात र.रु.४३,००,०००/- ने वाढ होत आहे. सदर कामासाठी पान क्र.६४१ वर अनु.क्र.१३ नुसार र.रु.२५,००,०००/- एवढी तरतूद करणेत आलेली आहे. सदर कामे पूर्ण करणेसाठी र.रु.१,४१,४१,०००/- एवढा सुधारीत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास व येणाऱ्या सुधारीत खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामधील सदर कामावरील तरतूद र.रु.६८,००,०००/- एवढी करणेत येत आहे. सदर तरतूद पान क्र. ६४१ वरील अनु. क्र.१६,१७ अनुक्रमे १०,००,०००/-, १३,००,०००/- तसेच पान क्र. ६४८ वरील अनु क्र. १८,१९ मधून अनुक्रमे प्रत्येकी १०,००,०००/- अशी एकूण ४३,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. आयातकर पान क्र.४२,४३ 'अ ' बजेट या जमा लेखाशिर्षकावर तरतूद करणेस मान्यता देणेत यावी. पान क्र.३९६ अ.क्र.१३ या लेखाशिर्षकावर ५०,००,०००/- अधिकची तरतूद करणेत येत आहे. पान क्र.४५७ अ.क्र.६ या लेखाशिर्षकावर २५,००,०००/-, पान क्र.४५८ अ.क्र.७ या लेखाशिर्षकावर २५,००,०००/-, पान क्र. मध्ये नव्याने हेड निर्माण करुन डांगे चौक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सभोवतालीचा परिसर सुशोभिकरण करण्यास ८०,००,०००/- तरतूद करणेस मान्यता देणेत यावी. पान क्र.४२,४३ आयातकर अ बजेट जमा लेखाशिर्षकावर १,८०,००,०००/- तरतूद करणेस मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.६३ मधील आरक्षण क्र.२२ मोकळ्या जागेवर खेळाचे मैदान, जॉगिंग ट्रॅक व स्केटींग ट्रॅक विकसित करण्यासाठी ५०,००,०००/-ची वाढीव तरतूद करणेत येत आहे. जकात विभागाच्या वाढीव (आयातकर) (अनामत परतावा १०% वसुलीसह) मध्ये र.रु.५०,००,०००/- वाढ करणेस मान्यता देणेत यावी. सन १२-१३च्या अंदाजपत्रकामध्ये मा.आयुक्त यांनी

सुचविलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदी खालील प्रपत्र अ प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी.

**प्रपत्र अ**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन १२-१३ अंदाजपत्रक पा.क्र. | अनु. क्र. | सध्याची तरतूद | वाढ करावयाची र.रू. | घट करावयाची र.रू. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दगडी फरशी फुटपाथ | १०९, (पु.क्र.३) | ९० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २ | दगडी फरशी फुटपाथ | ११८ (पु.क्र.३) | १७२ | ४,००,०००/- | २१,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ३ | डांबरी रस्ते | ९६ (पु.क्र.३) | १५३ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ४ | स्थापत्य विषयक कामे | १४५ (पु.क्र.३) | २७ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ५ | इतर योजना | १२३ (पु.क्र.३) | ७४ | ७,५०,०००/- | १७,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ६ | स्थापत्य विषयक कामे | १४५ (पु.क्र.३) | २८ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ७ | इतर योजना | १२३ (पु.क्र.३) | २३ | १०,००,०००/- | १५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ८ | स्थापत्य विषयक कामे | १४७ (पु.क्र.३) | ४१ | ७,५०,०००/- | १७,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ९ | डांबरी रस्ते | १५६ (पु.क्र.३) | २७ | ४,००,०००/- | २१,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १० | उद्यान विद्युत | ६०७ (पु.क्र.३) | २५ | २७,००,०००/- | ५०,००,०००/- | --- | ७७,००,०००/- |
| ११ | स्थापत्य विषयक कामकाज | १४८ (पु.क्र.३) | ५४ | ५,५०,०००/- | १९,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १२ | स्थापत्य विषयक कामकाज | १४७ (पु.क्र.३) | ४३ | ७,५०,०००/- | १७,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १३ | स्थापत्य विषयक कामकाज | १४६ (पु.क्र.३) | ३७ | १०,००,०००/- | १५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १४ | खडी मुरुम रस्ते | ७५ (पु.क्र.३) | ३६ | १०,००,०००/- | १५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | सरफेस गटर्स | ७० (पु.क्र.३) | ३७ | ३,५०,०००/- | २१,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १६ | दगडी फरशी फुटपाथ | ११६ (पु.क्र.३) | १५८ | ५,००,०००/- | २०,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १७ | दगडी फरशी फुटपाथ | ११६ (पु.क्र.३) | १५९ | ५,००,०००/- | २०,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १८ | दगडी फरशी फुटपाथ | १०८ (पु.क्र.३) | ८३ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १९ | दगडी फरशी फुटपाथ | १०८ (पु.क्र.३) | ८४ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २० | डांबरी रस्ते | ९५ (पु.क्र.३) | १४२ | १२,६०,०००/- | १२,४०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २१ | डांबरी रस्ते | ९५ (पु.क्र.३) | १४३ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २२ | स्थापत्य विषयक कामे | १४५ (पु.क्र.३) | ३० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २३ | उद्यान विद्युत | ६०९ (पु.क्र.३) | ४३ | नवीन काम | २५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २४ | उद्यान विद्युत | ६०९ (पु.क्र.३) | ४४ | नवीन काम | २५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| | | | | **एकूण-** | **४,३२,९०,०००/-** | | |
| **अ. क्र.** | **लेखाशिर्ष** | **सन १२-१३ अंदाजपत्रक पा.क्र.** | **अनु. क्र.** | **सध्याची तरतूद र.रू.** | **वाढ करावयाची र.रू.** | **घट करावयाची र.रू.** | **एकूण** |
| १ | ---- | १९४ (पु.क्र.२) | ८ | -- | -- | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| २ | ---- | १९४ (पु.क्र.२) | ९ | -- | -- | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ३ | ---- | १९६ (पु.क्र.२) | ३२ | -- | -- | ८,००,०००/- | ८,००,०००/- |
| ४ | ---- | १०२ | ८ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ५ | ---- | १०२ | १३ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| ६ | ---- | १०२ | १५ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ७ | ---- | १०४ | २५ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| ८ | ---- | १०६ | ३ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| ९ | ---- | १०६ | ८ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १० | ---- | १९६ | १९ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| ११ | ---- | १९६ | २४ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ---- | १९८ | ३५ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १३ | ---- | १९८ | ३६ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १४ | ---- | २०० | ५ | | | ९,९०,०००/- | ९,९०,०००/- |
| | | | | | **एकूण-** | **४,३२,९०,०००/-** | **४,३२,९०,०००/-** |

मा.संपत पवार :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.भारती फरांदे :- मा.महापौर साहेब, मा.श्रीरंग बारणे, मा.संपत पवार यांची व मा.तानाजी खाडे, मा.राजू मिसाळ यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ४४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.लेखा/६/कावि/१२९३/२०१२ दि.२६/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.९(ब) दि.७/५/२०१२

सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकात नमुद केलेल्या र.रु.५० लाखावरील प्रस्तावा सोबतच्या यादीतील (प्रपत्र - ब) कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. ड प्रभाग अंतर्गत, थेरगाव-वाकड रस्ता रुंदीकरणातील डांगे चौक कॉर्नर ते म्हातोबानगर पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणातील म.रा.वि.वि.कंपनीचे लघु/उच्चदाब खांब,फिडर हलविणेचे काम निविदा काढून करणेत येत आहे. सदर कामास यापूर्वी मा.महापालिका सभेने र.रु.९८,४१,०००/- खर्चास मान्यता दिलेली आहे. पण सदर रस्त्याचे अनुषंगिक रस्त्यांवरील रस्तारुंदीकरणात येणारे पोल, तारा व फिडर्स हलविणे आवश्यक असल्याने सदर कामावरील मूळ खर्चात र.रु.४३,००,०००/- ने वाढ होत आहे. सदर कामासाठी पान क्र.६४१ वर अनु.क्र.१३ नुसार र.रु.२५,००,०००/- एवढी तरतूद करणेत आलेली आहे. सदर कामे पूर्ण करणेसाठी र.रु.१,४१,४१,०००/- एवढा सुधारीत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास व येणाऱ्या सुधारीत खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामधील सदर कामावरील तरतूद र.रु.६८,००,०००/- एवढी करणेत येत आहे. सदर तरतूद पान क्र. ६४१ वरील अनु. क्र.१६,१७ अनुक्रमे १०,००,०००/-, १३,००,०००/- तसेच पान क्र. ६४८ वरील अनु क्र. १८,१९ मधून अनुक्रमे प्रत्येकी १०,००,०००/- अशी एकूण ४३,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. आयातकर पान क्र.४२,४३ ‘अ ’ बजेट या जमा लेखाशिर्षकावर तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. पान क्र.३९६ अ.क्र.१३ या लेखाशिर्षकावर ५०,००,०००/- अधिकची तरतूद करणेत येत आहे. पान क्र.४५७ अ.क्र.६ या लेखाशिर्षकावर २५,००,०००/-, पान क्र.४५८ अ.क्र.७ या लेखाशिर्षकावर २५,००,०००/-, पान क्र. मध्ये नव्याने हेड निर्माण करुन डांगे चौक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सभोवतालीचा परिसर सुशोभिकरण करण्यास ८०,००,०००/- तरतूद करणेस

मान्यता देणेत येत आहे. पान क्र.४२,४३ आयातकर अ बजेट जमा लेखाशिर्षकावर १,८०,००,०००/- तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र.६३ मधील आरक्षण क्र.२२ मोकळ्या जागेवर खेळाचे मैदान, जॉगिंग ट्रॅक व स्केटींग ट्रॅक विकसित करण्यासाठी ५०,००,०००/-ची वाढीव तरतूद करणेत येत आहे. जकात विभागाच्या वाढीव (आयातकर) (अनामत परतावा १०% वसुलीसह) मध्ये र.रु.५०,००,०००/- वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे. सन १२-१३च्या अंदाजपत्रकामध्ये मा.आयुक्त यांनी सुचविलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदी खालील प्रपत्र अ प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रपत्र अ

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन १२-१३ अंदाजपत्रक पा.क्र. | अनु. क्र. | सध्याची तरतूद | वाढ करावयाची र.रू. | घट करावयाची र.रू. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दगडी फरशी फुटपाथ | १०९, (पु.क्र.३) | ९० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २ | दगडी फरशी फुटपाथ | ११८ (पु.क्र.३) | १७२ | ४,००,०००/- | २१,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ३ | डांबरी रस्ते | ९६ (पु.क्र.३) | १५३ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ४ | स्थापत्य विषयक कामे | १४५ (पु.क्र.३) | २७ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ५ | इतर योजना | १२३ (पु.क्र.३) | ७४ | ७,५०,०००/- | १७,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ६ | स्थापत्य विषयक कामे | १४५ (पु.क्र.३) | २८ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ७ | इतर योजना | १२३ (पु.क्र.३) | २३ | १०,००,०००/- | १५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ८ | स्थापत्य विषयक कामे | १४७ (पु.क्र.३) | ४१ | ७,५०,०००/- | १७,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| ९ | डांबरी रस्ते | १५६ (पु.क्र.३) | २७ | ४,००,०००/- | २१,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १० | उद्यान विद्युत | ६०७ (पु.क्र.३) | २५ | २७,००,०००/- | ५०,००,०००/- | --- | ७७,००,०००/- |
| ११ | स्थापत्य विषयक कामकाज | १४८ (पु.क्र.३) | ५४ | ५,५०,०००/- | १९,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | स्थापत्य विषयक कामकाज | १४७ (पु.क्र.३) | ४३ | ७,५०,०००/- | १७,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १३ | स्थापत्य विषयक कामकाज | १४६ (पु.क्र.३) | ३७ | १०,००,०००/- | १५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १४ | खडी मुरुम रस्ते | ७५ (पु.क्र.३) | ३६ | १०,००,०००/- | १५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १५ | सरफेस गटर्स | ७० (पु.क्र.३) | ३७ | ३,५०,०००/- | २१,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १६ | दगडी फरशी फुटपाथ | ११६ (पु.क्र.३) | १५८ | ५,००,०००/- | २०,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १७ | दगडी फरशी फुटपाथ | ११६ (पु.क्र.३) | १५९ | ५,००,०००/- | २०,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १८ | दगडी फरशी फुटपाथ | १०८ (पु.क्र.३) | ८३ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| १९ | दगडी फरशी फुटपाथ | १०८ (पु.क्र.३) | ८४ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २० | डांबरी रस्ते | ९५ (पु.क्र.३) | १४२ | १२,६०,०००/- | १२,४०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २१ | डांबरी रस्ते | ९५ (पु.क्र.३) | १४३ | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २२ | स्थापत्य विषयक कामे | १४५ (पु.क्र.३) | ३० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २३ | उद्यान विद्युत | ६०९ (पु.क्र.३) | ४३ | नवीन काम | २५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| २४ | उद्यान विद्युत | ६०९ (पु.क्र.३) | ४४ | नवीन काम | २५,००,०००/- | --- | २५,००,०००/- |
| | | | | **एकूण-** | **४,३२,९०,०००/-** | | |

| **अ. क्र.** | **लेखाशिर्ष** | **सन १२-१३ अंदाजपत्रक पा.क्र.** | **अनु. क्र.** | **सध्याची तरतूद र.रू.** | **वाढ करावयाची र.रू.** | **घट करावयाची र.रू.** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ---- | १९४ (पु.क्र.२) | ८ | -- | -- | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| २ | ---- | १९४ (पु.क्र.२) | ९ | -- | -- | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ३ | ---- | १९६ (पु.क्र.२) | ३२ | -- | -- | ८,००,०००/- | ८,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ---- | १०२ | ८ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ५ | ---- | १०२ | १३ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| ६ | ---- | १०२ | १५ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ७ | ---- | १०४ | २५ | | | २०,००,०००/- | २०,००,०००/- |
| ८ | ---- | १०६ | ३ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| ९ | ---- | १०६ | ८ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १० | ---- | १९६ | १९ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| ११ | ---- | १९६ | २४ | | | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| १२ | ---- | १९८ | ३५ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १३ | ---- | १९८ | ३६ | | | २५,००,०००/- | २५,००,०००/- |
| १४ | ---- | २०० | ५ | | | ९,९०,०००/- | ९,९०,०००/- |
| | | | | | **एकूण-** | **४,३२,९०,०००/-** | **४,३२,९०,०००/-** |

तसेच

| अ.क्र. | कामाचे नांव (प्रभाग क्र.) | र.रू. |
|---|---|---|
| १. | साफसफाई साहीत्य खरेदी | २,००,००,०००/- |
| २. | चऱ्होली येथे मैलाशुध्दीकरण बांधणे | ५,००,००,०००/- |
| ३. | शाहूउद्यानाला पाणीपुरवठा करणे | ५०,००,०००/- |
| ४. | मोहननगर चिंचवड येथील शंकर शेट्टी उद्यानाचे नुतनीकरण | १५,००,०००/- |
| ५. | प्र.क्र.४ कृष्णानगर कै.गजानन म्हेत्रे उद्यानाच्या विकास करणे. | ५०,००,०००/- |
| ६. | प्र.क्र.१ तळवडे पावसाळी गटर लाईन टाकणे | ५०,००,०००/- |
| ७. | प्र.क्र. मधील मनपा मधील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणे. | ५०,००,०००/- |
| ८. | प्र.क्र.५३ वाकड येथील १८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १२,३७,००,०००/- |
| ९. | प्र.क्र.५३ वाकड येथील २४/१८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १०,५२,००,०००/- |
| १०. | प्र.क्र.५३ वाकड येथील २४/१८ मी.डी.पी.रस्त्याचे खडीकरण करणे. | १८,८९,००,०००/- |
| ११. | प्र.क्र.५३ वाकड अंडरपास पासून हिंजवडी फेज-२ कडे जाणारा डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १२,०४,००,०००/- |
| १२. | वाकड हिंजवडी पासून विनोदे वस्ती जाणारा २४ डी.पी.रस्ता विकसीत करणे. | १६,७३,००,०००/- |
| १३. | प्र.क्र.२, ताम्हाणेवस्ती म्हेत्रे वस्ती व इतर ठिकाणचे रस्ते विकसित करणे. | ५०,००,०००/- |
| १४. | प्र.क्र.२, म्हेत्रे वस्ती, संतकृपा शिवशंकर, अचिंक्य तारा इ.हौ.सोसोयटी या ठिकाणे रस्ते विकसित करणे. | ५०,००,०००/- |
| १५. | प्र.क्र.४७ काळेवाडी पिंपरीगांवकडे जाणारा १८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ३,००,००,०००/- |
| १६. | प्र.क्र.४७ अयाप्पा मंदीरा जवळा पवना नदीलगत घाट बांधणे. | ५०,००,०००/- |
| १७. | प्र.क्र. काळेवाडी स्मशानभूमी नुतनीकरण करणे. | १,५०,००,०००/- |
| १८. | प्र.क्र.४७ मधील स.नं.७२ व ७३ पैकी आरक्षण क्र.४६५ मध्ये दवाखाना बांधणे | ५०,००,०००/- |
| १९. | आ.क्र.६४७, ६४८ स.नं.१२३ पैकी ०.४० आर.व स.नं.१२४ पै.०.९ आर उद्यान विकसीत करणे. | ५०,००,०००/- |
| २०. | पिंपरी प्र.क्र.४३ बी ब्लॉक येथे सुलभ शौचालय बांधणे | ५०,००,०००/- |
| २१. | पिंपरी प्र.क्र.४३ येथे ड वॉर्ड उद्यान विकसीत करणे. | २०,००,०००/- |
| २२ | प्र.क्र.६३ येथे शाळेच्या इमारतीचे वाढीव बांधकाम करणेसाठी | ५०,००,०००/- |
| २३ | प्र.क्र.६३ येथील साई शारदा महिला आय.टी.आय.इमारतीचे वाढीव बांधकाम करणे | १,००,००,०००/- |
| २४ | प्र.क्र.६३ येथे संपुर्ण प्रभागात पावसाळी गटर करणे | ३,००,००,०००/- |
| २५ | प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर रस्त्याचे परिसरातील डांबरीकरण करणे | ५०,००,०००/- |
| २६ | प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर मध्ये भाजीमंडई इमारत बांधणे | ५०,००,०००/- |
| २७ | प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर ग्रंथालय बांधणे | ५०,००,०००/- |
| २८. | प्र.क्र.२८ येथील उद्यानाचे नुतनीकरण करणे | ९०,००,०००/- |
| २९ | प्र.क्र.१७ येथील संजय काळे मैदानाच्या विविध कामाबाबत | ५०,००,०००/- |
| ३० | प्र.क्र.२ मध्ये पावसाळी गटर करणे | ५०,००,०००/- |
| ३१ | प्र.क्र.५४, उद्यान दुरुस्ती करणे | २०,००,०००/- |
| ३२ | प्र.क्र.५५, विद्युत केबल भूमिगत करणे | १,००,००,०००/- |
| ३३ | प्र.क्र.४८ विद्युत केबल भूमिगत करणे. | १,००,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३४ | प्र.क्र.६३ विद्युत केबल भूमिगत करणे. | १,००,००,०००/- |
| ३५ | प्र.क्र. पिंपरी मोरवाडी कापसे उद्यान येथे व्यायामशाळा बांधणे | २५,००,०००/- |
| ३६ | प्र.क्र. , स.नं.१४४ (पी), १४९ (पी.) उद्यान विकसीत करणे. | ५०,००,०००/- |
| ३७ | प्र.क्र. पिंपळेगुरव येथे पाणी पुरवठा संदर्भात विविध कामे करणे | ४०,००,०००/- |
| ३८ | प्र.क्र.५६ येथे पाणीपुरवठा विषयक कामांसाठी | ४०,००,०००/- |
| ३९ | दापोडी येथे पाणी पुरवठा विषयक विविध कामे करणे | ६०,००,०००/- |
| ४० | ड प्रभाग पाण्याच्या टाकीवर ठेकेदार पध्दतीने वितरण व्यवस्था करणे | १,५७,००,०००/- |
| ४१ | प्र.क्र.५२ ताथवडे, पुनावळे नवीन रस्ते डांबरीकरण व दुरुस्ती करणे | २,००,००,०००/- |
| ४२ | प्र.क्र.१८ किवळे नवीन रस्ते व दुरुस्ती करणे. | २,००,००,०००/- |
| ४३ | पुणे मुंबई रस्त्यावरील दिव्यांच्या नियत्रणासाठी सिस्टीम बसविणे | १,५०,००,०००/- |
| ४४ | प्र.क्र.५६, ५७, ५८ येथील रस्ते विकसीत करणे | १५,००,००,०००/- |
| ४५ | आकुर्डी खंडोबामाळ येथील आरक्षित जागेवर उद्यान विकसीत करणे. | ५०,००,०००/- |
| ४६ | प्र.क्र.६३ दापोडी येथील रस्ते विकसीत करणे. | २,००,००,०००/- |
| ४७ | भोसरी येथील आ.क्र.४२५ बिर्ला मंदीर उद्यान व भोसरी सहल केंद्र येथे उद्यान विकास कामे करणे | ५०,००,०००/- |
| ४८ | प्र.क्र.३ चिखली येथे छत्रपती शिवाजी महाराजाचे शिल्प उभारणे | १७,५०,०००/- |
| ४९ | प्र.क्र.३, चिखली कमान उभारणे. | ३०,००,०००/- |
| ५० | प्र.क्र.३ चिखली येथे विद्युत दाहीनी उभारणे | २५,००,०००/- |
| ५१ | प्र.क्र.४६ येथे स्मशानभूमीचे नुतनीकरण करणे | २,००,००,०००/- |
| ५२ | प्र.क्र.४६ मधील स्थापत्य विषयक विविध कामे करणे | २०,००,०००/- |
| ५३ | प्र.क्र.४६, ज्योतिबा उद्यानामध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे | १,००,००,०००/- |
| ५४ | प्र.क्र. पवनानगर येथे ४५ मी.रस्तावर पादचारी उड्डाणपुल उभारणे | ६०,००,०००/- |
| ५५ | प्र.क्र.२८, येथे उद्यामनगर नाला विकसित करणे. | ५०,००,०००/- |
| ५६ | प्र.क्र.२८ मासुळकर कॉलनी टेल्को चौक येथे शिल्प समुह उभारणे | १,००,००,०००/- |
| ५७ | प्र.क्र.२८ येथे आ.मगर स्टेडीयम मध्ये निवासस्थान उभारणे | ५०,००,०००/- |
| ५८ | प्र.क्र.२३ केशवनगर क्रिडासंकुलाची दुरुस्ती करणे | २५,००,०००/- |
| ५९ | प्र.क्र.२३ पावसाळी गटर करणे | ५०,००,०००/- |
| ६० | स.नं.७२ येथे पाण्याची टाकी बांधणे (२ द.ल.लि.) | १,१०,००,०००/- |
| ६१ | प्र.क्र.५५ स्थापत्य विषयक कामांकरिता | २०,००,००,०००/- |
| ६२ | प्र.क्र.६, मोशी विद्युत विषयक कामांसाठी | ५५,००,०००/- |
| ६३ | प्र.क्र.११ झो.नि.पू.अंतर्गत विकास कामांसाठी | २०,००,०००/- |
| ६४ | प्र.क्र.११ स्थापत्य विषयक दुरुस्तीसाठी | ५०,००,०००/- |
| ६५ | प्र.क्र.८ मध्ये रस्ते विकासासाठी (वाढीव निधी) | १,०५,००,०००/- |
| ६६. | प्र.क्र.१९ मध्ये रस्ते विकासासाठी (वाढीव निधी) | १,००,००,०००/- |
| ६७ | प्र.क्र.२० शाहू उद्यान येथे शाहू महाराजांचे शिल्प उभारणे | ५०,००,०००/- |
| ६८ | प्र.क्र.२० रघु माऊली उद्यान येथे अभ्यासिका बांधणे | ५०,००,०००/- |
| ६९ | प्र.क्र.२० भूमिगत विद्युत केबल टाकणे (वाढीव निधी) | १,७०,००,०००/- |
| ७० | प्र.क्र.३७ पाणीपुरवठा संदर्भात | ५०,००,०००/- |
| ७१ | प्र.क्र.३७ येथे शौचालय उभारणे | ६०,००,०००/- |
| ७२ | प्र.क्र.३७ म.फुले येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ८०,००,०००/- |
| ७३ | प्र.क्र.५४ पिंपळेनिलख येथे स्थापत्य विषयक कामे करणे | ५,००,००,०००/- |
| ७४ | प्र.क्र.५४ पिंपळेनिलख येथे बसस्टॉप बांधणे | १,००,००,०००/- |
| ७५ | भूमिगत केबल टाकणे | १,००,००,०००/- |
| ७६ | प्र.क्र.५४ उद्यान विकसित करणे | १,५०,००,०००/- |
| ७७ | प्र.क्र.५४ स्थापत्य विषयक कामे करणे | २,००,००,०००/- |
| ७८ | प्र.क्र. आ.अत्रे प्रेक्षागृहाचे नुतनीकरण करणे. | ५०,००,०००/- |
| ७९ | प्र.क्र.३१ मैदानाची दुरुस्ती करणे. | ४८,००,०००/- |
| ८० | प्र.क्र.३१ जिजाऊ सांस्कृतिक केंद्रामध्ये महिला शेड उभारणे | ४,२०,०००/- |
| ८१ | प्र.क्र.३१ वाय.सी.एम.येथे वाढीव इमारत बांधणे | ४,५०,००,०००/- |
| ८२ | प्र.क्र.३१ बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुलमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे | ८,००,००,०००/- |
| ८३ | प्रभाग ब मध्ये पाणीपुरवठा करिता ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणे (वाढीव निधी) | ३५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | ज.क्र.बी-९, बी-१०, बी.-११ | |
| ८४ | प्र.क्र.१ विविध विकास कामांसाठी | ५०,००,०००/- |
| ८५ | प्र.क्र. एस.के.एफ.येथे नाला ट्रेमिंग करणे | २,००,००,०००/- |
| ८६ | दळवीनगर येथे आ.क्र.१९१ गार्डन विकसित करणे. | ६०,००,०००/- |
| ८७ | आ.क्र.२७५ दळवीनगर विकसित करणे. | १,००,००,०००/- |
| ८८ | दळवीनगर प्रभागात विविध स्थापत्य विषयक कामासाठी | २,००,००,०००/- |
| ८९ | प्र.क्र.१७ ज्ञानेश्वर उद्यानांच्या ासिमाभिंतीचे नुतनीकरण करणे. | ९०,००,०००/- |
| ९० | प्र.क्र.५ जाधव कुदळवाडी जाधववाडी अग्निशामक इमारत बांधकाम करणे | २,००,००,०००/- |
| ९१ | प्र.क्र.५ मध्ये टी.डी.आर. अंतर्गत डी.पी.रस्ते विकसीत करणे. | २,००,००,०००/- |
| ९२ | प्र.क्र.१६ आकुर्डी गांवठाण येथे कापाऊंड वॉल करणे | ५०,००,०००/- |
| ९३ | ट्रान्स्पोर्ट नगर, से.२३ येथे रस्ते कॉंक्रीटींग करणे | २,५०,००,०००/- |
| ९४ | स्पाईंग रोड येथे रस्ते कॉंक्रीटींग करणे | २०,००,०००/- |
| ९५ | प्रभाग क्र.६२ बहुउद्देशिय इमारत बांधणे | ८०,००,०००/- |
| ९६ | प्रभाग क्र.६२ विकसीत करणे ( खेळाचे मैदान) | २०,००,०००/- |
| ९७ | भोसरी MIDC वस्ताद कुमारी हॉल (मारुती लांडगे) | ५०,००,००००/- |
| ९८ | प्रभाग क्र.६४ खेळाचे मैदान विकसीत करणे व बोपखेल गणेशनगर मध्ये केबल टाकणे | १,५०,००,०००/- |
| ९९ | हिन्दुस्थान अँटीबायोटीक्स कॉलनी प्रभाग क्र.४० मध्ये स्थापत्य, जलनि:स्सारण, रस्ते व इतर कामे | १०,००,०००/- |
| १०० | प्र.क्र.९ संभाजीनगर स्थापत्यविषयक कामे करणे. | २,००,००,०००/- |

सन १२-१३ चे अंदाजपत्रकातील प्रभाग स्तरावरील र.रु.१० लाख व त्याचे आतील रकमेच्या नवीन प्रस्तावित सर्व कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. वरील सर्व विषयांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून हे सर्व विषय मा.स्थायी समिती समोर ठेवून पैसे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. नविन हेड खोलण्याचे अधिकार मा.स्थायी समितीला देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ४५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.प्रशा/१/कावि/२८२/२०१२ दि.२७/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१० दि.७/५/२०१२

प्रस्तावात नमुद प्रमाणे सहाय्यक आयुक्त अभिनामाचे पदाची अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.साधना जाधव :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.सिमा सावळे :-  मा.महापौर साहेब, अर्हता का बदलता, या अर्हतेचे आपल्याकडे लोक नाहीत का याचा खुलासा करावा.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, सहा.आयुक्त हे पद मु.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ प्रमाणे अस्तित्वात असलेले पद आहे. या महापालिकेकडे सहा.आयुक्त अभिनामाची एकूण ११ पदे मंजूर आहेत. शासनाच्या २००६ च्या अकृतीबंधाप्रमाणे ५० टक्के जागा या शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांमधून व ५० टक्के जागा महापालिकेच्या अधिका-यामधुन पदोन्नतीने भरण्याचे ठरले. सुरवातीच्या काळात  ५ जागा शासनाकडील अधिका-यामधुन व ६ जागा महापालिकेच्या अधिका-यामधुन पदोन्नतीने भरल्या जात होत्या परंतु गेल्या वर्षी शासनाने ६ जागा शासनाच्या राहतील व ५ जागा महापालिकेच्या अधिका-यामधुन भराव्यात असे सांगीतले. अजभजचा कॅण्डीडेट मंजूर नियमाप्रमाणे आपल्याला भरायचा झालातर प्रशासन अधिकारी किंवा तत्सम पदावर पाच वर्षाचा अनुभव असावा असे निकष लावलेतर आपल्याकडे तसे कॅण्डीडेट निर्माण होत नाहीत. नायब तहसिलदार यांची यादी तपासली असता प्रशासन अधिकारी आठ ते दहा भरु शकलेलो आहोत व बाकी पद फक्त अर्हता नाही म्हणून रिक्त आहेत. मा.आयुक्तांची आणि कर्मचारी महासंघाची मिटिंग झाली त्यावेळेला असे ठरले ७० टक्के पदोन्नतीने भरायचे आणि ३० टक्के सरळसेवेने भरायचे. त्यामध्ये पाच जागेतून प्रशासन अधिका-यामधून दोन जागा भरल्या आणि उर्वरीत तीन जागा आहेत. कलम ४५ प्रमाणे महापालिकेतून कर्मचारी उपलब्ध झाले नाहीतर व सदर पद रिक्त ठेवलेतर सहा महिन्यानंतर शासनाला त्यांचे कर्मचा-यामधुन प्रतिनियुक्तीवर कर्मचारी भरावे लागतात, त्यामुळे शासनाचे अधिकारी याठिकाणी येतील. याप्रमाणे केलेतर तत्सम वर्गातील सर्वजण अर्ज करु शकतील व ते निवड कमिटिपुढे ठेवून निवड कमिटि ठरवेल, अनुभव, त्याची क्षमता किती आहे हे ठरवून ते महापालिकेकडे येणार आहे. २४ पदापैकी ८ पद सुध्दा आपण भरु शकलेलो नाहीत. आणि सहा महिने हे पद रिक्त राहिलेतर शासन कायदयातील तरतूदीप्रमाणे प्रतिनियुक्तीवर भरु शकते. यामध्ये प्रशासन अधिका-यांचा हक्क काढून घेणे वगैरे काही नाही. प्रशासन अधिकारी २४ पद भरायचे ठरलेतर ते या तीन्हीमधुन अर्ज करुन पात्र होऊ शकतात. अर्हता बदलण्याचा प्रस्ताव शासनाकडे जाईल. शासनाने मंजूर केल्यातर हे होईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९९                                        प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.मंदा आल्हाट :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ८

दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.
भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४
दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०
दि.२०/०४/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेतील मौजे च-होली येथील स.नं.४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ पै (४६५ पै) मधील भागशः मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/८३ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना या आरक्षणाखालील महापालिकेच्या ताब्यात आलेले क्षेत्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकामी र.रु.३,२००/- प्रती चौ.मी. दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी महापालिकेच्या ताब्यात असलेल्या उपरोक्त क्षेत्राचे मनपाचे इडब्लूएस प्रोजेक्टसाठी प्रयोजन करणेस व कुठल्याही परिस्थिती मध्ये म्हाडा पुणे यांस न देणेस व जोपर्यंत या विषयावर निर्णय मा.सभेमध्ये होत नाही तोपर्यंत कुठलीही कार्यवाही ठ.क्र.१२४६ दि.१४/१२/२०११ प्रमाणे न करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.साधना जाधव :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.माछरे (विशेष अधिकारी) :- मा.महापौर साहेब, मागील सभेत खुलासा केल्याप्रमाणे ही जागा म्हाडाला देण्याकरिता ठराव झालेला आहे.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.नवनाथ जगताप :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ४६ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.
भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४
दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०
दि.२०/०४/२०१२ अन्वये.

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सीमा फुगे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ४७ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. संतोष लोंढे मा. हनुमंतराव भोसले यांचा प्रस्ताव -
२) मा. क प्रभाग समिती सभा दि.०५/१०/२०११ ठ.क्र.६३
३) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.६
दि.२/५/२०१२

वॉर्ड क्र.२३गुळवेवस्ती, शांतीनगर या भागात सद्यस्थितीत असलेल्या नाल्याचे समांतर असलेला विकास आराखडयातील १२.०० मी. रुंदीचा रस्ता तसेच सदर रस्त्यापासून शांतीनगर झोपडपट्टीमधुन एम.आय.डी.सी. “एस” ब्लॉक ला मिळणारा १२.०० मी. रुंदीचा रस्ता असे दोन्ही ही रस्ते लोकवस्तीमधुन व झोपडपट्टीमधुन जात आहे. या भागात सद्यस्थितीत असलेले रस्ते लक्षात घेऊन तसेच लोकवस्ती व झोपडपट्टी लक्षात घेऊन सदर रस्ते विकसीत करण्याची आवश्यकता वाटत नाही. तरी सदर दोन्ही १२.०० मी. रुंदीचे रस्ते विकास आराखडयामधून रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.अनुराधा गोफणे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- १०

दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे
क्र.नरवि/कावि/क४/२२७/२०११, दि. २८/१२/२०११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.८
दि.२/५/२०१२

१) २.० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राच्या रेखांकनात ५ टक्के सुविधा क्षेत्र ठेवणे अनिवार्य करुन त्यामध्ये त्यापैकी १० टक्के क्षेत्र परवडण्याजोगी रोजगार सुविधासाठी (Affordable Work Space ) राखून ठेवण्याबाबत

२) मनपाच्या शॉपिंग सेंटर / मार्केट इत्यादींचा विकास / पुनर्विकास करताना त्यामधील १० टक्के क्षेत्र हे Affordable Work Space साठी राखून ठेवण्याबाबत.

वरील दोन तरतूदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने जाहिर केलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती / सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावा सोबतच्या प्रपत्रानुसार ठेवणेत आला असल्याने त्या प्रमाणे अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.मंदा आल्हाट :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-
उपरोक्त शिफारशीमधील मुद्दा क्र.२ मध्ये शॉपींग सेंटर/रिटेल मार्केट/भाजी मंडई व तत्सम आरक्षणे जागा मालकाने/विकसकाने Accomodation Reservation (ॲकोमोडेशन रिझरवेशन) खाली विकसित केल्यास महापालिकेस त्यापोटी १५% बांधकाम हस्तांतर करण्याची तरतुद असल्याने अशा प्रकरणांना वरील नियम लागू नसावा. अशा प्रकारची दुरुस्ती करुन त्यासह अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेत यावी.
मा.शुभांगी बो-हाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, याचा खुलासा करावा.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, सदरचा प्रस्ताव ३७ अे खाली शासनाने केलेला आहे. त्यासाठी उपसंचालक विभागाने त्यांचे अधिकारी नेमलेले आहेत त्यावर सूचना, हरकती मागविलेल्या होत्या. पुणे विभागात जेवढया महापालिका आहेत

त्यासाठी प्रत्येक महापालिकेत हे पाठविलेले आहे. प्रत्येकानी मत कळविलेतर ते शासनाला कळविणार आहेत. ही हरकत सूचना नाही.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, पुर्वी आपले लेआऊट मंजूर होते, ओपनस्पेस होते. १० टक्के ओपन स्पेस, ५ टक्के ॲमेनीटी स्पेस त्याप्रमाणे हा विषय आहे का त्याच्या व्यतिरीक्त आहे.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, २ हेक्टरच्या वरती डीसी रुलमध्ये ५ टक्क्याची तरतूद आहे. ॲमेनिटी स्पेसमध्ये शॉपिंग वगैरे आहेत त्यात १० टक्के करायचे आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल लोकांसाठी हे प्रोव्हीजन आहे.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, पुर्वी आपण साडेसात एक्करवर ५ टक्के ठेवत होतो ते आता २ हेक्टरवर ठेवतो त्यातुन १० टक्के ईबी होते. हे करत असताना पाच हेक्टरवर साडेसात एक्करवर हे कमी केलेले आहे. आता पाच एक्करवर होते याची सविस्तर माहिती सांगीतली पाहिजे. जे क्षेत्र ठेवणार आहेत ते कोण हॅण्डओव्हर करणार. महापालिका करणार का शासन करणार आहे.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, आपल्या डीसी रुलमध्ये तीन हेक्टर आहे आता ३७ अे खाली दोन हेक्टर केलेले आहे. तीन वरुन दोन वर आले आहे. हे स्पेस लोकांना ॲव्हेलेबल करुन द्यायचे आहे. आपल्याला शॉपिंग सेंटर करायचे तर आपण सुध्दा ते स्पेस ठेवायचे आहे. फुकट देणे हा कन्सेप्ट नाही.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, कमर्शिअल प्लॉट महापालिकेच्या रिझर्व्हेशन मधुन घेतले आणि ते त्या विकसकाने किंवा जागा मालकांने विकसीत केलेतर बांधकामाच्या १५ टक्के एवढा हिस्सा महापालिकेला अंडरवर्क करिता त्यामध्येच हे समाविष्ट आहे का, का अगोदरच्या कलमामध्ये समाविष्ट आहे.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, हा जो प्रश्न आहे तो ॲकोमोडेशन रिझर्व्हेशनचा आहे. अशा गाळयांसाठी १० टक्के घ्यावेच लागेल.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, १५ टक्के शिवाय हे आहे का.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, नाही.

मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ४८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे
क्र.नरवि/कावि/क४/२२७/२०११, दि. २८/१२/२०११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.८
दि.२/५/२०१२

१) २.० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राच्या रेखांकनात ५ टक्के सुविधा क्षेत्र ठेवणे अनिवार्य करुन त्यामध्ये त्यापैकी १० टक्के क्षेत्र परवडण्याजोगी रोजगार सुविधासाठी (Affordable Work Space ) राखून ठेवण्याबाबत

२) मनपाच्या शॉपिंग सेंटर / मार्केट इत्यादींचा विकास / पुनर्विकास करताना त्यामधील १० टक्के क्षेत्र हे Affordable Work Space साठी राखून ठेवण्याबाबत.
वरील दोन तरतूदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने जाहिर केलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती / सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावा सोबतच्या प्रपत्रानुसार ठेवणेत आला असल्याने त्या प्रमाणे अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेत यावी अशी मा.आयुक्त यांजकडून शिफारस करणेत आली आहे. उपरोक्त शिफारशीमधील मुद्दा क्र.२ मध्ये शॉपींग सेंटर/रिटेल मार्केट/भाजी मंडई व तत्सम आरक्षणे जागा मालकाने/विकसकाने Accomodation Reservation (ॲकोमोडेशन रिझरवेशन) खाली विकसित केल्यास महापालिकेस त्यापोटी १५% बांधकाम हस्तांतर करण्याची तरतुद असल्याने अशा प्रकरणांना वरील नियम लागू नसावा. अशा प्रकारची दुरुस्ती करुन त्यासह अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.नितीन लांडगे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ११
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे
क्र.नरवि/कावि/ ४क/२०२/२०१२, दि.०५/०३/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.९
दि.२/५/२०१२

शासनाने सर्व महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान पेट्रोल पंप/डिझेल/ सी.एन.जी. इ. पंप बंद करुन तेथे विद्यमान वापराव्यतिरिक्त इतर वापर करण्याबाबत निर्बंध घालण्याचा शासनाने म.प्रा.व न.र.अधि १९६६ च्या कलम ३७(१) सह १५४ अन्वये सर्व महानगरपालिकांना क्र.टिपीबी-४६०८/२११/प्र.क्र.८७/ २००९/नवि-११ दि.०३/१२/२००९ नुसार निदेश दिलेले आहेत. सदर निर्णयाच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने नोटीस जाहीर केली आहे व त्यानुसार उपसंचालक नगररचना, पुणे विभाग पुणे यांना नियुक्त अधिकारी घोषित केलेले आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती/सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती/सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावासोबतच्या प्रपत्रानुसार असल्याने त्याप्रमाणे अभिप्राय पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.नितीन काळजे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, हा विषय गोंधळाचा आहे. शेतकरी असतील, सुशिक्षित बेकार असतील, ते पेट्रोल कंपनीला जागा देतात. तो तिथे पेट्रोल पंप उघडतो, भाड्याने जागा देतात त्यावेळी त्यांना कंपनीकडून ५% कमिशन मिळते. आज पेट्रोल पंप चालवणे परवडत नाही. या पेट्रोल कंपन्या या जागा हडप करण्याचा प्रयत्न करत आहेत. चांगले परवडत असते तर कोणी पेट्रोल पंप बंद करील, हा विषय फेटाळावा.

मा.नारायण बहिरवाडे :- मा.महापौर साहेब, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून सदरचा विषय आलेला आहे. या विषयात सांगितले आहे, नागरिकरणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे, त्यापद्धतीने वाहनांच्या संख्येत देखील मोठ्या प्रमाणात वाढ चालू आहे. त्यामुळे पेट्रोल पंप कमी पडू लागले आहेत. प्रत्येक शहरात जागेला भाव आल्यामुळे असलेले पेट्रोल पंप बंद करुन कमर्शियल कॉम्प्लेक्स उभे करण्याचा उद्योग सुरु झालेला आहे. पेट्रोल पंपांची संख्या मुळात कमी असून पेट्रोल पंपवाल्यांनी ते बंद करु नये म्हणून शासनाने विषय आणला आहे. विषय अतिशय चांगल्या पद्धतीने आला आहे. सदरचा विषय मंजूर करावा.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, शहरात वाढती लोकसंख्या, वाढती वाहने यामुळे भविष्यात एकही जागामालक पंपाला जागा देणार नाही. हा नियम अस्तित्वात आलातर एकही मनुष्य पेट्रोल पंप चालवायला घेणार नाही. कंपनीने कमिशन देणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे कंपन्या कमिशन देत नाही. केवळ जागा बळकवण्याच्या माध्यमातून काम करत आहे.

मा.अजित गव्हाणे - मा.महापौर साहेब, पेट्रोल पंप चालवणे खूप अवघड आहे. या शहरात पेट्रोल पंप झाले पाहीजेत. असे केले नाहीतर जागा मालकाच्या अधिकारावरच

गदा येणार आहे. पेट्रोल पंप उघडताना कंपनीबरोबर ३० वर्षांचे ॲग्रीमेंट केले जाते तोपर्यंत जागा मालकाला पेट्रोल पंप चालवावा लागतो. त्यानंतर त्याने काय करायचे हा त्याचा अधिकार आहे. पेट्रोल पंप चालवायचा का अन्य व्यवसाय करायचा या अधिकारावरच खऱ्या अर्थाने गदा येणार आहे. माझी विनंती आहे हा विषय फेटाळून लावावा अशा प्रकारचा अन्याय कोणत्याही जागा मालकावर करु नका.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, शासनाकडून विषय आलेला आहे. शासनाकडून मंजुरी आलेली असली तरी सभागृहाचा अभिप्राय अतिशय महत्वाचा आहे. पंप मालकांनी बऱ्याच कंपन्यांना लिजवर जागा दिलेल्या आहेत. काही प्रमाणात स्वत: पंप चालविलेले आहेत. एका बाजूला तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण चालू आहे. तो संदर्भ पाहून या मालकांना पेट्रोलपंप चालविणे अवघड आहे. हा व्यक्तीस्वातंत्र्यावर फार मोठा गदा आहे. इंधन पुरवणे नागरी सेवा आहे ते बंद झालेतर शहराचे दळणवळण बंद होईल. नगररचना विभागाच्या माध्यमातून आरक्षण टाकली जातात त्यांनी असे का करु नये अशा जागा आरक्षणात ठेवून लीजवर त्या जागा द्याव्यात. अशाप्रकारे शासनाला त्यांनी का कळवू नये. व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा विषय असल्यामुळे फेटाळण्यात यावा.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-४९ विषय क्रमांक :- ११
दिनांक :-१९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे
क्र.नरवि/कावि/ ४क/२०२/२०१२, दि.०५/०३/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.९ दि.२/५/२०१२

विषय क्रमांक ११ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.शत्रुघ्न काटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१२

दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-१ /२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११ दि.२/५/२०१२

मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील स.नं.२११ पैकी क्षेत्र जलाशय विभागाऐवजी निवासी विभागात समाविष्ट करणेकामी जाहिर नोटीशीचे अनुषंगाने ३० दिवसाचे विहित मुदतीत इकडील विभागास एकही हरकत प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरचे प्रस्तावास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी मान्यता व प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनय गायकवाड :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.नितीन काळजे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो--

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजुर विकास योजनेतील मौजे चऱ्होली येथील खालील नमुद केलेल्या रस्त्यांची तसेच आरक्षणांची त्या त्या भागात अत्यंत आवश्यकता असलेने नागरीकांच्या व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सदरचे आरक्षण व रस्ते लवकरात लवकर विकसीत होणे गरजेचे असल्याने सदरची उपसुचना मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी ठेवावे, ही विनंती.

१) ३० मी. रस्ता स.नं.जुना ४६७,४५६,४५७,४५८ (स.नं.नवीन ४१२,४००,४०१, ४०२) १८.० मी. रस्ता पठारे मळा येथे जाणारा स.नं.जुना ३८९, ३८७, ३८०, ३७८,४०५,३७५, ३५६, ३५५ (स.नं.नवीन ३४९,३४७,३४४,३४२,३६९,३३९,३२२,३२१)

२) आरक्षण क्रमांक २/१०३ प्राथमिक शाळा पठारे मळा येथील स.नं.जुना ३७७ पै, (नवीन स.नं.३४१)

३) आरक्षण क्रमांक २/६४ उद्यान तसेच आरक्षणालगतचा गावठाणाचे उत्तरेकडील १८.० मी. रस्ता

४) आरक्षण क्रमांक २/५६ प्राथमिक शाळा (काळजेवाडी) स.नं.जुना ४८६ पै, (नवीन स.नं.४३०)

उपरोक्त रस्त्यांचे व आरक्षणाचे प्रस्तावाने बाधीत खाजगी मिळकतींचे म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदी तसेच भुसंपादन कायदा १८९४ प्रमाणे खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डातील विषय आहे. आपण नदीच्या काठी फ्लड लाईन आखतोय, नदीचे पात्र मोठे करतोय, पाणी अडणार नाही तेथपर्यंत, पाणी जाईल तिथपर्यंत फ्लडलाईनची आखणी केली जाते. एकीकडे म्हणता फ्लडलाईनमधील पात्र वाढवा, दुसरीकडे ३ हेक्टरमध्ये असलेला जलाशयाचा कालवा खावून टाकता. या कालव्यात मुले पोहायची, तो कालवा बिल्डर्स गायब करतात. आमच्या परिसरातील शाळांच्या सहली इथे येत असत. जवळजवळ ३६ कोटींचा गफला करण्याचा प्रयत्न याठिकाणी चालू आहे. माझी विनंती आहे, विषय दप्तरी दाखल करावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, हा विषय अतिशय चुकीच्या पद्धतीने आलेला आहे. विषय सादर होत असताना सन्मा.सदस्यांनी सभागृहात उपसूचना मांडली आहे. त्याद्वारे प्रभागातून विषय आला आहे. उपसूचना करुन हा विषय केलेला आहे. नैसर्गिक जलाशयाची जागा रद्द करुन त्याठिकाणी रहिवासी झोन करण्याची अक्कल कोणाला सूचली. ही अक्कल एका बांधकाम व्यावसायिकाला सूचली असून त्याने महापालिकेला पत्र दिले आहे. मे.रामा यशोमाला को-ऑपरेटीव्ह सोसायटी मर्या. म्हणजे प्राईड पर्पल प्रॉपर्टीज् कडून श्री.अरविंद जैन यांनी दि.३०/१/२००८ ला पत्र दिले होते. त्याअनुषंगाने सदरच्या क्षेत्रापोटी २३ आर, त्याचा सातबारा संपूर्ण क्षेत्रासाठी आहे. त्या क्षेत्राची मोजणी केली. तलाव होता त्याचे क्षेत्र १ हेक्टर २३ आर क्षेत्र यापोटी ठेवले. बाकी क्षेत्राची मोजणी करुन लेआऊट काढून बांधकाम केले. आत्तासुद्धा बांधकाम झालेले आहे. संबंधित बांधकाम व्यावसायिकाने दि.३०/१/२००८ला पत्र दिले. तत्कालीन आयुक्त दिलीप बंड यांनी दोन दिवसांत जागेची पाहणी करुन अहवाल दिला. जागेची तपासणी केली. अहवाल केवळ दोन दिवसांत दिला. माझ्या प्रभागात असे काम आहे पाहणी करा असे सांगितले तर ते येत नाहीत. इथे मात्र दोन दिवसांत पाहणी करण्यात येऊन मग अभिप्राय दिला. प्राधिकरणाने दिलेला अभिप्राय योग्य होता, सदर मिळकत ही जलाशयाने (टँक) पूर्णतः बाधीत आहे. परंतू तत्कालीन आयुक्त दिलीप बंड यांनी - सॅटेलाईट इमेज वरून पाहणी करा, जलाशयात पाणी दिसत नाही. शहरात पुन्हा झोपडपट्टी विकसित होऊ नये म्हणून सदरचे क्षेत्र निवासी भागात समाविष्ट करावे असा अभिप्राय दिला. मी जाहिर आवाहन करतो की ज्या नागरीकांना राहण्यासाठी घर नाहीत त्यांनी नदीपात्रातमध्ये जावे. शासनाचे महापालिकेला आदेश आहेत ज्याठिकाणी कूपनलिका, बोअरवेल आहेत, मनपाची परमिशन घेत असताना त्यात रनिंग वॉटर हार्वेस्टींग,झरे,पावसाचे पाणी बोअरवेल त्यामध्ये सोडावे भूजलाच्या पातळीत घट झालेली आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल घसरतोय. पुढे पाण्यासाठी युद्धे होतील. पाणी मनुष्याची अत्यावश्यक गरज आहे. त्या परिस्थीतीत अडविलेल्या पाण्याचा साठा करता येईल. नैसर्गिक पाणी जमा होते ते प्रामाणिकपणे साठवले पाहिजे. भूगर्भात जिरवले पाहिजे. पाण्याची पातळी वाढविण्यासाठी काळजी घेतली पाहीजे. गेले सात वर्षांत त्या जलाशयात राडारोडा टाकून ते बुजविले होते. मी पूर्वीच्या आयुक्तांना पत्र दिले होते. तळे बुजवण्याचा घाट संबंधित बांधकाम व्यावसायीक करत आहे. माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते यांनी सुद्धा याबाबत पत्र दिले होते. वर्तमानपत्रांची कात्रणे सुद्धा माझ याकडे आहेत. कोट्यावधींचा डाव टाकून ते तळे बुजवून रेसिडेन्शियल झोन करण्याचा प्रयत्न चालू आहे. अतिशय चुकीच्या पद्धतीने विषय आल्यानंतर त्याला इथे मंजूरी

देण्यासंदर्भात सुद्धा कार्यवाही होणार आहे. मी जाहीरपणे आवाहन करतो की, ही चूक केली तर सर्व चुकीच्या प्रथा पडतील. बर्ड व्हॅलीची खाण, दुर्गादेवी टेकडीचा तलाव हे सुद्धा कोणालातरी द्यावे असे होईल. नागरवस्ती वाढते म्हणून मंजूरी देणे योग्य ठरणार नाही. मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकून तलाव बुजवण्याचे काम चाललेले आहे. वर्तमानपत्रांनी सुद्धा दखल घेतली आहे. अतिरिक्त आयुक्त प्रकाश कदम हे महसूल विभागातील अधिकारी आहेत. त्यांना माहित आहे राडारोडा टाकला गेला तरी त्याला दंड बसतो. आपण काय कारवाई केलीत. इथे मोठ्या प्रमाणात राडारोडा येऊन पडतो आपण याची चौकशी केली का. संबंधित व्यक्तींशी पत्रव्यवहार केला का. सगळा पूर्वनियोजित प्लॅन आहे. मोठी सेटलमेंट आर्थिक व्यवहार करुन विषय आलेला आहे. या विषयाला माझा विरोध आहे. हा विषय या सभागृहात फेटाळला गेला पाहीजे. अतिशय चुकीच्या पद्धतीने विषय मांडतोय. नैसर्गिक तळे गायब करुन १ हेक्टर २३ आर क्षेत्र आहे, नगररचना विभागाचा झोन दाखला आहे की, तिथे वॉटरबॉडी आहे. विषयपत्र येत असताना त्यात सदर भागात पाणी किंवा कोणतीही नदी जवळून मिळालेली नाही म्हणजे हा नैसर्गिक तलाव आहे. बंधाऱ्याचे पाणी जमा आहे. भविष्यात एकीकडे राज्यात दुष्काळाची परिस्थिती असताना, गावातील लोक शहराकडे वळतात याचे आपल्याला गांभिर्य नाही. पाणी अडवा, पाणी जिरवा असे सांगितले जात असताना, इथे पाणी बंद करताय काही कळत नाही. अतिशय चुकीच्या पद्धतीने विषय आलेला आहे. विषय दप्तरी दाखल करावा अशी विनंती करतो. हा विषय मंजूर होऊ नये.

मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, पैशाच्या व ताकदीच्या जोरावर जलाशय बुजवले जातात. अतिशय गंभीर विषय आहे. या जलाशयात मी एकेकाळी पोहलो आहे. अशा पद्धतीने जलाशय गायब होत असेल्याचा विषय सभागृहासमोर येतो ही मोठी गोष्ट आहे. हे गांभिर्याने घ्या. बिल्डरला नोटीस पाठवा तुम्ही जलाशय तयार करा म्हणून.

मा.धनंजय आल्हाट - मा.महापौर साहेब, आत्ताच आप्पांनी अभ्यास करुन, पोटतिडकीने विषय मांडला आहे. संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळ व पाण्यावरुन शासन व सगळ्या पक्षांच्या विरोधात आहे. ज्या पद्धतीने विषय आला आहे यामागे हितसंबंध आहेत. कोणत्याही साध्या नगरसेवकाच्या वॉर्डात आयुक्तांना पत्र दिल्यानंतर व्हिजिट मिळत नाही. दोन दिवसांत व्हिजिट देऊन इतके सारे घडत असेल तर यात हितसंबंध, काहीतरी शिजले जाते आहे, याची निश्चित चौकशी करावी. पाण्यासारख्या विषयावर पाक्षिक चर्चा अयोग्य आहे. ज्या पद्धतीने विषय मांडला आहे, सर्वांनी आपापल्या सद्सद्विवेक बुद्धीला विचारावे. पक्ष पातळीवर निर्णय न घेता शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न आहे. सर्वांनी सद्सद्विवेक बुद्धीला स्मरुन हा विषय फेटाळून लावावा.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, यातील अन्य कायदेशीर बाबी तपासण्यात याव्यात असे मला वाटते. खरी परिस्थीती काय आहे. जलाशयाचा विषय आयुक्तांनी ठेवला आहे. कोणाचा इंटरेस्ट असेल तर माहित नाही. सगळ्या प्रशासकीय गोष्टी तपासून विषय सभागृहासमोर येत असेल तर त्यात काहीतरी तथ्य आहे हे विसरले नाही पाहीजे. तिथे तलाव होता तो कुठे गेला हा प्रश्न आहे. या गोष्टीची कारणे काय. नैसर्गिक पाणी होते असे म्हटले जाते. गेली ८/१० वर्षे तिथे पाणी नाही केवळ पावसाचे

पाणी आहे. झरा आहे का. रेसिडेन्शियल झोनमध्ये कशासाठी कन्वर्ट करतो आहोत. प्रॅक्टीकल परिस्थीती नक्की काय आहे. माझ्यापेक्षा मा.विलास नांदगुडे किंवा मा.श्रीरंग बारणे यांचे त्या परिसरात वास्तव्य आहे. ते गेली अनेक वर्षे अभ्यास करत आहेत. पण या विषयात सर्वे नं. २११ असा आहे, कोणत्याही जलाशयाचा सर्वे नंबर नसतो. ती जागा आहे का जलाशय आहे. उद्या नदी बुजवणे प्रॅक्टीकली शक्य होणार आहे का. जलाशयाच्या काही अटी दूर व्हाव्यात म्हणून दिलीप बंड यांनी नोट लिहीली. या परिसरात बकालपणा येऊ नये. हा परिसर आत्ता कुठे माहित आहे. शहर बकाल करणारी परिस्थीती होती, ती तत्कालीन आयुक्तांनी सुधारली. कोणाचे वाईट करु नये म्हणून गेली अनेक वर्षे हा प्रस्ताव रखडला गेला. यात कोणत्या अडचणी आहेत का हे तपासण्यासाठीच हा प्रस्ताव मागे राहीला. हा परिसर पाहिला तर उजव्या बाजूने BRTC ग्रीन ग्राऊंड, डाव्या बाजूने अधिकृत वसाहत राहते. परिसर अतिशय चांगल्या पद्धतीने डेव्हलप होतो आहे. या प्रस्तावाचा गांभिर्याने विचार केला पाहीजे. प्रशासनाचा प्रस्ताव आहे त्यांनी ठेवला आहे. आयुक्तांच्या म्हणण्याप्रमाणे कार्यवाही व्हावी अशी विनंती करतो.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, मा.प्रशांत शितोळे यांनी मुद्दा मांडला. सदस्य प्रस्ताव नाही, प्रशासनाचा प्रस्ताव आहे. सभागृहात चर्चा होत असताना विषय वेगळा मांडला आहे. सभागृहातील जवळपास ९९ टक्के लोकांना जागेवरील परिस्थीती माहीत नाही. मा.को-हाळे म्हणाले, त्यांनी जागा पाहीली आहे. बाकी सभासदांना नेमकी परिस्थीती माहीत नाही. हा विषय ठेवताना सगळ्या बाजू तपासून पाहिल्या असतील. एकीकडे विषय मंजूर करावा अशी मागणी नाही. आमची आग्रहपूर्वक मागणी नाही. हा विषय आजच फेटाळला गेला पाहीजे हे रास्त आहे. नदीपात्रालगत असेल तर नक्की करु नये. चुकीचा विषय मंजूर होऊ नये. आयुक्त साहेबांना आत्ता नेमकी भूमिका सांगायला सांगा. हा विषय आत्ताच्या मिटींगमध्ये तहकूब ठेवावा.

मा.महापौर :- उपसूचना मागे घ्यावी लागेल.

मा.नितीन काळजे:- मा.महापौर साहेब, माझी उपसूचना माघारी घेत आहे.

(उपसूचना मागे घेण्यास सभेने परवानगी दिल्याने उपसुचना मागे घेणेत आल्याने तसे मा.महापौर यांनी प्रकट केले.)

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ५०  
दिनांक :- १९.५.२०१२

विषय क्रमांक :- १२  
विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-१ /२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२  
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११ दि.२/५/२०१२

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुनीता गवळी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ५१  
दिनांक :- १९.५.२०१२

विषय क्रमांक :-१३  
विभाग :- मा.प्रशासन अधिकारी शिक्षणमंडळ

संदर्भ- १) मा.निर्वाचन अधिकारी व महापौर यांचेकडील जा.क्र.महापौर/कावि/६६३/२०१२ दि.०२/०५/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या सदस्यत्वाकरिता दिनांक ३० एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या निवडणूकीमध्ये १) अनुसूचित जातीचे आणि अनुसूचीत जमातीचे प्रतिनिधी या प्रवर्गासाठी-ओव्हाळ लता आनंद, २) मॅट्रिक्युलेट किंवा द्वितीय वर्ष प्रशिक्षण प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा तत्सम किंवा उच्चतर शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व्यक्ती या प्रवर्गासाठी-लोखंडे विजय तुकाराम, घुले चेतन गोवर्धन,भालेकर धनंजय पांडुरंग, ३) सर्वसाधारण जागा या प्रवर्गासाठी-जाधव शिरीष विश्रामराव, शिवले जगन्नाथ कोंडीबा, शेख फजल दस्तगीर, शिंदे निवृत्ती विठ्ठल, सौ.खुळे सविता बाळकृष्ण, आगरवाल शाम साधुराम हे निवडून आले असल्याची बाब मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम १८ प्रमाणे अवलोकन करणेत येत आहे.

मा.उषा वाघेरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :-१४

दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/ड-१/७०/२०१२ दि.१६/४/२०१२
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३८दि.२०/०४/२०१२ अन्वये.

महानगरपालिका मंजूर सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-१८९३/१२७६/सीआर/१७४/९३/युडी-१३ दि.१८ सप्टेंबर १९९५, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजना शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि.२८ नोव्हेंबर १९९५ नुसार काही भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका नियोजन नियंत्रण कक्षेत शासन निर्णय क्र. पीएसएन/१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२ दि. १५ नोव्हेंबर १९९७ समाविष्ट करण्यात आलेले आहे तसेच या समाविष्ट क्षेत्रापैकी विकास योजना मंजूरीचेवेळी वगळलेल्या क्षेत्रासाठी शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि. २८ डिसेंबर १९९९ नुसार मान्यता मिळालेली आहे. महापालिका क्षेत्रात वाढीव हद्यीच्या विकास योजनेस टिपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३ दि.१८ ऑगस्ट २००९ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेकडे भोसरी, पिंपरी, पिंपळेगुरव व सांगवी मधील एकूण १४ प्रकरणी जागामालकांनी रस्त्याचे आरक्षणाने बाधित जमीनीचा मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय मिळणेसाठी महानगरपालिकेकडे अर्ज/प्रस्ताव दाखल केले आहेत. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.४.३ मधील तरतूद मध्ये (Development rights (DR's) are available only in case where development of a reservation has not been implemented) ज्या ठिकाणी आरक्षण विकसीत झालेले नाही त्या ठिकाणी देय राहिल, यामुळे मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय अदा केलेला नाही. वरील प्रमाणे महानगरपालिकेने या १४ प्रकरणां व्यतिरीक्त इतर अनेक ठिकाणीही जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे विकसीत केलेली आहेत. त्याबाबतही मोबदला देणेबाबत विकास नियंत्रण नियमावली मध्ये फेरबदलाचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

मा.महापालिका ठराव क्र. ८४८ दि. २१/४/२०१० नुसार "टीडीआर बाबतचे दि. ३/२/२००७ चे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि. १६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिके बरोबर केलेल्या लेखी करार असल्यास करारचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारीत मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि. १८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात आलेल्या जागेवर रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफएसआय/टीडीआर च्या स्वरुपात देणेकामी व त्या प्रमाणे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी म.प्रा.व न.र.अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे." मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रसिध्द केलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. सदर फेरबदलामध्ये प्रामुख्याने

१) नियम क्र.एन २.३ मध्ये विकास योजनेमधील नविन रस्ता अथवा रस्तारुंदीसाठी एफएसआय देय राहील (for road widening or constructing new roads) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागाताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधित जागेचा मोबदला एफएसआय स्वरुपात देय राहील, व

२) नियम क्र एन २.४.३ मध्ये विकास योजने मधील आरक्षण, रस्ता अथवा रस्तारुंदी विकसीत झालेली नाही अशा जागांसाठी टीडीआर अनुज्ञेय राहील (Development Rights DRs is available only in case where development of a reservation has not been implemented) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागा ताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधीत जागेचा मोबदला टीडीआर स्वरुपात देय राहील.

असे प्रस्तावित आहे.

सदर फेरबदल महाराष्ट्र राजपत्र १ जुलै २०१० मध्ये व वृत्तपत्र दै.लोकमत व दै.पुढारी मध्ये दि. १ जुलै २०१० रोजी प्रसिध्दी देण्यात आली त्यावर प्राप्त हरकती व सुचनां वर सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्राय तयार करण्यात आला आहे.

याबाबत प्रशासनाचे मत पुढील प्रमाणे आहे.

प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर सदर विकास योजना नकाशात जे रस्ते विकसीत झालेले (अस्तीत्वातील रस्ते) काळया रंगाने दर्शविलेले आहेत त्या व्यतिरीक्त जे रस्ते आहेत ते प्रस्तावित रस्ते व रस्ता रुंदी लाल रंगाने दर्शविलेले आहेत.

वरील बाबींचा विचार विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही.

अशा प्रकरणी

अ) सदर रस्ता, रस्तारुंदी व आरक्षण दि. १६/१२/१९९९ नंतर म्हणजेच विकास नियंत्रण नियमावलीत टीडीआरची तरतूद समाविष्ट झाली त्यानंतर विकसीत झाले असल्यास अशा जमीनीचा मोबदला टीडीआर स्वरुपात अदा करता येईल.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित केलेला आहे. त्यावर हरकती सुचनांबाबत सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्रायानुसार आवश्यक दुरुस्त्या व वरील अ प्रमाणे विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन शासन मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे मान्यतेस ठेवण्यात यावा. असा मा.आयुक्त यांजकडील प्रस्ताव आहे त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.सिमा फुगे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मौजे भोसरी (कासारवाडी) नाशिक फाटा येथे उड्डाणपूलाचे काम प्रगतिपथावर आहे. सदर उड्डाणपूल व त्यानुषंगिक वाहतुकीच्या व नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक क्षेत्राचे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. परंतु भूसंपादनाद्वारे क्षेत्र मनपाच्या ताब्यात येण्यास लागणारा कालावधी व पूलाचे सुरु असलेल्या कामासाठी जागेची निकड पाहता सदर आवश्यक बाधित क्षेत्र हितसंबंधितांनी महापालिकेच्या ताब्यात देऊ केल्यास संबंधितांचे बाधित क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) अन्वये अनुज्ञेय पर्यायाचे बदल्यास महापालिकेच्या ताब्यात घेण्यास मान्यता देणेत यावी. मौजे भोसरी (कासारवाडी) येथे स.नं.४७६ पैकी मध्ये महापालिकेचा सेवेज पंप व पंप हाऊस आहे. सद्यस्थितीमध्ये सदर सेवज पंप व पंपाकडे जाण्यासाठी खाजगी मालकांच्या जागेतून कच्चा रस्त्याचा वापर करण्यात येतो. सदर भागात विकास योजनेमध्ये उच्च क्षमता द्रुतगती मार्ग प्रस्तावित करण्यात आलेला आहे. परंतु अद्याप तो महापालिकेच्या ताब्यात नाही. भविष्यात सदर मार्गावर रिंग रोड अथवा रिंग रेल्वेचे नियोजन झाल्यास सदर सेवेज संप व पंप हाऊसकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने उच्च क्षमता द्रुतगती मार्गालगत १२ मी. रुंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये अथवा कलम ३७ अन्वये प्रस्तावित करणेस मान्यता देणेत यावी. मौजे भोसरी येथे स.नं.६८५ व ६८६ मधून व आरक्षण क्र.४१५ उद्यानाचे उत्तरेकडून जुना पुणे मुंबई रस्त्यापर्यंत १२ मी.रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्यामध्ये मनपा करदात्यांची घरे आहेत. उद्यान आरक्षण ते दुर्गा मंदिर रस्त्यापर्यंतचा १२ मी. रस्ता यापूर्वी रद्द करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात

आलेला आहे. तसेच उद्यानाचे पुर्वेकडून सदर १२ मी. रस्त्यापासून विकास योजनेत ९ मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यामुळे उद्यान ते जुना पुणे मुंबई रस्त्यापर्यंतचा विकास योजनेतील १२ मी.चा रस्ता ९ मी. करणेकामी कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.एन २.३ व एन २.४.३ या नियमात फेरबदल करण्यासाठी कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाच्या कार्यवाहीस शासनामान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यासाठी सभागृहाची मान्यतेकामीचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. कलम ३७च्या जाहिरातीस नागरीकांकडून मोठ्या प्रमाणात हरकती व सूचना आल्या आहेत. सदर हरकती व सूचनांचा साकल्याने अभ्यास करुन या विषयावर चर्चा व्हावी यासाठी सर्व सन्माननीय सदस्यांना टीडीआर च्या नियमात फेरबदलाच्या प्रस्तावास आलेल्या हरकती व सुचना आणि त्याबाबत प्रशासनाचा अभिप्राय मा.महापौरांच्या आदेशाप्रमाणे सर्वांना देण्यात आला आहे. परंतू अजेंडा पाठविल्यानंतर सभेच्या पाच दिवस आधी हा प्रस्ताव देण्यात आला आहे. यावर हरकत मांडायची होती, बोलायचे होते त्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ मिळाला नाही.

विकास नियंत्रण नियमावलीतील प्रस्तुत प्रस्तावीत फेरबदलास सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात येणाऱ्या हरकती व सूचना आणि त्याबाबत प्रशासनाचे अभिप्रायाबाबत माहिती नगररचना विभागाचे उपअभियंता प्रशांत पाटिल यांचेकडून मी घेतली होती. सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात येणाऱ्या हरकती व सूचना आणि त्याबाबत प्रशासनाचे अभिप्रायाबाबतचा तक्ता तपासल्यावर मला धक्काच बसला होता. सदर फेरबदल प्रस्तावास मी व इतर अनेक नागरीकांनी फेरबदल प्रस्तावाबाबतच्या संविधानीक व कायदेशिरबाबींचे लेखी व तोंडी स्वरुपात मांडलेल्या हरकती व सूचना सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात येणाऱ्या तक्त्यामधून पुर्णपणे वगळण्यात आल्या होत्या. सदर प्रकार अत्यंत गंभीर असून त्याबाबत दखल घेऊन प्रस्तुत फेरबदल प्रस्तावाबाबत नागरीकांच्या हरकती व सूचनांची संपुर्ण माहिती, परस्परपणे कोणतीही काटछाट न करता सभागृहाने कोणताही निर्णय घेण्यापुर्वी अभ्यासासाठी सर्व नगरसदस्यांना देण्यात यावी आणि तंतोतंतपणे सभागृहासमक्ष मांडण्याबाबतचे पत्र मी नगररचना विभागाच्या उपसंचालिका सौ.प्रतिभा भदाणे यांना दि. ०७.०५.२०१२ रोजी दिले होते. परंतु मला अत्यंत खेदाने नमूद करावे लागते की विषयाचा पाठपुरावा करुन व त्याबाबत कल्पना देऊन सुद्धा नागरीकांच्या हरकती व सूचनांची संपुर्ण माहिती सभागृहापुढे मांडण्यात आलेल्या नाहीत. उदा. फेरबदल प्रस्तावास श्री.संदिप शहा या नागरीकाने दि.३०.०७.२०१० रोजी सदर फेरबदलाच्या प्रस्तावास हरकती सूचना दिल्या होत्या. परंतु श्री.शहा यांच्या हरकती सूचनांचा व त्याबाबत प्रशासनाच्या अभिप्रायाची माहिती सभागृहाला का देण्यात आली नाही याचा खुलासा सौ.भदाणेंनी करावा. तसेच अजून किती नागरीकांच्या हरकती सभागृहापासून लपविण्यात आल्या आहेत हे सभागृहाला सांगावे.

नियम क्र.एन २.३ व एन २.४.३ या नियमात फेरबदलाच्या प्रस्तावात मी दिलेल्या हरकती सूचनांपैकी काही हरकती सूचनांची दखल घेत प्रस्तावात प्रशासनाने काही बदल केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

- महापालिकेतील इंग्रजीच्या तज्ञांनी इंग्रजीचे धिंडवडे काढत तयार केलेल्या ठरावातील इंग्रजीच्या शब्दकोषात उपलब्ध नसलेले claming, reuired हे शब्द दुरुस्त करुन claiming, required हे शब्द समाविष्ट केले आहेत. तसेच plot area of the plot area of the plot हे अर्थहीन वाक्य देखील दुरुस्त केल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करते.
- फेरबदलाच्या प्रस्तावातील free of encumbrances
  ही तरतूद वगळल्यामुळे अडथळा किंवा कर्जतारण/बोजा असलेल्या जमिनीच्या मोबदल्यात F.S.I. देणे चुकीचे व बेकायदेशीर ठरत असल्याने हे शब्द माझ्या हरकतींची दखल घेत प्रस्तावात समाविष्ट केल्याबद्दल धन्यवाद.
- तसेच फेरबदलाच्या प्रस्तावात रस्ते संपादित करताना TDR/F.S.I. स्वरुपात मोबदला अदा करताना खडीमुरुमकरणीरकरणाचा खर्च घेण्याची तरतूद वगळण्यात आली होती. ही तरतूद वगळल्यामुळे महापालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार होते. मात्र हि बाब हरकतीद्वारे प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्याने प्रशासनाने सदर तरतदू नगरचुकिने राहून गेल्याची कबुली देत पुन्हा समाविष्ट करुन महापालिकेचे आर्थिक हित जपल्याबद्दल त्यांचे आभार मानते.
- प्रस्तावित फेरबदलात Permissible height of १८ m may be relaxed up to २१ m. असे सूचविल होते. महानगरपालिकेच्या हद्दीत ७० मिटर उंच इमारत बांधण्याची परवानगी शासनाकडून देण्यात आली आहे. या नियमाअंतर्गत लाभ घेताना २१ मिटर पेक्षा उंच इमारतीचे बांधकाम करता येणार नाही किंवा कसे याबाबत स्पष्टता करावी अशी मागणी मी केली होती. त्याची दखल घेत Permissible height of १८ m may be relaxed up to ७० m. अशी दुरुस्ती प्रस्तावित फेरबदल प्रस्तावात करण्यात आली आहे.
- महानगपालिकेच्या डी सी रुल्स मध्ये TDR ची तरतूद ही १९ डिसेंबर १९९९ पासून समाविष्ट करण्यात आली आहे. १९ डिसेंबर १९९९ पूर्वी विकसित झालेल्या रस्त्यांना/आरक्षणांना पूर्वलक्षीप्रभावाने (Retrospective Effect) ने TDR चा लाभ देणे बेकायदेशीर असल्याबाबत माझ्या हरकतींची दखल घेत १८ सप्टेंबर १९९५ ऐवजी १९ डिसेंबर १९९९ नंतर विकसीत झालेल्या रस्त्यांना / आरक्षणांना TDR चा लाभ देण्याबाबतची दुरुस्ती केल्याबद्दल मी प्रशासनाचे आभार मानते.

मी घेतलेल्या अशा लहान सहान हरकतींची दखल प्रशासनाने घेतली आहे. परंतु प्रस्तावित फेरबदल प्रस्तावातील अनेक महत्वाच्या कायदेशीर व संविधानिक मुद्यांबाबत दिशाभूल करणारा खुलासा नगररचना विभागाने दिला आहे. उदा.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६च्या कलम ३७ अन्वये हरकती सूचना मागविण्याचा सर्वात महत्वाचा उद्देश हा लोकसहभागाचा आहे. मात्र

महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.एन २.३ व एन २.४.३ प्रस्तावित केलेल्या फेरबदलाची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात हरकती व सूचना मागविणेकामी प्रसिद्ध केलेला मजकूर हा इंग्रजीत आहे. सर्वसामान्य नागरीकच नाहीतर महापालिकेच्या बहुतांश नगरसेवकांना व अधिकाऱ्यांना देखील इंग्रजीतील विकास नियंत्रण नियमावली समजणे/अर्थ काढणे कठीण जाते (कलम ३७च्या ठरावामध्ये claming, reuired, plot area of the plot of the plot अशा अनेक चुका झाल्या आहेत). महापालिकेच्या सदर कृतीमुळे कलम ३७ च्या मूळ संकल्पनेलाच (लोकसहभागाची तरतूद) हरताळ फासला गेला आहे अशी हरकत माझ्यासह अनेक नागरीकांनी नोंदविली आहे. या हरकतीबाबत अभिप्राय देताना नगररचना विभागाच्या उपसंचालिका सौ.प्रतिभा भदाने यांनी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४८ उपकलम १ (ब) (iii) अन्वये "all orders, rules, regulations and bye-laws issued under the Constitution or under any law made by Parliament or the Legislature of a State, shall be in the English language"

तसेच नगरविकास सार्वजनिक आरोग्य व गृह निर्माण विभागाच्या १९७२ सालाच्या परिपत्राप्रमाणे "the Draft Development Plan, Regulations are the authoritative texts & should be necessarity drawn in English and if desired in Marathi the both languages i.e. Marathi & English" असा दाखला दिला आहे.

नगररचना विभागाच्या उपसंचालिका या त्यांच्या सवयीप्रमाणे अर्धवट माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. कारण संविधानातील ज्या अनुच्छेदाचा त्यांनी दाखला दिला आहे संविधानातील त्याच अनुच्छेदामध्ये पुढे असे म्हणले आहे की

(३) Notwithstanding anything in sub-clause (b) of clause (l), where the Legislature of a State has orescribed any language other than the English language for use in Bills introduced in, or Acts passed by, the Legislature (लेजिस्लेचर) of the State or in Ordinances promulgated (प्रॉम्युगलेटीड) by the Governor of the State or in any order, rule, regulation or bye-law referred to in paragraph (iii) of that sub-clause, a translation of the same in the English language published under the authority of the Governor of the State in Official Gazette of that State shall be deemed to be the authoritative text thereof in the English language under this article.

असे नमुद केले आहे, याचा अर्थ असा आहे की अनुच्छेद ३४८ उप कलम १ (ब) (iii) अन्वये ची तरतूद असली तरी देखील त्या त्या राज्याच्या भाषेनुसार कायदे, नियम, विधी, उपविधी, आदेश इ. करता येतात फक्त त्याचा अनुवाद इंग्रजीमध्ये उपलब्ध असला पाहीजे. तसेच संविधानाच्या या अनुच्छेद काल मर्यादा ही स्वातंत्र्य मिळाल्यापासून केवळ १५ वर्षापुरतीच लागु होती व नंतर प्रत्येक राज्य हे आपआपल्या भाषेनुसार कारभार करु शकते.

महाराष्ट्र राज्य भाषा अधिनियम १९६४ च्या कलम ५ नुसार महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या दिनांकापासून राज्याचा सर्व कारभार कायदे, नियम, आदेश, अधिसूचना, विधी, उपविधी आदेश इ. यांची अधिकृत भाषा हि मराठी असेल. मराठी भाषा हि राज्याच्या अकरा कोटी जनतेची अस्मिता आहे व शिवसेना भाजप युतीची सत्ता महाराष्ट्रात येताच शासनाने अधिसूचना काढून शासकीय कामकाजात मराठीचा वापर अनिवार्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य भाषा अधिनियम १९६४ च्या कलम ५ अंमलात आणण्याची तारीख हि दि.१५ ऑगस्ट १९९५ घोषीत केली व १९४७ साली इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळाल्यावर १९९५ ला महाराष्ट्राची इंग्रजीपासून सुटका केली. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर १००% करण्यासंदर्भात आत्तापर्यंत सुमारे ३९ आदेश काढलेले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ हे महापालिका कारभारातील महत्वाचे कायदे मराठीत उपलब्ध आहेत. तसेच ज्या संविधानाचा दाखला उपसंचालिकांनी दिला आहे ते संविधान सुद्धा मराठीत उपलब्ध आहे. महापालिकेच्या नियमात अर्थपूर्ण फेरबदल करताना नागरीकांकडून हरकतीच येऊ नये तसेच नगरसदस्यांना अंधारात ठेवण्यासाठी नियमातले बदल मुद्दामून इंग्रजीत करण्यात येतात. शासनाचा सर्व कारभार मराठीत चालतो सर्व अधिनियम आदेश परिपत्रके मराठीत असताना संबिधानाच्या अनुच्छेदाचा व शासनाच्या जुन्या परिपत्रकाचा दिशाबूल करणारा दाखला नेमके कोणाचे हित जपण्यासाठी दिला जात आहे याचा खुलासा प्रशासनाने द्यावा.

प्रस्तुत फेरबदलाचा प्रस्ताव सभागृहापुढे मांडण्यापूर्वीचे नगररचना विभागाचे दि. २९ जानेवारी २०१० तसेच सदर प्रस्तावास मंजूरी घेणेकामी विधी समितीचे मान्यतेने कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यासाठी मान्यता मिळणेकामी सभागृहापुढे विषय ठेवण्यासाठी नगरसचिवांना दि. ४ फेब्रुवारी २०१० रोजी मा.आयुक्तांनी दिलेल्या पत्राचे अवलोकन केल्यास असे दिसून येते कि प्रस्तावित फेरबदलाचा प्रस्ताव तयार करताना दि.०३ फेब्रुवारी २००७ रोजी टीडीआर बाबत शासनाने दिलेले निदेश व PMC ने खुलासा मागविला होता. त्यानुषंगाने राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.१६ ऑगस्ट २००७ रोजीचे मार्गदर्शनाचा साकल्याने विचार करुन प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. दि. १५ सप्टेंबर २००९ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधिश श्री. बिलाल नाझकी व न्या.श्रीमती व्ही.के. ताहिलरमाणी यांच्या खंडपीठाने दि.०३ फेब्रुवारी २००७ रोजी टीडीआर बाबत शासनाने दिलेले निदेश बेकायदेशीर ठरवत रद्द केला होता व अशा रद्द झालेल्या आदेशानुषंगाने मंजूर करण्यात आलेला ठराव बेकायदेशीर ठरतो आणि बेकायदेशीर ठरावाच्या आधारे चालू असलेली कलम ३७ची कार्यवाही सुद्धा बेकायदेशीर ठरत आहे अशी हरकत मी घेतली होती.

या अत्यंत महत्वाच्या व कायदेशीर हरकतीबाबत नोंदविलेल्या अभिप्रायामध्ये महाराष्ट्र शासनाने मा.उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केली आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती आदेश दिला आहे असे नमूद केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने हे निदेश रद्द केले आहेत हि महत्वपूर्ण बाब सभागृहापासून ठराव मंजूर करताना का लपविण्यात आला याचा खुलासा प्रशासनाने करावा. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास तात्पूर्ती स्थगिती १० सप्टेंबर

२०१० रोजी दिली होती म्हणजेच ज्यावेळी विधी समितीसमोर आणि सभागृहासमोर ठराव मांडण्यात आला होता तेव्हा दि. ०३ फेब्रुवारी २००७ रोजी टीडीआर बाबत शासनाने दिलेले निदेश हे उच्च न्यायालयाने रद्द केले होते व मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नव्हती. प्रशासनाने या महत्वाच्या घडामोडी सभागृहापासून लपविल्याने सभागृहाकडून उच्च न्यायालयाचा अवमान झाला होता. तसेच नुसार मा.सर्वोच्च न्यायासयाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास दिलेली स्थगिती ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे आणि या केसबद्दल मा.सर्वोच्च न्यायालयात दि.०४ एप्रिल २०१२ रोजी झ ालेल्या सुनावणीत

Revocation of leave and vacation of interim stay on account of subsequent events and office report म्हणजेच दरम्यान काळात घडलेल्या घडामोडी व कार्यालयीन अहवालाच्या पार्श्वभूमीवर अंतरीम स्थगिती उठविण्याबाबत सुनावणी चालु आहे. डी.सी. रुल्समध्ये टीडीआर चा नियमात बदल करण्याचा प्रस्ताव हा उच्च न्यायालयाने रद्द केले. टीडीआरबाबत दि. ०३ फेब्रुवारी २००७ शासनाने दिलेले निदेश असून त्या आदेशाच्या वैधतेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात अजून अंतिम निर्णय लवकरच होणार आहे. त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतीम आदेश आल्यावर पुढील कार्यवाही करणे उचित ठरेल.

भारताच्या संविधानाच्या

- Article ३१ प्रमाणे

No person could be deprived of property without due process of law and no property shall be taken possession of or acquired for public purposes under any law authorizing the taking of such possession or such acquisition, unless the law provides for compensation.

असे स्पष्टपणे नमूद केले आहे. मात्र भारताच्या संविधानातील अनेक अनुछेदांचा भंग महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. कोणताही मोबदला न देता सर्वसामान्य नागरीकांच्या जमिनी फसवणूक करुन किंवा बळजबरीने आणि बेकायदेशीरपणे संपादित केल्या आहेत. अशा प्रकारचा नियम प्रस्तावीत करताना महापालिकेने भारतीय संविधानाचा अवमान केल्याची कबुलीच आपण दिली आहे. माझ्या या हरकतीबाबत नगररचना उपसंचालिकाने अत्यंत बेफिकरीने अभिप्राय नोंदवित संविधानाच्या तरतूदीचे पालन करण्यासाठीच व जागा मालकांना मोबदला मिळण्यासाठी डी सी रुल्स मध्ये फेरबदल कार्यान्वित केला आहे असे नमूद केले आहे. संविधानाप्रमाणे सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली कोणत्याही व्यक्तिची मालमत्ता कायदेशीर प्रक्रीयेशिवाय संपादित करता येत नाही. ज्या जागा मालकांना टीडीआर/FSI देण्यासाठी हा खटाटोप चालु आहे त्यांची जमिन ताब्यात घेताना कोणत्या कायद्याच्या प्रक्रीयेने ताब्यात घेतल्या आहेत याचा खुलासा नगररचना उपसंचालिकेने करावा. उपसंचालिकेने आपल्या अभिप्रायात महापालिका रस्ते विकसीत करण्यापूर्वी प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे कार्यवाही करण्याची कार्यप्रणाली अवलंबली जात आहे असे नमुद केले आहे. नगररचना विभागाने प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे कार्यवाही करण्याची कार्यप्रणाली करण्याबाबतची परवानगी सभागृहाकडून घेतली आहे का याचा खुलासा प्रशासनाने करावा.

कायद्याच्या चौकटीत जी कामे झालेले नाहीत, जी कामे कायदेशीरपणे केली जात नाही, जी कामे संविधानाच्या विरोधात आहे अशा कामांना प्रोत्साहन देण्याचा नियम करणे हे महापालिकेच्या अधिकारात बसत नाही. डी सी रुल्स च्या मूळ तरतुदीत ज्या आरक्षणांचा / रस्त्यांचे ठिकाणी विकास झालेला नाही केवळ अशाच ठिकाणी देता येतो व ही तरतूद बेकायदेशीर संपादनाला आळा घालण्यासाठी करण्यात आलेली आहे. फेरबदलाच्या प्रस्तावात बेकायदेशीर संपादनाला कायदेशीर करण्याचा प्रयत्न केला जात आहे व अशा कधी पर्यंतच्या बेकायदेशीर कृत्यांना कायदेशीर करायचे हे निश्चित न केल्याने यापुढे जबरदस्तीने आणि नियमबाह्य संपादन करण्यासाठी खुली तरतूद ठेवण्याचा प्रयत्न हा संविधानाच्या आणि त्या खालील कायद्याच्या विरोधात आहे. सार्वभौम संविधानाचे विरोधात कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकिय कारवाई झाली पाहिजे. संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्क डावलणाऱ्या अशा अधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करुन मूळ जमिन मालकांना मोबदला दिला पाहीजे.

MRTP Act च्या कलम १२५ प्रमाणे निश्चित झालेल्या समाजोपयोगी आरक्षणांना ताब्यात घेण्याची कायदेशीर तरतूद MRTP Act च्या कलम १२६ मध्ये करण्यात आलेली आहे. कलम १२६ (१) अन्वये ज्या आरक्षणांचे / रस्त्यांचे क्षेत्राचे संपादन करावयाचे असेल असे क्षेत्राचे संपादन करताना ते संपादन करण्याचे आणि अशा संपादनाच्या मोबदल्याचे स्वरुप कसे असावे हे कलम १२६ (१) च्या उपकलम अ आणि ब मध्ये स्पष्ट केले आहे. तसेच कलम १२६ (१) (अ) किंवा (ब) व्यतिरीक्त समाजोपयोगी आरक्षणांसाठी आवश्यक राखीव क्षेत्राचे संपादन करण्यासाठी कलम १२६ (१) (क) अन्वये सदर क्षेत्राचे संपादन करण्यासाठी Land Acquisition Act १८९४ च्या तरतूदींप्रमाणे राज्य शासनाकडे अर्ज करणे बंधनकारक आहे. म्हणजेच MRTP Act मधील तरतूदींप्रमाणे ज्या क्षेत्राचे संपादन करावयाचे आहे केवळ अशा प्रकरणीच मोबदल्याच्या स्वरुपात टीडीआर अनुज्ञेय करता येतो आणि जे क्षेत्र संपादित करण्यात आले आहे असे क्षेत्रास मोबदला देण्याची तरतूद MRTP Act मध्ये नाही तसेच सदर तरतूद पूर्वलक्षी प्रभावाने झालेल्या बेकायदेशीर कृत्यांच्या नियमितीकरणाकरता वापरता येणार नाही अशी हरकत मी घेतली होती. या हरकतीबाबत दिलेल्या अभिप्रायात नगररचना उपसंचालिकेने आरक्षणांचे / रस्त्यांचे क्षेत्राचे विकास झालेले असल्याने त्याचा मोबदला देण्यास MRTP Act मध्ये प्रतिबंध असल्याचे दिसून येत नाही असे नमूद केले आहे. MRTP Act हा संविधानाच्या तरतूदींच्या आधिन असल्याने आधी विकास आणि नंतर मोबदला अशी कार्यप्रणाली असंविधानीक असल्यामुळे अशा स्वरुपाचे कार्यवाहीस अनुमती देण्याची तरतूद MRTP Act मध्ये करण्यात आलेली नाही व त्यामुळे आरक्षणांचे / रस्त्यांचे क्षेत्राचे विकास झालेले असल्याने त्याचा मोबदला देण्यास MRTP Act मध्ये प्रतिबंध असल्याचे दिसून येत नाही असे म्हणणे चुकिचे आहे. कायदेशीर गुंतागुंतीचा विषय असल्यामुळे कायदा विभागाचा अभिप्राय घेणे योग्य ठरत असते. प्रथम Act मध्ये बदल करावा लागेल. त्यासाठी विधिमंडळात हा विषय झाला पाहीजे. संविधानात अशी तरतुद नसल्यामुळे MRTP मध्ये नाही. MRTP Act नुसार DC रुल तयार करण्यात आलेले आहेत. MRTP Act मध्ये तरतुद नसताना DC रुलमध्ये बदल कसा करणार?

प्रस्तावित फेरबदलाच्या महासभेच्या ठरावात “१८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता व प्रत्यक्ष त्याच्या ताब्यात असलेल्या जागेवर रस्ते

/ आरक्षणे इ. विकास कामे केली आहे अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत दस्त लिहून दिल्यास FSI/TDR च्या स्वरुपात मोबदला देण्यात यावा असे म्हणले होते. परंतु प्रस्तावित फेरबदलाच्या या अटीचा समावेश करण्यात आलेला नाही व माझ्या या हरकतीबाबत अभिप्राय देताना नगररचना उपसंचालिकेने सदर बाब ही कार्यालयीन कामकाजाचा भाग आहे. त्यामुळे ती नियमामध्ये उल्लेख करणेची आवश्यकता वाटत नाही असे म्हणले आहे. सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर त्यातला कुठल्या मजकुराची आवश्यकता नाही हे ठरविण्याचा अधिकार उपसंचालिकेला कोणी दिला त्यांचे वक्तव्य हे सभागृहाचे अवमान करणारे आहे. तसेच सभागृहाने केलेल्या ठरावांचे अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाचे आहे. कशाची आवश्यकता आहे कशाची नाही हे ठरविण्याचा अधिकारा कोणत्याही अधिकाऱ्याला परस्पर प्राप्त होत नाही. त्यामुळे सभागृहाच्या ठरावातील हा महत्वाचा भाग वगळण्यात येऊ नये.

जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता व प्रत्यक्ष त्याच्या ताब्यात असलेल्या जागेवर रस्ते / आरक्षणे इ. विकास कामे कधी झाली हे फेरबदलाच्या या प्रस्तावाबरोबर प्रसिद्ध होणे गरजेचे होते. मात्र अशा प्रकारची कुठलीही माहिती महानगरपालिकेकडे संकलीत नाही. फेरबदलाच्या या प्रस्तावाबरोबर अशी कुठलीही यादी प्रसिद्ध अथवा संकलीत केली नसल्याने मोबदला देताना विकास कामांची नक्की तारीख कुठली आहे हे ठरवताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होणार आहे किंवा अशा प्रस्तावाला मंजूरी मिळेल या अर्थपूर्ण विचाराने अनेक ठिकाणी कागद पत्रांमध्ये हेराफेरी झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पैसे खाण्यासाठी अजून एक नवे टेबल प्रशासनाच्या हितासाठी तयार करण्यात येत आहे.

डी सी रुल्समध्ये FSI/TDR च्या नियमात फेरबदल करण्यासाठी नागरीकांकडून प्राप्त झालेल्या कायदेशीर व संविधानीक मुद्यांबाबत हरकतींचा अभिप्राय केवळ नगररचना विभागाकडून घेणे हे उचित ठरणार नाही. या प्रकरणामध्ये उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालय यांचे आदेश तसेच कायदेशीर व संविधानीक मुद्यांबाबतचा अभिप्राय कायदा विभागाकडून घेतला पाहिजे. नियम बदलण्याचा ठराव ज्या शासनाच्या आदेशावर आधारलेला तो आदेश ठराव मंजुर करताना उच्च न्यायालयाच्या आदेशाने रद्द ठरला होता आणि सर्वोच्च न्यायालयाने केवळ अंतरीम स्थगिती दिलेली आहे. मा.महापौरसाहेब सभेपुढील प्रस्ताव हा कायदेशीर गुंतागुंतीचा असल्याने याबाबत कायदा विभागाकडून अभिप्राय मागविण्यात यावा आणि उच्च न्यायालयाच्या आदेशाने रद्द ठरलेला शासनाच्या आदेशावर सर्वोच्च न्यायालयाचा अंतीम निकाल लवकरच येणार असल्याने तोपर्यंत सदर प्रस्ताव तहकूब ठेवावा अशी सूचना मी मांडते.

सभागृह हे सर्वोच्च आहे. जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेवर विकासकामे कधी झाली. कलम ३७ अन्वये फेरबदलाची कारवाई आणली त्यावेळी यादी प्रसिद्ध करणे प्रशासनाचे काम होते. ती अद्यापपर्यंत प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले नाही. अभिप्रायात निश्चितपणे दुरुस्ती केलेली आहे. जे रस्ते केलेले आहेत ते ताब्यात दिलेले आहेत,यासाठी अनेक फेरबदल केलेले आहेत. त्यामध्ये एककल्ली कारभार करायचा म्हटलेतर खरेतर सर्वसामान्य नागरिकांवर फार मोठा अन्याय होणारा आहे, हे कायदयाच्या विरुध्द आहे. उच्च न्यायालयात एखादा विषय पेंडींग असताना त्याच्यावर निर्णय देण्याचा अधिकार आपल्याला नाही. कोर्टाचा अवमान होईल. ठराव सभागृहात आला त्यावेळी नगररचना

विभागाला माहित होते. उच्च न्यायालयात विषय फेटाळला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. अशा वेळी निर्णय घेण्याची घाई करणार आहोत का. नगररचना विभागाला खरोखर गरीबांचा कळवळा आहे का, लाज वाटली पाहीजे बेशरम आहेत. २७ फेब्रुवारी २०१२ ला सर्वे नं.१ भोसरी तळया शेजारच्या क्षेत्राला TDR देण्याचा विषय होता १९९९ च्या अगोदरचा विषय आहे. प्राधिकरणाचे क्षेत्र ९७ मध्ये ताब्यात आले आहे. लाज नाही वाटत. शासनाकडे प्रस्ताव पाठवला हे ज्या दिवशी मला समजले त्या दिवशी पत्र दिले. ९५च्या अस्तित्वातील रस्त्याचा विषय प्रशासनाने सभागृहापुढे ठेवला नाहीतर तोंड दाखविता येणार नाही. पुन्हा १k खाली घाईघाईने विषय सभागृहापुढे आला. १००/१५० कोटींचा TDR दिला आहे. ९७ साली सर्वे नं.१ चे तळयालगतचे निम्मे क्षेत्र पाण्याखालचे आहे. तुमच्या तुमड्या भरल्या म्हणून शासनाला प्रस्ताव पाठवायचा असे वागताना लाज नाही वाटत. २ वर्षे प्रस्ताव पडून होता. ज्या दिवशी अभिप्राय मागितला त्याच्यानंतर अभिप्राय तयार करण्यासाठी घेतलेला आहे. TDR दलालांसाठी असे विषय इथे येणार असतीलतर या विषयासंदर्भात मला हायकोर्टाची दारे वाजवायला लावू नका. एकदा अपील टाकलेतर पुढे माघार घेणार नाही. इतक्या लोकांचे नुकसान होते हे प्रशासनाने कबूल करावे. कोणाच्यातरी भल्यासाठी प्रशासनाला शिव्या घालण्याचा आम्हाला अधिकार आहे. मी सुद्धा लोकांमधून निवडून आले आहे. मी कोणाला घाबरत नाही. महापौर साहेब, या ठिकाणी प्रशासनाने पाण्याखालचा TDR देण्याचा विषय शासनाकडे पाठवला होता. त्यांनी शासनाकडे कोणाला विचारून पाठवले, तेथे पैसा मिळणार आहे त्यांचे घर भरणार आहे म्हणून पाठवले आहे का. एवढी घाई कशासाठी? तो विषय आल्यानंतर सुद्धा प्रशासनाला चांगल्या पद्धतीने माहित आहे आपल्यावर कोणती कारवाई होत नाही म्हणून त्यांचे धाडस दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. ज्या नागरीकांच्या जमिनी ताब्यात घेतल्या, बळजबरीने घेतल्या असतील. त्यांना निश्चितपणे मोबदला मिळाला पाहीजे. कायद्याला दुर्लक्षित करुन चालणार नाही. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयात या विषयाला अंतिम स्थगिती मिळत नाही, तोपर्यंत हा विषय तहकूब करावा. अन्यथा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान केला असा अर्थ होईल. माझी विनंती आहे, माझा या ठिकाणी विरोध नोंदवून घ्यावा. जोपर्यंत या विषयाचा निकाल सर्वोच्च न्यायालयात लागत नाही, तोपर्यंत हा विषय करु नये केलातर माझा विरोध राहणार आहे. TDR दलालांची यादी सुध्दा माझ्याकडे आहे. सुखवानी, अजवानी हे कधी शेतकरी झाले, याठिकाणी मराठी माणस आहेत, भूमिपुत्र आहेत त्यांचे रक्त का तापत नाही. यांनी TDR हक्क विकत घेतले आहेत. मूळ शेतकऱ्यांचा फायदा होणार असेल तर मला सुद्धा विरोध करण्याची गरज नाही. कोणते रस्ते ताब्यात घेतले, १९९९ नंतरच्या याद्या प्रसिद्ध करा. आम्हाला दाखवल्यानंतर विषय करा. हे करत असताना आपल्याला सर्वोच्च न्यायालयाला विसरून चालणार नाही.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, सिमाताईंचा ढोस मिळाला आहे. सदरचा प्रस्ताव मॉडीफीकेशन करुन आलेला आहे. पिंपळेगुरव, सांगवी, भोसरी येथील रस्त्यांचे आरक्षण देण्यासंदर्भात विषय आहे. यात २८ जणांची प्रकरणे आहेत. त्यांनी TDR मागीतला आहे. आपल्याकडे २८ जणांची यादी तयार आहे. त्यातील २१ जण दलाल आहेत. ७ जण फक्त मूळ शेतकरी आहेत. यामध्ये सर्व भूमीपूत्र बंधू-भगिनींना आवाहन आहे, नम्र विनंती आहे, आपल्याला वॉर्डातल्या लोकानी न्याय मिळवून देण्यासाठी

याठिकाणी पाठवले आहे. TDR दलाल आहेत त्यांनी अक्षरश: भूमिपुत्रांना पिळवून घेतलेले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत जेवढे रस्ते आहेत, ९०% दलालांकडे आहेत. जेव्हा आमचे शेतकरी मोबदला द्या म्हणून बिनचपलेचे फाटक्या कपड्यात तूमच्याकडे येत होते, त्यावेळी अधिका-यांनी सांगितले आम्हाला गरज नाही इथे विकास झालेला आहे. दलालाकडून ॲक्वेझिशनखाली ९ मी.चा १२मी.चा रस्ता का घेतो. या दलालांकडून १२ मी. चा रस्ता का घेतो. ज्या साली TDR लागू झाला, त्यावेळी रस्ते झाले. त्यावेळच्या लोकांना तो TDR मिळाला पाहिजे अशी या विषयाच्या माध्यमातून मागणी आहे. २००७ चा प्रस्ताव आहे, परंतु हे रस्ते अगोदर झालेले आहे. ५०/१०० रुपयांत TDR घेतलेला आहे तो सी झोनमध्ये, बी झोनमध्ये लोड होईल त्यावेळेला तीकडचे रेट माहिती आहेत. आज तेथे चार/साडेचार हजार रु.स्क्वे. फूट रेट चाललेला आहे. फुकटात घेतलेला TDR नंतरच्या बॉडीमध्ये विषय झाला. त्या अनुषंगाने घाईघाईने हा विषय मंजूर होणार आहे. एवढया घाईने कशासाठी, दलालासाठी. प्रायोरिटीचा विषय केलेला होता, सगळया आरक्षणावर प्रायोरिटी लावून टाकलेली आहे. असे कुठल्या महापालिकेमध्ये आहे हे सांगावे. पुणे महापालिकेत असे कुठे सांगीतले जात नाही. शेतकरी आरक्षण द्यायला येतात तुम्ही घेत नाहीत कारण तुम्हांला दलालाकडून यायला पाहिजे. आज आपल्या लक्षात येईल की छोटे बांधकाम व्यावसायीक आहेत ते याठिकाणी रसातळाला चाललेले आहेत. हा विषय आमच्या भूमिपुत्रांचा आहे. माझे शेतकरी बांधवाना आवाहन आहे की आपण घाबरून आपल्या जागा दलालाला देवू नका. आज रस्त्याचे रेट ३०० ते ३२५ आहेतर पाच वर्षात काय होणार. शेतक-यांनी घाबरुन ती जागा दलालाला द्यायची आणि पाच वर्षात लोड करायचे. अविनाश पाटिल यांनी हे कारस्थान करुन निघून गेले. फक्त भूमिसंपादनाला प्रायोरिटी लागू व्हावी. याठिकाणी जो विषय घेतला त्यात फक्त भूमिसंपादनाला प्रायोरिटी मध्ये घ्यावे अशी माझी विनंती आहे. डेव्हलपमेंट चार्ज घेतले जातात मग आरक्षण तुम्हांला आरक्षण संभाळायला काय झाले. याठिकाणी तीन ते चार दलाल काम करतात त्यांच्यासाठी हा विषय घेतलेला आहे. जो शेतकरी आरक्षण घेवून जातो त्यांना सुध्दा टिडीआर द्यावा. माझा या विषयाला विरोध आहे. जोपर्यंत प्रायोरिटी लिस्टचा विषय पुढे जात नाही तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा. आपण सुध्दा भूमिपुत्र आहात. सगळया नगरसेवकांना आमची विनंती आहे, हा माझ्या घरचा विषय नाही. शेतक-यांना टिडीआर मिळाला पाहिजे याचा विचार करावा. हा लढा याठिकाणी आहे उदया तो रस्त्यावर येईल. प्रत्येक भूमिपुत्राच्या घरापर्यंत जाईल. हा विषय तहकूब करावा.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, टिडीआर संदर्भात विषय आहे. दोन्ही ताई या विषयावर बोलल्या आहेत. आपण घाईघाईने हा विषय मंजूर केलातर, ब-याचशा नवीन सदस्यांना बोलण्याची उत्सूकता होती परंतु ते पक्षाच्या भिंतीमध्ये असल्याने आपण आपले नुकसान करुन घेतो. ते का बोलत नाहीत हे समजत नाही. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करतो, ९५ पुर्वीच्या बाधीत क्षेत्राना टिडीआर देतो. त्यामध्ये मुळमालक, शेतकरी कोणी आहे असे वाटत नाही. जसे प्राधिकरणाने शेतक-यांकडून जमिनी घेतल्या व साडेबारा टक्के परतावा दिला तसे टिडीआर संदर्भात का करु नये. शेतक-यांना ५० टक्के टिडीआर द्यावा नंतर उर्वरीत लोकांना टिडीआर द्यावा. शेतकरी त्यांच्या जागेवर आरक्षण पडले म्हणून घाईघाईने जागा विकतो. नगररचना खात्याकडून

तुमच्या जागेवर आरक्षण पडलेले आहे अशी शेतक-यांना माहिती मिळाली पाहिजे. अनेक शेतकरी भूमिहिन झालेले आहेत. येथे शेतकरी आलेतर त्यांना टिडीआर दिला पाहिजे. येथे कायदा उलट आहे, दुध खाणारे वेगळे आणि मलाई खाणारे वेगळेच आहेत. प्रशासनाच्या वतीने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्याची गरज आहे. टिडीआर शेतक-यांना आणि भूमिपुत्रांना मिळावा. शेतक-यांनी त्यांच्या जमिनी देवून स्टॅम्पडयूटी सुध्दा त्यांनी भरायची हा शेतक-यांना फाशी देण्याचा प्रकार आहे. फाशी देण्यासाठी दोरी सुध्दा तुम्हीच घेवून या असा प्रकार चाललेला आहे. मेल्यानंतर अंतीम संस्काराचे सामान सुध्दा तुम्हीच घेवून या असे आहे. तरी या नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करावा जेणेकरुन मुळ मालकांना, शेतक-यांना तो टिडीआर मिळणार. ब-याचशा शेतक-यांना टिडीआर माहित नाही. टिडीआर म्हणले की शेतकरी घाबरतात. महापौर साहेब आपण सुध्दा शेतकरी कुटूंबातील आहात त्यामुळे ज्या शेतक-यांच्या जागेवर आरक्षण आहेत त्यांनाच मोबदला मिळवून द्यावा. याठिकाणी पाक्षीक वाद निर्माण केला जातो. पठाणताईनी ब-याच वेळा असे केलेले आहे. तरी हा प्रस्ताव पाठवून विकास नियंत्रणामध्ये बदल करावा व फक्त शेतक-यांना टिडीआर मिळावा अशी आमची मागणी आहे. जर हा विचार झाला नाहीतर रस्त्यावर जावून, न्यायालयात जावून त्याठिकाणी न्याय मागू.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आता सिमाताई, उबाळेताई व धनंजय आल्हाट यांनी सविस्तर चर्चा केलेली आहे. हा सभागृहापुढे आलेला विषय शासनाकडे पाठविण्यासाठी जागामालकांनी ९९ नंतर कुठलाही मोबदला न घेता जागा ताब्यात दिलेल्या आहेत. असा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. आमची सुध्दा अशीच भूमिका आहे. मोबदला हा जागामालकांना मिळाला पाहिजे. ज्या शेतक-यांनी मोबदला घेतलेला नाही त्यांना मोबदला मिळावा अशाप्रकारची भूमिका सभागृहामध्ये सर्वांनी घेतलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एकमेव महापालिका अशी आहे की पक्षभेद बाजूला ठेवून सभागृहामध्ये काम चालते. कधीही विरोधी पक्षाचा नगरसेवक म्हणून वेगळा न्याय अशी भूमिका घेतलेली नाही. लोकशाही पध्दतीने काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणावरही अन्याय होऊ देत नाहीत. तुम्ही वारंवार मुद्या मांडतात तुमचे बहुमत आहे म्हणून. प्रायोरिटी लिस्ट केलेली चुकिच्या पध्दतीने केलेली आहे. ताईनी मांडलेले मुद्ये बरोबर आहेत. शेतक-यांच्या जागेवर आरक्षण टाकून ते दोन-पाच वर्षात घ्यावे असे म्हणतो परंतु त्यांच्या घरात लग्न असेलतर ते पाच वर्षे वाट बघणार का. त्यावेळेत त्यानी जागा विकलीतर त्याठिकाणी अनाधिकृत बांधकाम होईल. जुन्या गावामध्ये काय परिस्थिती आहे. त्यावेळेला टिडीआरचा कन्सेप्ट हा नव्हता. त्यामुळे त्यांनी जागा विकल्या. त्याठिकाणी कामगारानी घर बांधली अशा अनेक ठिकाणच्या आरक्षणावर घरे झालेली आहेत. १९९९ ला टिडीआरची अंमलबजावणी झाली. ९९ नंतर आरक्षण महापालिकेच्या ताब्यात आली. टप्पाटप्याने हे आरक्षण विकसीत करतो. किमान जागा ताब्यात घेवून त्याला कंपौड करुन ते आरक्षण डेव्हलप करायला पाहिजे. नागरीक टॅक्स भरतात त्यांच्यासाठी या सुविधा करण्याची भूमिका शासनाची, महापालिकेची आहे. जागामालक किंवा काही लोक व्यावसाय करतात ते चुकिचे नाही त्यामध्ये दोन नंबर काहीच नाही. ज्याला वाटते त्यांनी ते करावे त्यात चुकिचे काहीच नाही. प्रायोरिटी बाबत मागच्या जीबी मध्ये विषय आलेला होता. प्रायोरिटी ही भूसंपादनाला असली

पाहिजे आणि हे टप्याटप्याने करावे अशाप्रकारचे प्रोव्हीजन आहे. आमच्या सुध्दा जागेमध्ये आरक्षण आहेत. आमची सुध्दा जागा महापालिकेच्या ताब्यात घेतल्या पाहिजेत. प्रायोरिटी लिस्ट भूसंपादनामध्ये असावी त्यावर अंमलबजावणी करत नाहीत. प्रायोरिटी लिस्ट प्रमाणे आरक्षण ताब्यात घेतले पाहिजेत. अशा पध्दतीने केलेतर ठरावीक लोकांचा फायदा होईल. यासंदर्भातील खुलासा नगररचना विभागाने करावा. आम्ही उपसूचना दिलेली आहे फक्त भूसंपादनासाठीच प्रायोरिटी असावी. तरी नगररचना विभागाने याचा खुलासा करावा.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, प्रायोरिटी लिस्ट प्रशासनाने करुन जीबीने त्याला मान्यता दिली. २०/६/२०११ ला त्यात काही ॲमेन्डमेंट सुचविलेल्या आहेत त्या दुरुस्त करुन जी प्रायोरिटी लिस्ट शासनाला पाठवावी लागते ते प्रोसेस चालू आहे. लवकरच शासनाला प्रायोरिटी लिस्ट पाठवित आहोत. भूसंपादनाला आपण जी प्रायोरिटी लिस्ट केलेली आहे ते कोणत्या जागेचे आरक्षण विकास योजनेत दर्शविलेले असते ते भूसंपादन ॲक्वायर करत आहोत. एमआरटीपी १६८ ची तरतूद आहे त्याच्यामध्ये भूसंपादन ॲक्ट डेव्हलपमेंट ॲथॉरेटीना वाटेल तेव्हा एखादया जागेचे भूसंपादन करु शकते. एफएसआय, टिडीआर नसेलतर भूसंपदन करायचे अशा गोष्टी १२६ मध्ये आहेत. प्रायोरिटी लिस्ट भूसंपादनासाठी केलेली होती आणि भूसंपादन एक पर्याय आहे. मा.आयुक्त साहेबांशी परत टिडीआरच्या प्रश्नावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात येईल.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, टिडीआरसाठी प्रायोरिटी नसावी म्हणून आम्ही ठराव मंजूर केलेला होता. शेतकरी स्वत:हून जागा ताब्यात घेण्यासाठी येत असतीलतर त्या घ्याव्यात. त्यावर आपण अंमलबजावणी करायला पाहिजे. जागा मालकांना असे सांगीतले जाते तुमचे प्रायोरिटी लिस्टमध्ये नाही. त्या शेतक-यांना अडचण असेलतर कमी पैशामध्ये तो जागा विकतो त्यामध्ये जागामालकाचे नुकसान आहे. टिडीआरसाठी प्रायोरिटी लिस्ट नसावी यास मंजूरी दिलेली होती ते का करत नाहीत याचा खुलासा करावा.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, ठराव केलेला होता. जरी कोणी टिडीआर देत असलेतरी त्याला प्रायोरिटी लिस्ट नसावी हे सर्व घेवून प्रशासनाचे मत घेवून शासनाला प्रायोरिटी लिष्ट पाठवित आहोत त्या अगोदर मा.आयुक्त यांच्याकडे बैठक आयोजित केलेली होती यावर काहीतरी ठोस निर्णय घ्यावा लागेल.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, मुळात शासनाने काही ठरविलेले नाही. हे इतर महापालिकेत नाही आपण असे का चुकिचे करतो.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, शासनाने आपल्याला सर्क्यूलर पाठविलेले होते. तुमच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये बरेचसे आरक्षण असतात ती आरक्षण डेव्हलप करावयाची असतीलतर फेजींग करावे लागेल. वर्षात सर्वच होतील असे पॅासीबल होत नाही त्यासाठी फंड अव्हेलेबल होत नाहीत. विकसनशील भाग आहे

तेथील तुम्ही फेजवाईज घ्यावे. महापालिकेला सुध्दा भूसंपादनाचा खर्च परवडला पाहिजे. त्यामुळे ही प्रायोरिटी लिस्ट तयार करुन जीबीला पाठविलेली होती. टिडीआरचा विषय आहे त्याबाबत आयुक्तांशी चर्चा करुन काय करता येईल ते पाहिले जाईल.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, हा विषय ब-याच दिवसानी मागणीप्रमाणे आलेला आहे. मी सीमाताई सावळे यांचे अभिनंदन करतो कारण तुमच्यामुळे हा विषय आलेला आहे. त्यामुळे भुमिपुत्रानी अर्ज केलेला आहे त्यांचा किमान फायदातरी होईल व तेवढयापुरते तरी आम्हांला समाधान लाभेल. गेल्या पाच ते सहा वर्षामध्ये आपले शहर झपाटयाने वाढलेले आहे. हे वाढत असताना आमचेसारखे सभासद या सभागृहात दहा-दहा वर्षे आहेत या दहा वर्षात शहराचा कायापालट काय झाला याचे तुम्ही आम्ही साक्षीदार आहोत. रस्त्याचे जाळं मोठयाप्रमाणात विकसीत होण्यासाठी येथे प्रयत्न झालेला आहे. शेतक-यांनी केलेल्या सहकार्याबद्यल आणि येथील यंत्रणेमुळे हे झालेले आहे. आपल्या शहरात ज्या ज्या शेतक-यांनी आपल्याला सहकार्य करुन जागा दिलेल्या आहेत त्यांना विसरुन चालणार नाही. केवळ जागा देतो किंवा टिडीआर माफीया यामध्ये आहेत असे म्हणणे चुकिचे वाटते. आम्ही सुध्दा स्वत:हून जागा दिलेल्या आहेत. आमच्या सुध्दा जागा रस्त्यामध्ये गेलेल्या आहेत त्याचा मोबदला घेतलेला नाही. जागा दिलेल्या शेतक-यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा विषय काही व्यक्तिच्या स्वार्थासाठी आलेला आहे असे म्हणणे चुकिचे आहे. कायदेशिर बाबीची तपासणी केल्यानंतर हा विषय ठेवलेला आहे. जे नियमाला धरुन आहे ते व्हावे व त्याला मान्यता द्यावी.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, भुमिपूत्रांना विरोध नाही परंतु किती भुमिपूत्रांना याचा लाभ होणार हा संशोधनाचा विषय आहे. पठाणताई मी तुमचे नाव घेऊन सांगतो विषय का आला. मागणी कोणी केली म्हणून विषय आला त्यांचे मी नाव येथे वाचून दाखवितो. (टिडीआरची मागणी केलेल्यांच्या नावाची यादी वाचून दाखविली) या मागणीच्या अनुषंगाने १९९५ पासून ज्या जमिनमालकांनी त्यांच्या जमिनी रस्त्यासाठी व रिझर्व्हेशननुसार महापालिकेच्या ताब्यात दिल्या त्यांनी टिडीआर द्यावा असा अर्ज केलेला आहे. शासनाचे गाईडस् असे आलेले आहेत की टिडीआर लागू झाला तेव्हापासून टिडीआर द्यावा. कोणत्याही जमिनमालकाना टिडीआर देण्याच्या संदर्भात विरोध नाही. जमिनमालकांना तो मिळाला पाहिजे परंतु त्यांच्या नावावर व्यावसाय होणार असेलतर हा विषय मंजूर करत असताना त्याचा सुध्दा विचार करावा. येथे टिडीआरचा व्यावसाय होतो त्या अनुषंगाने भुमिपूत्रांना पुढे केले जाते आणि कोणीतरी मध्यस्थी करते. भुमिपूत्रांनी स्वत:च्या जागा रस्त्यासाठी दिलेल्या असतील, रिझर्व्हेशनसाठी दिलेल्या असतीलतर त्यास मोबदला मिळालेला नसेलतर तो दिला पाहिजे. त्यावेळेला १०० रु. स्टॅम्पवर लिहून घेवून जागा महापालिकेला हस्तंतारीत करायचे, ज्यांनी जागा दिली त्यांना मोबदला मिळाला पाहिजे. भुमिपूत्राना मोबदला मिळाला पाहिजे. त्यामुळे कायदयामध्ये प्रामुख्याने बदल झाला पाहिजे. महापालिकेच्या नगररचना विभागाचा कारभार कशा पध्दतीने चालला आहे तो माफीयासाठीच चाललेला आहे. महापालिकेचे अनेक अधिकारी बिल्डर लोकांनी पार्टनरमध्ये घेतलेले आहेत. आज जागेच्या टिडीआरचे

रेट वाढलेले आहेत. ज्यांच्यासाठी हा विषय आहे त्यांना मदत होत नाही, दुस-याना मदत होते. हा विषय झाला नाहीतर मला सुध्दा कोटयावधीचे नुकसान होणार आहे परंतु याची काळजी मला वाटत नाही, कारण ज्यांच्यासाठी विषय आलेला आहे त्यांना याचा मोबदला मिळत नाही तो दुस-यांना मिळतो. स्थानीक भुमिपूत्रांना याचा फायदा मिळाला पाहिजे याचा विचार करुन निर्णय घ्यावा असे सांगतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, या विषयाला मंजूरी दिली. तहकूबी झाली, सूचना झाल्या, ऊहापोह झाला, याची सगळी माहिती सभागृहाला विस्तृतपणे देण्याची आवश्यकता नव्हती. इतरांच्या ज्ञानात भर पडली, TDR काय विषय आहे तो घेताना मोबदला मागता, सगळ्यांना द्यावा लागला असताना सभागृहात या विषयावर चर्चा करत असताना आपण आरोपी नाही ना, चोर नाही ना, गुंड नाही ना अशी शंका वाटते. TDR मध्ये चूकीचे विषय, योग्य विषय याचा संबंधच काय आहे. राज्य शासनाने का केले. पुण्यातील TDR चा भाव दाखवा. जेथे शहर आहे, तेथे डेव्हलपमेंट, कोर्ट, कायद्याचे ज्ञान, अज्ञान सर्व काही असणार आहे. माझे स्वत:चे मत आहे की, या विषयावर अधिक चर्चा न करता सर्वांनी या विषयावर ऑब्जेक्शन दिलेले आहे. न्यायालयात प्रस्तावित असले तरी कोर्टाने त्याला स्थिगिती दिलेली नाही, कोर्टाने त्याचा निर्णय घेऊ नये असे म्हटलेले नाही, जेणेकरुन कंटेम्पट कन्टेम्शन होते. जेथे सध्याची परिस्थिती असेल तर हे म्हणणे अजब होते. कोणाला हायकोर्ट ठाऊक नाही, संबंधितांना तेवढे ज्ञान आहे, कायदा कळतो. आमचे अधिकार कळतात, ज्याला कुठे जायचे असेल तेथे जावे. घडाभर ऑब्जेक्शन आलेले आहेत. प्रशासनाचा कंट्रोल आहे तो ठेवून कायद्याप्रमाणे निर्णय व्हावा. सभागृहात विषय रितसर आला आहे. रितसर मंजूरी मिळावी. शासनाची अंतिम मंजूरी घेणार आहे. नियम धाब्यावर ठेवून नियम न पाळता मान्य करणार असा कोणताही अविचार केलेला नाही. रितसर नियमाने काम करतोय. सभागृहाच्या वतीने विनंती करतो की, अधिक चर्चा न करता हा विषय मंजूर करावा.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ५२ | विषय क्रमांक :-१४ |
| दिनांक :- १९.५.२०१२ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/ड-१/७०/२०१२ दि.१६/४/२०१२
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३८ दि.२०/०४/२०१२ अन्वये.

महानगरपालिका मंजूर सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३ /१२७६/सीआर/१७४/९३/युडी-१३ दि. १८ सप्टेंबर १९९५, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजना शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि.२८ नोव्हेंबर १९९५ नुसार काही भाग पिंपरी चिंचवड

महानगरपालिका नियोजन नियंत्रण कक्षेत शासन निर्णय क्र. पीएसएन/१६९७/९३४ /प्र.क्र.८९/नवि-२२ दि.१५ नोव्हेंबर १९९७ समाविष्ट करण्यात आलेले आहे तसेच या समाविष्ट क्षेत्रापैकी विकास योजना मंजूरीचेवेळी वगळलेल्या क्षेत्रासाठी शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि.२८ डिसेंबर १९९९ नुसार मान्यता मिळालेली आहे. महापालिका क्षेत्रात वाढीव हद्दीच्या विकास योजनेस टिपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३ दि.१८ ऑगस्ट २००९ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेकडे भोसरी, पिंपरी, पिंपळेगुरव व सांगवी मधील एकूण १४ प्रकरणी जागामालकांनी रस्त्याचे आरक्षणाने बाधित जमीनीचा मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय मिळणेसाठी महानगरपालिकेकडे अर्ज/प्रस्ताव दाखल केले आहेत. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.एन २.४.३ मधील तरतूद मध्ये (Development rights (DR’s) are available only in case where development of a reservation has not been implemented) ज्या ठिकाणी आरक्षण विकसीत झालेले नाही त्या ठिकाणी देय राहिल, यामुळे मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय अदा केलेला नाही. वरील प्रमाणे महानगरपालिकेने या १४ प्रकरणां व्यतिरीक्त इतर अनेक ठिकाणीही जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे विकसीत केलेली आहेत. त्याबाबतही मोबदला देणेबाबत विकास नियंत्रण नियमावली मध्ये फेरबदलाचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

मा.महापालिका ठराव क्र. ८४८ दि. २१/४/२०१० नुसार “टीडीआर बाबतचे दि.३/२/२००७ चे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि.१६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिके बरोबर केलेल्या लेखी करार असल्यास करारचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारीत मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि. १८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात आलेल्या जागेवर रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफएसआय/टीडीआर च्या स्वरुपात देणेकामी व त्या प्रमाणे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी म.प्रा.व न.र.अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.” मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रसिध्द केलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. सदर फेरबदलामध्ये प्रामुख्याने

१) नियम क्र.एन २.३ मध्ये विकास योजनेमधील नविन रस्ता अथवा रस्तारुंदीसाठी एफएसआय देय राहील (for road widening or constructing new roads) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागाताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधित जागेचा मोबदला एफएसआय स्वरुपात देय राहील, व

२) नियम क्र एन २.४.३ मध्ये विकास योजने मधील आरक्षण, रस्ता अथवा रस्तारुंदी विकसीत झालेली नाही अशा जागांसाठी टीडीआर अनुज्ञेय राहील (Development Rights DRs is available only in case where development of a reservation has not been implemented) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागा ताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधीत जागेचा मोबदला टीडीआर स्वरुपात देय राहील. असे प्रस्तावित आहे.

सदर फेरबदल महाराष्ट्र राजपत्र १ जुलै २०१० मध्ये व वृत्तपत्र दै.लोकमत व दै.पुढारी मध्ये दि. १ जुलै २०१० रोजी प्रसिध्दी देण्यात आली त्यावर प्राप्त हरकती व सुचनां वर सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्राय तयार करण्यात आला आहे.

याबाबत प्रशासनाचे मत पुढील प्रमाणे आहे.

प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर सदर विकास योजना नकाशात जे रस्ते विकसीत झालेले (अस्तीत्वातील रस्ते) काळया रंगाने दर्शविलेले आहेत त्या व्यतिरीक्त जे रस्ते आहेत ते प्रस्तावित रस्ते व रस्ता रुंदी लाल रंगाने दर्शविलेले आहेत.

वरील बाबींचा विचार विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही.

अशा प्रकरणी

अ) सदर रस्ता, रस्तारुंदी व आरक्षण दि. १६/१२/१९९९ नंतर म्हणजेच विकास नियंत्रण नियमावलीत टीडीआरची तरतूद समाविष्ट झाली त्यानंतर विकसीत झाले असल्यास अशा जमीनीचा मोबदला टीडीआर स्वरुपात अदा करता येईल.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित केलेला आहे. त्यावर हरकती सुचनांबाबत सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्रायानुसार आवश्यक दुरुस्त्या व वरील अ प्रमाणे विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन शासन मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे मान्यतेस ठेवण्यात यावा. असा मा.आयुक्त यांजकडील प्रस्ताव आहे त्याप्रमाणे

त्यास मान्यता देणेत येत आहे. मौजे भोसरी (कासारवाडी) नाशिक फाटा येथे उड्डाणपूलाचे काम प्रगतिपथावर आहे. सदर उड्डाणपूल व त्यानुषंगिक वाहतुकीच्या व नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक क्षेत्राचे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. परंतु भूसंपादनाद्वारे क्षेत्र मनपाच्या ताब्यात येण्यास लागणारा कालावधी व पूलाचे सुरु असलेल्या कामासाठी जागेची निकड पाहता सदर आवश्यक बाधित क्षेत्र हितसंबंधितांनी महापालिकेच्या ताब्यात देऊ केल्यास संबंधितांचे बाधित क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) अन्वये अनुज्ञेय पर्यायाचे बदल्यास महापालिकेच्या ताब्यात घेण्यास मान्यता देणेत येत आहे. मौजे भोसरी (कासारवाडी) येथे स.नं.४७६ पैकी मध्ये महापालिकेचा सेवेज पंप व पंप हाऊस आहे. सद्यस्थितीमध्ये सदर सेवज पंप व पंपाकडे जाण्यासाठी खाजगी मालकांच्या जागेतून कच्चा रस्त्याचा वापर करण्यात येतो. सदर भागात विकास योजनेमध्ये उच्च क्षमता द्रुतगती मार्ग प्रस्तावित करण्यात आलेला आहे. परंतु अद्याप तो महापालिकेच्या ताब्यात नाही. भविष्यात सदर मार्गावर रिंग रोड अथवा रिंग रेल्वेचे नियोजन झाल्यास सदर सेवेज संप व पंप हाऊसकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने उच्च क्षमता द्रुतगती मार्गालगत १२ मी. रुंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये अथवा कलम ३७ अन्वये प्रस्तावित करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे भोसरी येथे स.नं.६८५ व ६८६ मधून व आरक्षण क्र.४१५ उद्यानाचे उत्तरेकडून जुना पुणे मुंबई रस्त्यापर्यंत १२ मी.रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्यामध्ये मनपा करदात्यांची घरे आहेत. उद्यान आरक्षण ते दुर्गा मंदिर रस्त्यापर्यंतचा १२ मी. रस्ता यापूर्वी रद्द करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. तसेच उद्यानाचे पुर्वेकडून सदर १२ मी. रस्त्यापासून विकास योजनेत ९ मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यामुळे उद्यान ते जुना पुणे मुंबई रस्त्यापर्यंतचा विकास योजनेतील १२ मी.चा रस्ता ९ मी. करणेकामी कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८९ प्रतिकूल- १०

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ५३ विषय क्रमांक :-१५
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील
जा.क्र.आ.कक्ष/५६/२०१२ दि.२६/०४/२०१२
२) आमचे पत्र दिनांक ३०/०३/२०१२ व ०२/०४/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतचे संदर्भ क्र.१ प्राप्त झाले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर संदर्भ क्र. १ मधील नियम क्र. ५ नुसार ५ नामनिर्देशित सदस्यांची

नियुक्ती करण्यासाठी संदर्भ क्र. २ नुसार मा. पक्षनेते / मा. गटनेते यांना पत्रे पाठवून सोमवार दिनांक ०२/०४/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता व त्यानंतर दिनांक १३/०४/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आमच्याकडे विचार विनिमय करण्याकरिता बोलाविण्यात आले होते.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पक्षाचे वा गटाचे तौलनिक संख्याबळ खालील प्रमाणे आहे.-

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | सदस्य संख्या | नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी | ८४ | ३ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी | २२ | १ |
| ३ | शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) | १५ | १ |
| ४ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ | ---- |
| ५ | भारतीय जनता पक्ष | ३ | ---- |
| | एकूण सदस्य संख्या | १२८ | ५ |

१) शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) तर्फे त्यांचे गटनेते मा. आप्पा ऊर्फ श्रीरंग चंदु बारणे यांनी दिनांक १३ / ०४ / २०१२ रोजी धुमाळ बाबासाहेब निवृत्ती यांचे नाव नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून सुचविलेले आहे / तसे नामनिर्देशन पत्र आवश्यक त्या पुराव्यासह माझ्या स्वाधीन केले आहे. दिनांक ०२/०४/२०१२ रोजी तसेच दिनांक १३/०४/२०१२ रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी तर्फे त्यांचे गटनेता व सभागृहनेता मा. सौ. मंगलाताई अशोक कदम यांनी तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष ) आघाडी तर्फे त्यांचे गटनेता व विरोधी पक्षनेता मा. कैलास महादेव कदम यांनी कोणचेही नाव सुचविलेले नाही / कोणाचेही नामनिर्देशनपत्र माझ्या स्वाधीन केलेले नाही.

२) मा. पक्षनेत्यांशी / मा. गटनेत्यांशी विचारविनिमय करून खालील उमेदवाराची सर्व कागदपत्रे तपासली असल्याने व त्यांच्याकडे मुं.प्रां.मनपा अधिनियमानुसार लागणारी पात्रता असल्याने त्यांच्या नावाची शिफारस करणेत येत आहे.

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | उमेदवाराचे नांव | अर्हता |
|---|---|---|---|
| १. | शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) | धुमाळ बाबासाहेब निवृत्ती | महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून पाच वर्षाचा अनुभव. |

वरील उमेदवाराने पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९ अन्वये जी अर्हता लागते तीच अर्हता व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधे नियम क्र. ४ मधे नमूद केलेली अर्हता त्याचेजवळ असल्याचे व मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १० मधील अनार्हता नसल्याचे हमीपत्र / घोषणापत्र / शपथपत्र सादर केलेले आहे. सदर प्राप्त अर्जाची आवश्यक ती छाननी करून वरील व्यक्तीची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करावी अशी मा.आयुक्त यांजकडून शिफारस करणेत आली आहे. मा.आयुक्त यांनी केलेल्या उपरोक्त प्रमाणेच्या शिफारसींचा विचार करुन त्याप्रमाणे धुमाळ बाबासाहेब निवृत्ती यांची पिंपरी चिंचवड महानरपालिकेत नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती करणेत येत आहे.

मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ५४ विषय क्रमांक :-१६
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) दि. ६/१/२०१२ व २/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. १६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९९ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ५५ विषय क्रमांक :-१७
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.महिला व बालकल्याण समिती

अ) दि.११/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ९९ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ५६ विषय क्रमांक :-१८
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.शहर सुधारणा समिती

अ) दि.९/११/२०११, २३/११/२०११, ५/१२/२०११, १४/१२/२०११, २८/१२/२०११, २९/१२/२०११, २/१/२०१२, ४/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.११/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि. १६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल- ९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ५७ विषय क्रमांक :-१९
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिती

अ) दि.७/१२/२०११, २१/१२/२०११, ४/१/२०१२, २२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.४/१/२०१२,२२/२/२०१२ व ७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१६/४/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल- ९९ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ५८ विषय क्रमांक :-२०
दिनांक :- १९.५.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र आ.कक्ष/६६/२०१२, दिनांक - १९/०५/२०१२
२) आमचे पत्र दिनांक ३०/०३/२०१२, २/०४/२०१२ व २१/०४/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतचे संदर्भ क्र.१ प्राप्त झाले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर संदर्भ क्र.१ मधील नियम क्र.५ नुसार ५ नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी संदर्भ क्र.२ नुसार मा.पक्षनेते/मा.गटनेते यांना पत्रे पाठवून दिनाक ०२/०४/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता व त्यानंतर दिनांक १३/०४/२०१२ रोजी

दुपारी २.०० वाजता व त्यानंतर दि.१५/५/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आमच्याकडे विचारविनिमय करण्याकरिता बोलाविण्यात आले होते.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पक्षाचे वा गटाचे तौलानिक संख्याबळ खालीलप्रमाणे आहे -

| अ. क्र. | विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | सदस्य संख्या | नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी | ८४ | ३ |
| २ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी | २२ | १ |
| ३ | शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) | १५ | १ |
| ४ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ | ---- |
| ५ | भारतीय जनता पक्ष | ३ | ---- |
| | | १२८ | ५ |

१) शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) तर्फे त्यांचे गटनेता मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे यांनी दिनांक १३/०४/२०१२ रोजी धुमाळ बाबासाहेब निवृत्ती यांचे नाव नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून सुचविलेले होते. तसे नामनिर्देशपत्र आवश्यक त्या पुराव्यासह तत्कालीन आयुक्त यांचे स्वाधीन केले होते. त्याआधारे धुमाळ बाबासाहेब निवृत्ती यांची नामनिर्देशित सदस्य म्हणुन नियुक्ती करावी अशी शिफारस क्र. आ.कक्ष/५६/२०१२ दि.२६/४/२०१२ अन्वये मा.महापालिका सभेकडे करणेत आली आहे.

२) राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी तर्फे त्यांचे गटनेता व सभागृह नेता मा.सौ.मंगलाताई अशोक कदम यांनी दिनांक १५/०५/२०१२ रोजी गावडे हनुमंत बाळासाहेब, पाटील सुजित वसंत व बोऱ्हाडे अरुण तुकाराम यांचे नाव त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी तर्फे त्यांचे गटनेता व विरोधी पक्षनेता मा.कैलास महादेव कदम यांनी दिनांक १५/०५/२०१२ रोजी लोखंडे गोरक्ष जाकाराम यांचे नाव नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणुन सुचविलेले आहे. तसे नामनिर्देशनपत्र आवश्यक त्या पुराव्यासह माझ्या स्वाधीन केले आहे.

३) मा.पक्षनेत्यांशी / मा. गटनेत्यांशी विचारविनिमय करून खालील उमेदवारांची सर्व कागदपत्रे तपासली असल्याने व त्यांच्याकडे मुं.प्रां.मनपा अधिनियमानुसार लागणारी पात्रता असल्याने त्यांच्या नावाची शिफारस करणेत येत आहे.

| **अ. क्र.** | **विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट/ आघाडी** | **उमेदवाराचे नांव** | **अर्हता** |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी | गावडे हनुमंत बाळासाहेब<br>पाटील सुजित वसंत | महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी | बोऱ्हाडे अरुण तुकाराम<br>लोखंडे गोरक्ष जाकाराम | गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून पाच वर्षाचा अनुभव. |

वरील उमेदवारांनी पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९ अन्वये जी अर्हता लागते तीच अर्हता व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधे नियम क्र. ४ मधे नमूद केलेली अर्हता त्यांचेजवळ असल्याचे व मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १० मधील अनर्हता नसल्याचे हमीपत्र / घोषणापत्र / शपथपत्र सादर केलेले आहे. सदर प्राप्त अर्जांची आवश्यक ती छाननी करून वरील व्यक्तींची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करावी अशी मा.आयुक्त यांजकडून शिफारस करणेत आली आहे.

मा.आयुक्त यांनी केलेल्या उपरोक्त प्रमाणेच्या शिफारसींचा विचार करुन त्याप्रमाणे गावडे हनुमंत बाळासाहेब, पाटिल सुजित वसंत, बोऱ्हाडे अरुण तुकाराम, लोखंडे गोरक्ष जाकाराम यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नामनिर्देशन सदस्यपदी नियुक्ती करणेत येत आहे.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, आताच याठिकाणी स्विकृत सदस्यांच्या बाबतीत विषय मांडला आहे. अरुण बो-हाडे हे एच.ए.कंपनीमधील सेंट्रल गव्हर्मेंटचे कर्मचारी आहेत त्यांनी एच.ए.रिक्रिएशन क्लबचा संदर्भ दिलेला होता त्यानंतर महाराष्ट्र साहित्य कामगार परिषदेचा सदस्य म्हणून दाखला जोडला आहे. ज्यादिवशी फॉर्म भरला त्यादिवशी एच.ए.रिक्रिएशन क्लबचा सदस्य असलेचा दाखला दिलेला होता त्यानंतर परवा १८ तारखेला नव्याने महाराष्ट्र राज्य कामगार परिषदेचे सदस्य असल्याबाबतचे कागदपत्र ॲड केलेले आहेत. त्याठिकाणी एखादयाचे ऑब्जेक्शन आलेले असलेतर अशा सदस्यास दुस-या संस्थेचे सभासद म्हणून दाखविता येते का व कागदपत्र समाविष्ट करता येतात का याचा खुलासा पाहिजे नंतर बोलायचे आहे.

मा.जोशी ( प्र.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, याठिकाणी २०१२ च्या नियमाप्रमाणे अर्जाची तपासणी, छाननी करणे, शिफारस करणे आयुक्तांचे काम आहे. हि निवडणूकीची प्रक्रिया आहे याच्यावर जास्त भाष्य करता येणार नाही.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, अति.आयुक्तांना नियम माहिती नव्हते का. परवा त्यांना दाखवलेले आहे. त्यामध्ये कुठल्याही कागदपत्राची छाननी आयुक्तांना करता येत नाही असे आहे. आपण कुठली छाननी केली, छाननी करण्याचे अधिकार आपले नाहीत. योग्य व्यक्तिची शिफारस करण्याचे अधिकार आहेत.

मा.जोशी ( प्र.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, संबंधितांचे सगळयांचे लेखी म्हणणे घेतलेले आहे. जे काही २०१२ चे नियम आहेत त्या नियमान्वये बो-हाडे पात्र असतीलतर आयुक्त शिफारस करु शकतात. ती पात्रता तपासलेली आहे आणि शिफारस केलेली आहे. हा निवडणूकीचा विषय आहे आपण काय ते ठरवावे.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, १८/५/२०१२ ला बो-हाडे हे महाराष्ट्र राज्य कामगार परिषदेचे सदस्य म्हणून सांगीतलेले आहे. एकाच उमेदवारांच्या दोन फाईली तयार झालेल्या आहेत. आपल्याला छाननी करण्याचे अधिकार नाहीत.

मा.जोशी ( प्र.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, शिफारस करणे हे डोळे झाकून शिफारस होत नाही. मला जास्त युक्तिवाद करता येत नाही.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, आयुक्तांना छाननी करण्याचे अधिकार नाहीत. एखादा सदस्य परत कागदपत्र सबमिट करु शकतो का. महापौर साहेब, बो-हाडे हे एच.ए.चे कामगार आहेत. तुम्ही परत त्या सदस्यांचे अर्ज भरुन घेवू शकतात का. त्यांनी नंतर कागदपत्र सबमिट केलेले आहेत. आम्ही पत्र दिलेले होते, आम्हांला त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात. त्या नगरसचिवांनी आतापर्यंत का दिलेल्या नाहीत. एखादी गोष्ट नियमाप्रमाणे करायची असेलतर तो नियम पाळला गेला पाहिजे. १८ तारखेला कागदपत्र परत स्विकारतो का. एच.ए.चे ते सदस्य आहेत असे त्यांनी एकदा सांगीतले आहे. परत १८ तारखेला कागदपत्र तुम्ही कसे काय स्विकारले. हनुमंत गावडे यांच्या विरोधात पिटीशन दाखल झाले, सोमवारी सुनावणी आहे. सभागृहाला मला विनंती करायची आहे १८ तारखेला परत कागदपत्र सबमिट करुन का घेतलेले आहेत.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, सिमाताईनी जो आक्षेप घेतलेला आहे तो त्यांच्या जागेवर बरोबर आहे. माझी विनंती आहे की पक्षनेत्यांना जो अधिकार आहे त्याप्रमाणे त्यांनी सबमिशन केलेले आहे व आयुक्तांनी कायदयाच्या अधिकाराप्रमाणे शिफारस केलेली आहे त्यास आमची मान्यता आहे, सभागृहाची मान्यता आहे. आयुक्तांच्या शिफारशीमध्ये चुकिचे झालेले असेलतर त्यासाठी सक्षम समितीकडे दाद मागावी किंवा कोर्टात जावे आणि हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ९९ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.महापौर :- धुमाळ बाबासाहेब निवृत्ती, गावडे हनुमंत बाळासाहेब, पाटील सुजित वसंत, बोऱ्हाडे अरुण तुकाराम, लोखंडे गोरक्ष जाकाराम यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती झाली असे मी जाहीर करते व अभिनंदन करते.

सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८७५ /२०१२
दिनांक :- ०६ / ०६ /२०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.